स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०९२
१९२

व्यर्थ व कसें नारा-
। दाखवूं दयाळा ॥

# करुणासागर

## ( पूर्वार्ध )

प्रकाशक

**सद्भक्ति प्रसारक मंडळी,**

सद्भक्ति कार्यालय, श्रीशंकर लॉज,

सरस्वती बाग, अंधेरी.

( जि॰ ठाणा. )

REFBK-0003709

यावा आतां कळवळा । अत्रीअनसूयेच्या बाळा ॥
आतांच येईं अनंतवळा । महापुरुषा सर्वांशा ॥

# करुणासागर

## ( पूर्वार्ध )

REFBK-0003709

प्रकाशक,

**सद्भक्ति प्रसारक मंडळी,**

सद्भक्ति कार्यालय, श्रीशंकर लॉज,

सरस्वती बाग, अंधेरी.

( जि० ठाणा. )

३७०९

शके १८[illegible] आवृत्ति २ री [illegible] प्रत

१९२२

किंमत एक रुपया.

हा ग्रंथ श्री. **आनंदराव सु. अरूर**, यांनीं
" धी ब्रिटानीक दरबार प्रिंटिंग वर्क्स, "
३८, नानाभाई लेन, कोट, मुंबई.
येथें छापिला.

तो

श्री. **गणेश पद्मनाभ मुर्डेश्वर**, बी. ए., एल्. एल्. बी.,
हायकोर्ट वकील, यांनीं - श्रीशंकर लॉज, सरस्वती बाग,
अंधेरी, येथें प्रकाशित केला.

[ सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन आहेत. ]



श्रीदत्तात्रेय श्रीनारायण महाराज

| जन्म | समाधि |
| --- | --- |
| श० १७२९ आषाढ व० ५ गुरुवार. | श० १७९० आषाढ व० ५ गुरुवार. |

# प्रस्तावना

१. सद्भक्त वे. वा. रामकृष्ण वासुदेव नव यांनीं संपादन केलेली "श्रीकरुणासागर" ग्रंथाची शके १८३८ मधील आवृत्ति संपून बहुत दिवस झाले. प्रथमावृत्तींत पहिले दोन भाग म्हणजे फक्त ८७२ ओंव्या आल्या होत्या. या आवृत्तींत तिसऱ्या भागाच्या १०२४ ओंव्या देऊन पूर्वार्ध पूर्ण करीत आहों.

२. आद्यसद्गुरु नारायण महाराज जालवणकर यांनीं स्वतःच ज्या ग्रंथावर परम प्रेम केलें त्या ग्रंथाशिवाय सांप्रदायिकांचें कसें चालणार? महाराज ३०–४० ओंव्या प्रत्यहीं रचीत असत, आपण २०–२५ ओंव्या प्रत्यहीं वाचीत असतों! मात्र ही व्यवस्था असावी तशीच आहे. कारण, आईनेंच दूध द्यावें आणि मुलांनींच तें प्यावें हें उचितच होय. महाराज या ओंव्या नित्यनेमानें कां लिहीत होते याचें कारण त्यांनीं स्वतःच पुढील दोन ओंव्यांत निवेदन केलें आहे :—

> "सर्व तुतें निवेदिलें। आतां कांहीं तरी प्रार्थिलें। पाहिजे तुझीं पाउलें। नमितों तवास्मि याचितां नमितां
> "तवास्मि याचन" शरण। अभिष्टभिक्षा तुज मागण। **हा एक नित्यनेम जाण। यास्तव लिहावी विनंति"**

३. महाराजांनीं करुणासागरांत भक्ताची सर्व प्रकारची गाऱ्हाणीं गाइलीं आहेत. दैनंदिन निवेदनापासून तों अत्यंत अनपेक्षित संकटापर्यंत एकूनएक प्रसंगास उपयोगी पडतील अशा करुणा श्रीमहाराजांनीं थोरल्या महाराजांपाशीं भाकिल्या आहेत. किंबहुना

वात्सल्यातिशयामुळें श्रीदत्तप्रभूपाशीं आत्मनिवेदन करतांना भक्तांनीं श्रींपासून कांहींहि लपवून ठेऊं नये अशी या करुणासागराच्याद्वारें शिकवण महाराजांनीं सांगून ठेविली आहे.

४. पुष्कळ वेळां सांसारिक आपत्तींत सांपडलों असतां आपण सांसारिक पीडा निवारणार्थ प्रभूपाशीं याचना करावी कीं करूं नये अशी शंका भक्तास येत असते. प्रारब्धभोग भोगीत असतां त्याबद्दल श्रीचरणास शीण कां द्यावा ? असें वाटणें स्वाभाविक आहे. परंतु भक्ताला श्रींवांचून मन मोकळें करून सांगण्यास प्रभूशिवाय कोण जिवलग आहे ? अर्थात् श्रीचरणांजवळ अभय याचना करण्यास भक्तानें संकोचून चालणारच नाहीं. आणि त्यानें संकोच करूच नये अशी महाराजांची स्पष्ट सांगी पण आहे. वस्त्रहरण प्रसंगीं द्रौपदीनें धांवा केला कीं नाहीं ! "पडतां जडभारी । दासीं आठवावा हरी ॥". आपदुद्धरणार्थ प्रभूला आळविणें हें सकामभजन नव्हे. पण केव्हां ! तें महाराजांनीं पुढील ओंव्यांत स्पष्ट सांगितलें आहे :—

"दर्शन तव संग त्वत्सेवन । त्वन्मुखींचें निजबोध श्रवण ।
अवश्य इतकें मागण । तुज मागावें उचित हें ॥ **याकरितां**
तुज सद्गुरु दत्ता ! । तनु मन इंद्रियां निरामयता । भक्तें भावें
याचितां । दोष नाहीं सर्वथा ॥ करुणासागर १३२४१–४२

५. या करुणासागर ग्रंथांत कर्म, उपासना, ज्ञान, भक्ति वगैरे सर्व कांहीं परमार्थविषय आले आहेत. महाभारतांत आख्यानमिषानें जशीं इतर सर्व पुराणें आणि उपपुराणें आलीं आहेत त्याप्रमाणें या सागरांत इतर सर्व सागरांतील विषय करुणामिषानें अंतर्भूत झाले आहेत.

६. प्रथमावृत्ति छापतेवेळीं प्रस्तुत ग्रंथ हा करुणासागरांतीलच वेंचे काढून तयार केलेला आहे अशी समजूत होती. परंतु ती समजूत चुकीची आहे असें आतां आढळून येत आहे. कारण, या आवृत्तींत तिसऱ्या भागाचे शेवटीं येथें पूर्वार्ध संपला असें स्पष्टच म्हटलें आहे.

७. कळविण्यास अत्यंत आनंद वाटत आहे कीं "करुणा-सागरा"चा उत्तरार्धही आतां उपलब्ध झाला असून तो इंदूर येथील श्रीनारायण महाराजांच्याच परंपरेंतील श्रीयुत निळकंठ कृष्ण धारकर यांनीं छापून काढण्यासाठीं लवकरच आमचे स्वाधीन करण्याचें कळविलें आहे व याबद्दल आम्हीं त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून हा समग्र ग्रंथ १७६७२ ओंव्या आहे. त्यांपैकीं पूर्वार्ध म्हणजे १८९६ ओंव्या आज छापून प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. राहिलेला उत्तरार्ध सवडीनुसार पुढें मागें प्रसिद्ध होईल.

८. प्रस्तुत ग्रंथ सर्व संप्रदायोपयोगी असल्यामुळें त्याचा प्रसार सर्व भाविकांत होईलच. या करुणास्त्राचा सर्वांनीं जप करून आत्महित साधून घ्यावें अशी मंडळीची विनंति आहे.

सद्भक्ति कार्यालय,
श्रीकृष्णजयंती,
शके १८५०.

**प्रकाशक.**

# श्रीनारायण महाराज

## संक्षिप्त चरित्र

आंबेजोगाईनजीक जालवण येथें तात्या पुराणिक या नांवाचे एक देशस्थ ब्राह्मण रहात असत. त्यांना पुत्रसंतान नसल्यामुळें पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें त्यांनीं श्रीभागवताचीं शंभर पारायणें केलीं. नंतर शके १७२९ प्रभव संवत्सर, आषाढ वद्य ५, गुरुवार रोजीं त्यांना एक पुत्र झाला. तेच नारायण महाराज. ते एक वर्षाचे होतांच त्यांची आई वारली. तेव्हां त्यांच्या आजीनें त्यांचा प्रतिपाळ केला. ते आठ वर्षांचे झाले तेव्हां त्यांचें मौंजीबंधन झालें व पुढें दोन वर्षांनीं वडिलांच्या आग्रहास्तव त्यांना आपल्या इच्छेविरुद्ध लग्न करून घेणें भाग पडलें. पण पुढें थोड्याच दिवसांत त्यांना अत्यंत वैराग्य उत्पन्न झालें व ते सद्गुरूच्या शोधार्थ निघाले. प्रथम ते मथुरेस आले. तेथें गोवर्धन बावा या नांवाचा एक हटयोगी होता, त्याचे ते शिष्य झाले. त्यानें त्यांना ध्यान, मंत्र आणि उपासना सांगितली. ते बावापाशीं चार वर्षें राहून हटयोगांत अत्यंत प्रवीण झाले. एके दिवशीं जालवणच्या एका गृहस्थानें महाराजांस अकस्मात् पाहिलें व तो गोवर्धनबावांजवळ गेला आणि त्यानें महाराजांचे वडील त्यांचा शोध न लागल्यामुळें घरीं अत्यंत शोकांत आहेत, असें सांगितलें. तें ऐकून बावांनीं महाराजांना एकदम घरीं जाण्यास सांगितलें. गुर्वाज्ञेनुरूप महाराज घरीं जाण्यास निघाले, तेव्हां त्यांनीं आपलें समाधान झालें नाहीं,

ही सूचना गोवर्धनबावांस केली. त्यावर, दत्ताची भेट घेतली असतां आपले मनोरथ पूर्ण होतील, असें बावांनीं त्यांना सांगितलें. नंतर महाराज घरीं गेले व तेथें ते दोन वर्षें राहिले. तितक्या काळांत त्यांची पत्नी गरोदर होऊन त्यांस मुलगा झाला; परंतु आठ दिवसांच्या आंतच तो मुलगा व त्याची आई अशीं दोघेंही निवर्तलीं. तेव्हां लागलेच नारायण महाराज तेथून निघून गुजराथेस गेले. तेथें जुनागडाहून दोन मैलांवर गिरनार म्हणून प्रसिद्ध पर्वत आहे, त्यावर त्यांनीं चवदा दिवसपर्यंत अन्नपाणी वर्ज करून दत्तभेटीकरितां धरणें घेतलें व ह्या प्रसंगीं त्यांनीं आपल्या धांव्यांनीं दत्तास आळविलें. तेव्हां त्या ठिकाणीं दत्तांनीं त्यांना दर्शन देऊन ब्रह्मविद्येचा बोध केला; आणि पुढें अभ्यासाकरितां आपले शिष्य जे निरंजनस्वामी त्यांच्या स्वाधीन केलें. ते ज्या गुंफेंत होते तेथें महाराजांनीं चार वर्षेंपर्यंत निरंजन-स्वामीजवळ श्रवण व अभ्यास केला. अखेरीस पूर्णस्थिति बाणल्यावर जगदुद्धाराकरितां जाण्यास त्यांना दत्तांनीं आज्ञा केली. यावेळीं त्यांचें वय सुमारें वीस वर्षांचें होतें.

ते पहिल्यानें द्वारकेस गेले व तेथून मुंबईवरून दक्षिणेकडे रामेश्वरापर्यंत गेले. नंतर काशी, जगन्नाथ वगैरे प्रख्यात तीर्थयात्रा करून शेवटीं कानपुराहून पांच कोसांवर ब्रह्मावर्त म्हणून गांव आहे, तेथें येऊन राहिले. संचार करीत असतां कांहीं वैराग्यशील संन्यासी शरण आल्यामुळें त्यांचा उद्धार करण्याकरितां त्यांनीं परमहंसदीक्षा धारण केली. शके १७६२ त महाराज हरिद्वारास जाण्यास निघाले. तेथें दोन वर्षें राहून ते ग्वाल्हेरीस आले. तिकडे फक्त चार महिने राहून ते तेथून अठरा कोशांवर असलेल्या धौम्यारण्यांत गेले.

शके १७७७ त महाराज काशीस निघून गेले. काशीमध्यें नारायण महाराजांना ‘चिमटेबोवा’ असें म्हणत असत. तेथें बारा वर्षें राहून शके १७९० प्रभव संवत्सर, आषाढ वद्य ५, गुरुवार रोजीं ते समाधिस्थ झाले. नारायणमहाराजांचे शिष्य व शिष्यिणी मिळून एक हजार होते. त्यांनीं केलेल्या ग्रंथांपैकीं जे पाहण्यांत आले आहेत त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ बोधसागर २ कैवल्यसागर ३ ज्ञानसागर ४ विज्ञानसागर ५ आनंदसागर ६ शांतिसागर ७ करुणासागर ८ करुणासागरसार ९ विचारमाला १० चिद्रत्नमाला ११ गुरुपादुकाष्टक १२ बोधाष्टक १३ निर्वाणपंचक १४ सिद्धयोगाष्टक १५ अष्टांगयोग १६ धांवे व पदें.

# करुणासागर.

———:०:———

श्रीगणेशायनमः ॥ ॐ नमो सद्गुरु परब्रह्म । आत्मारामा पूर्णकामा ॥ भक्तवरदा आनंदधामा । दत्तात्रेया ॥ १ ॥ अनंतनामा नामरहिता । सर्वरूपा सर्वातीता ॥ गति-भक्ति-ज्ञानदाता । दत्तदेवा ॥ २ ॥ तूं असंग निरंजन । तूं विशुद्धज्ञानघन ॥ भावातीत परिपूर्ण । सदोदित ॥ ३ ॥ तूं देहत्रयविलक्षण । सर्वसाक्षी आपण ॥ सदा अससी भजकाभिन्न । सर्वेश्वरा ॥ ४ ॥ नित्य शुद्ध स्वयंबोध । नित्यमुक्त स्वतःसिद्ध ॥ नित्यानंद अगाध । अनंत तूं ॥ ५ ॥ तूं अज्ञानसाक्षी । ज्ञानकारणही अससी ॥ सर्वाधिष्ठान सर्वदेशी । व्यापक तूं ॥ ६ ॥ जें मनवाणीतें अगोचर । सर्वशेष परात्पर ॥ तयातें मी रंक पामर । स्तवीन म्हणतों ॥ ७ ॥ जेथें निगम "नेति नेति" । "तन्न तन्न" बोलती ॥ तया दीन अल्पमती । काय वर्णू ॥ ८ ॥ तथापि आवडी घेतली जीवें । बोबड्या शब्दें आळवावें ॥ माझें बोलणें आयकावें । सर्वज्ञ देवा ॥ ९ ॥ तुझिये भेटीची धरूनि आस । केला संसाराचा नाश ॥ तुझेचिसाठीं झालों उदास । सर्वत्र देवा ॥ १० ॥ पहावे तुझे पाय । म्हणोनि केले नाना उपाय ॥ ते सर्व झाले

अपाय । सद्‌गुरु स्वामी ॥ ११ ॥ ‘वेदाभ्यासादि योगयाग केले । तेणें न देखिजे माझीं पाउलें’ ॥ ऐसें गीतेंत आइकिलें । वचन तूझें ॥ १२ ॥ तेंही मज सामर्थ्य नाहीं । आतां करावें जी काई ॥ तथापि अनेक उपायीं । श्रमलों मी ॥ १३ ॥ आतां उपायांची सीमा झाली । मनाची धांव मोडली ॥ देहाची अंतवेळा आली । सर्वज्ञ राया ॥ १४ ॥ आतां आम्हीं काय करावें । कोठें कोठें फिरावें ॥ कोठें जाउनी मरावें । तुम्हांकरितां सद्‌गुरु ॥ १५ ॥ माझें कर्तव्य-ज्ञान बुडालें । हें तुम्हांस सर्वही कळलें ॥ आतां मज सांभाळिलें । पाहिजे स्वामी ॥ १६ ॥ आतां तुज-वीण राहवेना । अंतरीं फार झाली यातना ॥ आतांच येउनी समाधाना । केलें पाहिजे ॥ १७ ॥ सर्वांचा माता पिता देख । तूंचि सर्वां स्वामी एक ॥ भक्तार्थे नानारूप-धारक । तूंचि देवा ॥ १८ ॥ ब्रह्मा विष्णु महेश । तूंचि झालासी सर्वेश ॥ परब्रह्म निर्विशेष । तूंचि देवा ॥ १९ ॥ तूं सविता, तूं चंद्र । तूं प्रजापति, तूं सुरेंद्र ॥ तूंचि एकादश रुद्र । दत्त देवा ॥ २० ॥ तूं ग्रह नक्षत्र तारा-गण । तूं सुर नाग गंधर्व आपण ॥ वरुण वायु परिपूर्ण । तूंचि देवा ॥ २१ ॥ तूं सकळ जगद्व्यापक । सकळ जगाचा चाळक ॥ सकळ ब्रह्मांडनायक । तूंचि स्वामी ॥ २२ ॥ तूंचि सेवक तूंचि स्वामी । तूं सकळांच्या अंत-

यांमीं ॥ तूंच स्वाराम निजधामीं । रमतोसि देवा ॥ २३ ॥
तूं गुरु, तूं शिष्य होसी । ब्रह्मज्ञानाचा उपदेश करिसी ॥
स्वतंत्र समर्थ नाना विलासी । सद्गुरु राया ॥ २४ ॥
तूं मत्स्यादि अवतार धरिसी । दुष्ट राक्षस संहारिसीं ॥
निजभक्त प्रतिपाळिसी । गुरुदेवा तूं ॥ २५ ॥ तूं अनंत
रूपें धरिसी । अनंत नामें स्वीकारिसी ॥ नामरूपातीत
असती । निरंतर ॥ २६ ॥ तूंचि अनादी असती एक ।
तेथें मी कोठुनी आलों देख ॥ ऐसें पुसाल तरी कौतुक ।
तुमचेंच स्वामी ॥ २७ ॥ जैसा मृत्तिकेंत घट असे । कां
हेमीं नग दिसे ॥ तैसा मी शिष्य वसें । स्वरूपीं
स्वामीचे ॥ २८ ॥ जैसा जळीं तरंग दिसे । तंतूमाजी
पट आभासे ॥ तैसा मी शिष्य नसोनि असें । स्वरूपीं
तुमचे जी ॥ २९ ॥ आम्हां स्वामीचा आधार । तुम्हीं
आमुचें सर्वसार ॥ स्वामीस करितों नमस्कार । एक-
भावें ॥ ३० ॥ मी दास तूं राम स्वामी । मी शिष्य तूं गुरु
अंतर्यामीं ॥ आम्हां विश्रांति तुझे नामीं । असे दयाळा
॥ ३१ ॥ मी तुझें अज्ञान बाळ । तूं माझा माता पिता
बंधू सकळ ॥ करीं माझा सांभाळ । दयाळूपणें ॥ ३२ ॥
तूं धेनू मी बाळ वत्स । मी चकोर तूं चंद्र स्वच्छ ॥ तूं
जीवन मी दीन मत्स्य । सर्वज्ञ राया ॥ ३३ ॥ तूं घन मी
चातक । तूं पक्षिणी मी चक्षु-पक्ष-हीन पिलुं देख ॥

तूं दाता मी भिक्षुक । भिक्षा मागें दर्शनाची ॥ ३४ ॥
मी अनाथ तूं अनाथनाथ । मी दरिद्री तूं श्रीमंत
समर्थ ॥ भिक्षा मागतां मातें व्यर्थ । दवडूं नये सर्वज्ञा
॥ ३५ ॥ तूंचि माझें धन धाम । तूंचि माझा विश्राम ॥
तूंचि माझा पूर्णकाम । सखा त्राता सोयरा ॥ ३६ ॥
तूंच माझा देहप्राण । तूंच माझें इंद्रिय मन ॥
तूंच माझा आत्मा जाण । जिवांचा जीव ॥ ३७ ॥
तूं एकचि स्वयमेव । मी शिष्य तुझेंच आडनांव ॥ तुजहून
वेगळेपणासि ठाव । नाहींच मजला सर्वज्ञा ॥ ३८ ॥
म्हणोनी सर्वस्व आमुचें । हितगुजसुख अंतरींचें ॥ आहे
सर्वज्ञ स्वामीचे । चरणाची सत्ता ॥ ३९ ॥ आम्हां तुज-
वीण थारा । कोठेंच नाहीं बोधसागरा ॥ आतां विलंब
गुरुमाहेरा । लावूं नये सर्वथा ॥ ४० ॥ मी तों अपरा-
धचि मूर्तिमंत । तूं तों साक्षात् क्षमावंत ॥ काय पहासी
सदसत् । गुणदोष आतां ॥ ४१ ॥ अपराध फार झाले ।
परी नमितों प्रणतवत्सलाचीं पाउलें ॥ आतां स्वामी क्षमा
केले । पाहिजेत सर्व ॥ ४२ ॥ मी तों अत्यंत आर्त देख ।
तूं प्रणतार्तिविनाशक ॥ नमन करितांही कौतुक । काय
पाहसी सर्वज्ञा ॥ ४३ ॥ मी तों पातकांची राशी । तूं तों
पतितपावन होसी ॥ शरण येतांही अंत पाहसी । दीन-
दयाळा सद्गुरो ॥ ४४ ॥ मी तों हतभाग्यचि खरा ।

तूं अन्यथाकर्तुं समर्थ गुरुवरा ॥ मी दैवहीन म्हणोनि पाठमोरा । काय होसी दयाळा ॥ ४५ ॥ रंकाचा राजा करिसी । राजातें रंकत्व आणिसी ॥ मजविषयीं चौऱ्यांशीं । आणिली कां स्वामिया ॥ ४६ ॥ जरी तूं कृपादृष्टी पाहें । तरी वीषचि अमृत होय ॥ म्हणोनि धरिले तुझे पाय । दीनबंधो सद्गुरो ॥ ४७ ॥ मृतातें जीवन करिसी । काळाचाही काळ होसी ॥ मजविषयीं हृषीकेशी । सामर्थ्य कोठें गेलें तें ॥ ४८ ॥ तुझिये भ्रूभंगलेशें । त्रिलोकही क्षणांत नाशे ॥ तुझिये कृपाकटाक्षलेशें । अखंड लक्ष्मी होतसे ॥ ४९ ॥ ऐसा समर्थ आमुचा धनी । शिरीं जागा चक्रपाणी ॥ आमची पाहूनियां जांचणी । स्वस्थ कैसा राहिलासी ॥ ५० ॥ काळांतरीं देसी भिक्षा । हें न साजे सर्वदक्षा ॥ आश्रितांच्या कल्पवृक्षा । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ५१ ॥ काळांतरीं देणें । कल्पतरूतें अश्लाघ्यवाणें ॥ तूं कैवल्य कल्पतरु अससी पूर्णपणें । दाता तत्काळ देणारा ॥ ५२ ॥ तूं स्मृतकामधेनू अससी । भक्तमनोरथ जाणसी ॥ तत्काळची पूर्ण करिसी । चिंतक चिंतामणी तूं ॥ ५३ ॥ क्षुधा लागली अंतरीं । अन्न देतां काळांतरीं ॥ हें कैसें साजेल तुज हरी । विश्वंभरा दयाळा ॥ ५४ ॥ क्षुधेंत घालितां अन्न । तृषेंत पाजितां जीवन ॥ ऐशा दात्यासि शरण । याचक येती ॥ ५५ ॥

यौवन गेलिया विवाह करणें । जळ वाळल्या सेतू बांधणें ॥ बालत्व गेलिया खेळवणें । दिधलें जैसें ॥ ५६ ॥ भिक्षेसि आलों तुझिये द्वारीं । देईन म्हणतोसि काळांतरीं ॥ सर्वज्ञ समर्था श्रीहरी । केवीं साजे सर्वज्ञा ॥ ५७ ॥ आतांच देई अभय-दान । शरण शरण नारायण ॥ कांहीं माझे दोषगुण । पाहूं नको दयाळा ॥ ५८ ॥ श्रीरामातें येईल जो शरण । त्यातें देईन अभयदान ॥ हें माझें व्रतचि जाण । ऐसें बोलिले श्रीस्वामी ॥ ५९ ॥ आयकोन स्वामीचें वचन । अभय मागाया आलों शरण ॥ तुझिये चरणीं लोटांगण । घातलें देवा ॥ ६० ॥ विश्वास धरूनी धरले पाय । माझी उपेक्षा करूं नये ॥ रक्ष रक्ष नाना उपायें । दीनदयाळा गोविंदा ॥ ६१ ॥ आशा लावून निराशा करणें । शरणागतातें त्यागणें ॥ आणि बिरुदेंही मिरवणें । हें कैसें साजे सर्वज्ञा ॥ ६२ ॥ समदर्शी पतित-पावन । निरपेक्ष दाता निजलाभपूर्ण ॥ क्षमावंत दयासागर जाण । ऐशीं ब्रीदें गाजती ॥ ६३ ॥ अन्यथाकर्तुं समर्थ । ऐसें बोलती यथार्थ ॥ शरण येतां मनोरथ । पूर्ण करिसी श्रीरामा ॥ ६४ ॥ प्रणतार्तिविनाशन । दासाभिमानी नामपावन ॥ ऐसीं बिरुदें दयाघन । भुवनत्रयीं गर्जती ॥ ६५ ॥ बिरुदांचा धरोनि भरंवसा । शरण आलों जग-दीशा ॥ आतां कैसी निराशा । करितोस माझी ॥ ६६ ॥

मी क्षुद्र माझें करणें क्षुद्र । लघू मन माझें बोलणें अभद्र ॥ आतां कैसें रामचंद्र । करावें तें सांगावें ॥ ६७ ॥ समर्थांचा मान करिती । लघूजनातें अव्हेरिती ॥ हे तों प्राकृतजनाची रीती । प्रसिद्ध आहे ॥ ६८ ॥ जे आप्त सखे सोयरे । त्यांतें पूजिती आदरें ॥ पराव्यातें पाठमोरे । होती जन ॥ ६९ ॥ पूर्वी ज्यांणीं साधन केलें । भक्तिभजनें निर्मळ झाले ॥ त्यांतें तुम्हीं सांभाळिलें । सद्गुरुराया ॥ ७० ॥ जे आप्त सोयरे बंधुजन । त्यांचा राखिला मान ॥ मातें जाणोनी साधनहीन । उपेक्षा करितां हें काय ॥ ७१ ॥ ही तों झाली जनाची रीती । तुज न साजे रमापति ॥ खद्योत प्रकाशाची अपेक्षा गभस्ती । न करी सर्वथा तेजोमय ॥ ७२ ॥ तैसें आम्हीं क्षुद्र साधन करावें । तेणें आपण संतुष्ट व्हावें ॥ नंतर आम्हां अभय द्यावें । हें सर्वथा अनुचित ॥ ७३ ॥ आम्हांसि देवानि कष्ट । कैसा होईन म्हणतोसी संतुष्ट ॥ 'मी समदर्शी' ऐसें स्पष्ट । स्वमुखेंची बोलतोसी ॥ ७४ ॥ तूं निजानंदेंचि संतुष्ट अससी । माझे करणीची केविं अपेक्षा करिसी ॥ तक्र मागणें अमृतासी । केवीं घडे ॥ ७५ ॥ काय करूं पहावें साधन । आळसी अंगचोर गुणविहीन ॥ नानाप्रकारचीं अवलक्षणें । अंगीं माझ्या वागती ॥ ७६ ॥ भाग्यहीन सेवाहीन । भक्तिहीन भावहीन ॥ आचारहीन कुळहीन । अधमपापी

मूढ मी ॥ ७७ ॥ दांभिक कपटी कुटिल । खोटा घातकी कुश्चळ ॥ भूमीभार कंटकी केवळ । नष्ट दोषी दुरात्मा ॥ ७८ ॥ ऐसा हतदैव पामर । अन्यायाचा नाहीं पार ॥ आतां तुझिये चरणीं नमस्कार । करितों स्वामी दयाळा ॥ ७९ ॥ तुझी कास धरिली । नाना अकर्मे कुकर्मे केलीं ॥ सर्व देवा पोटीं घातली । पाहिजेत स्वामी ॥ ८० ॥ तुझिये भरंवशावरी । खरी खोटी बाजीगिरी ॥ करोनि वागलों संसारीं । क्षमावंता दयानिधे ॥ ८१ ॥ पति असतां शिरावरी । व्यभिचारकर्मी प्रवर्ते नारी ॥ गर्भ राहिला जरी उदरीं । तरी आधार पतीचा ॥ ८२ ॥ तैसा मी खोटा परी तुझा दास । तुझीच धरिली असे कांस ॥ आतां दयाळा उदास । होऊं नको मजविषयीं ॥ ८३ ॥ माझे साधनाची अपेक्षा । काय तूतें निरपेक्षा ॥ धांव घालीं दयादक्षा । पूर्ण उदारा दयावरा ॥ ८४ ॥ तूतें आपपर नाहीं । सम समान सर्वही ॥ लहानथोर तुझेठायीं । असेचिना ॥ ८५ ॥ सेवा अपेक्षोनि दान देणें । ही दात्याचीं नव्हे लक्षणें ॥ म्हणोनी आतांच धांवणें । घालीं सद्गुरो श्रीरामा ॥ ८६ ॥ मी आपलीच करणी करोन । जरी मनोरथ करितों पूर्ण ॥ तरी मग तुझेच चरणा शरण । कासया येतों ॥ ८७ ॥ मज प्रारब्धाचा भरंवसा नाहीं । तुझेच पायीं पडलों पाहीं ॥ आतां रक्ष रक्ष नाना उपायीं । दत्तदेवा ॥ ८८ ॥

माझिये अंतरींचें दुःख । काय जाणें दुसरा लोक ॥ जाणसी तूं सर्वज्ञ एक । कृपासिंधो सद्गुरो ॥ ८९ ॥ माझिया अंतरींची ज्वाळा । शांत करणें तमाळनीळा ॥ आलिंगन देउनी गोपाळा । निजभुजें मज ॥ ९० ॥ जरी मी अपवित्र अमंगळ । तूं ज्ञानघन सोज्वळ ॥ तथापि तुझेंच मी दीनबाळ । कंटाळा माझा न करावा ॥ ९१ ॥ माता शुद्ध निर्मळ । बाळकातें वाहे मूत्रलाळ ॥ तरी माता प्रतिपाळ । करी अंगें आपुल्या ॥ ९२ ॥ मातेनें बाळक परतें केलें । तरी त्याचें काय चाले ॥ फिरोनि रडूं लागलें । मातेचि साठीं ॥ ९३ ॥ तें जरी आक्रंदोनी रडे । माताच बुझावी घेउनी कडे ॥ अमंगळ असतांही आवडे । बाळक मातेसी ॥ ९४ ॥ मी अमंगळ तुझें बाळक । तूंचि माझी जननी जनक ॥ तूंचि गुरु स्वामी एक । दत्तात्रेया श्रीरामा ॥ ९५ ॥ 'मातेकृपेपरीस । देवकृपा अनंतगुण विशेष' ॥ ऐसें बोलती महापुरुष । संत साधू अनुभवी ॥ ९६ ॥ हें वाक्य सत्य असावें । माझिये अनुभवास यावें ॥ आतांच येउनी सांभाळावें । दत्तात्रेया सद्गुरु ॥ ९७ ॥ मी तों कुपंथाचा वोहळ । तूं भागीरथी सोज्वळ ॥ गुरुगंगेस मिळतां गंगाजळ । होईन स्वामी ॥ ९८ ॥ म्हणोनि माझा कंटाळा । न करीं विशुद्धा निर्मळा ॥ आतांच येऊं दे कळवळा । माझा अनाथाचा ॥ ९९ ॥ आतांच मज

अभय देसी । तरी काय दुष्काळ तुज समर्थासी ॥ अनंत-बळा अनंत गुणराशी । दत्तात्रेया ॥ १०० ॥ तूं सकळ-गुणसंपन्न । सकळसामर्थ्ये पूर्ण ॥ म्हणोनि आतांची मनो-रथ पूर्ण । करीं माझे दयाळा ॥ १०१ ॥ माझियेसारखा हतभाग्य पाहीं । तूतें शरण आला नाहीं ॥ आतांच प्रसंग पडला पाहीं । ऐसा तुज ॥ १०२ ॥ ऐशा प्रसंगीं ऐशा काळीं । ऐसा कामी ऐसा कुश्चळी ॥ एवढाच आला वन-माळी । शरण तूज ॥ ३ ॥ स्वामीनीं बिरुदें वागविलीं । त्यांची परीक्षा नाहीं घेतली ॥ आतांच वेळा प्राप्त झाली । घेई परीक्षा बीदांची ॥ ४ ॥ घोर कर्लाचें वागणें । मज ऐशा पामराचें मागणें ॥ मागतों तसें आतांच देणं । सर्व-समर्था सद्गुरो ॥ ५ ॥ मागतों तसें आतां न देसी । तरी उणीव सामर्थ्यासी ॥ सर्वसामर्थ्यवंत होसी । कैसा मग ॥ ६ ॥ ऐशियातें ऐसें पाहीं । आतांच अभय द्यावया कांहीं ॥ प्रभू अंगीं सामर्थ्य नाहीं । ऐसें बोलतील सर्वही ॥ ७ ॥ स्वामी सकळगुणसंपन्न । एवढ्याच गुणें आहेसि हीन ॥ ऐशिया ऐसें तत्क्षणींच दान । देत नाहीं ॥ ८ ॥ तरी गुणांचा अंत आला । सामर्थ्याना पार लागला ॥ मग अनंतगुण अनंतशक्ती या बोला । ठाव कैंचा ॥ ९ ॥ तुझे अंगीं कोणतें सामर्थ्य नाहीं । कोणता गुण नसे पाहीं ॥ सर्व गुण सर्व सामर्थ्य तुझे ठायीं । असे दयाळा सद्गुरो

॥ ११० ॥ तुझे अंगीं सकळकळा । समर्थ वापरती गोपाळा ॥ अझोनि माझा कळवळा । कां नये दयासागरा ॥ ११ ॥ माझियेसारखा अनर्था । कारण आला ऐसा आर्ती ॥ आतांच भिक्षा घावया श्रीकृपामूर्ती । संकट काय पडलें तुज ॥ १२ ॥ हा काय महाप्रसंग पडला । म्हणोन विलंब लाविला ॥ किंवा कांहीं उणा झाला । पराक्रम स्वामीचा ॥ १३ ॥ अनंतशक्ती अचलशक्ती । अपारशक्ती अमोघशक्ती ॥ अव्ययशक्ती शाश्वतशक्ती । दयासिंधो सद्‌गुरो तूं ॥ १४ ॥ आतां कोणता विचार करिसी । कायसा विलंब लाविसी ॥ धांव दयाळू हृषीकेशी । दीनबंधो सद्‌गुरो ॥ १५ ॥ जरी मज आतांच देशी दर्शन । मागतों तें अभयदान ॥ कांहीं तुझें देवा उणें । होणार नाहीं ॥ १६ ॥ ऐसा पामराचा अंगिकार केला । म्हणोनि लौकिक बुडाला ॥ ऐसें कांहीं दयाळा । होणार नाहीं ॥ १७ ॥ आतां सर्वथा पुरुषोत्तमा । सर्वी अपराधीं करीं क्षमा ॥ तुझिया बिरुदांचा महिमा । अपार असे ॥ १८ ॥ तूं 'सर्वतश्चक्षुः सर्वतःपाणिः । सर्वतःश्रोत्र' वेदवाणी ॥ माझी दीन वाणी तुझिये कर्णीं । कैसी न पडे सर्वज्ञा ॥ १९ ॥ सर्वज्ञासी कैसें सांगावें । कैसें हृदय उकलोनि दाखवावें ॥ सांग आतां काय करावें । दयासिंधो सद्‌गुरो ॥ १२० ॥ तूंचि माझा वशिला अससी । शिवपार्वती रूपें धरोनि

शोभसी ॥ आतां पदर कवणापाशीं । पसरूं स्वामी सांगावें ॥ २१ ॥ तूं स्वामी तूं गुरू । तूंच वशिला शंकरू ॥ तूतेंच पसरितों पदरू । भिक्षा घालीं दानशूरा ॥ २२ ॥ शरण आलों विज्ञानघना । भावें वंदितों तुझेचि चरणा ॥ आतां धांवोनि करुणाकेतना । भिक्षा घालीं मजलागीं ॥ २३ ॥ अधैर्याचें धैर्य पाहसी । असत्त्वाचें सत्त्व घेसी ॥ दयाळू असतां विचार करिसी । दुःख दावावयाचें ॥ २४ ॥ आतां कोणते वनीं जाऊं । सर्वव्यापकासी कोठें पाहूं ॥ कैसें स्वामी हृदय दावूं । उकलोनियां ॥ २५ ॥ आम्हीं वनोवनीं फिरावें । उपवासही करावे ॥ आणि स्वामींनीं पाहावें । हें कैसें दयाळूपण ॥ २६ ॥ आम्हीं भोगावे कष्ट । मग स्वामींनीं व्हावें तुष्ट ॥ ही करणी कैसी वरिष्ठ । म्हणावी दयासिंधूची ॥ २७ ॥ आम्हीं शीतउष्णादि दुःख भोगिलें । तेणें तुमचे हातीं काय आलें ॥ आतांच कृपा करूनि हृदयीं धरिलें । तरि काय गेलें समर्थाचें ॥ २८ ॥ शरणागताची उपेक्षा । कैसी करितोसी सर्वदक्षा ॥ सर्वज्ञ सिद्धा अंतरिक्षा । दत्तात्रेया श्रीरामा ॥ २९ ॥ शरण तरी कैसें यावें । कोणत्या देशांत जावें ॥ किंवा नग्न होउनी हिंडावें । भूमीवरी ॥ १३० ॥ किंवा सोडूं आतां अशन । किंवा फिरावें रानोरान ॥ किंवा द्यावा आपुला प्राण । गडीगडदीकूपांत ॥ ३१ ॥ मी तों सर्वथा शरण आलों । स्वामीचे पायीं पडलों ॥ सन्मुख उभा

राहिलों । हात जोडोनी ॥ ३२ ॥ तुमचे मनाजोगा शरण । कैसा येऊं दयाघन ॥ नेणे मूढ अज्ञान । दास तूमचा ॥ ३३ ॥ माझें शरण येणें आवडेना । माझी विनंति न ये मना ॥ तरि मज सांगावी खुणा । शरण येण्याची ॥ ३४ ॥ मी तों पडलों तुझे पायीं । व्हावें तेसें करून घेई ॥ धांव घालीं माझे आई । आतांचि तूं ॥ ३५ ॥ मी तुज सर्व प्रकारें रुजू आहें । सर्वज्ञ स्वामी जाणताहे ॥ आतांच मजला अभय द्यावें । सर्वज्ञा समर्था सद्‌गुरो ॥ ३६ ॥ त्रिविध तापें तापलों । तुझिये चरणा शरण आलों ॥ आतां कैसा दयाळो । त्याग करिसी दीनाचा ॥ ३७ ॥ भिऊन पळालों मृत्यूशीं । लपलों तुझिये पाठीशीं ॥ कैसा मातें धरोनि देसी । शरणागतवत्सल तूं ॥ ३८ ॥ तुच्छ मनुष्यांचे पाठीं रिघतां । तेही रक्षिती सर्वथा ॥ ब्रह्मांडाधीशा अनंता । कैसा त्यागिसी समर्थ तूं ॥ ३९ ॥ तूतें येतों काकुळती । आतां अंत पहासी किती ॥ धांव दयाळा रमापती । दत्तात्रेया श्रीरामा ॥ ४० ॥ कोणा भाकूं करुणा । कोण जाणेल जीवांच्या खुणा ॥ तुजवांचोनि नारायणा । दत्तात्रेया सद्‌गुरो ॥ ४१ ॥ मी वधार्ह अपराधी खरा । तुझे पायीं पडलों क्षमासागरा ॥ आतां माझा रमावरा । अंगिकार करीं ॥ ४२ ॥ वधायोग्य अपराध करिती । मनुष्यांतें शरण येती ॥ त्यांतें मानवही रक्षिती । दयाळूपणें ॥ ४३ ॥ तूं तों

त्रैलोक्याचा धनी । चक्रधर चापपाणी ॥ अनंतबल वेद वर्णी । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ४४ ॥ ऐशा स्वामीतें शरण आलों । कैसा त्यागिसी दयाळो ॥ धांव आतां मागलों । फार देवा तुजसाठीं ॥ ४५ ॥ आतां अपराधादि नको स्मरूं । न करीं विलंबाचा विचारू ॥ नको आतां दूर धरूं । शरणागतातें मज देवा ॥ ४६ ॥ माझें तुज कांहींच आवडेना । तरी कैसें करूं नारायणा ॥ मज सर्वथा राहवेना । तुजवांचोनी ॥ ४७ ॥ तुजसाठींच तळमळी । तूतें पसरिली आज झोळी ॥ अभय देउनी भिक्षा घालीं । रामचंद्रा सद्गुरो ॥ ४८ ॥ तुजवीण कोण जाणे दुःख । कोण निवारी तहानभूक ॥ आतां दाखवीं देवा मुख । सद्गुरुराया ॥ ४९ ॥ द्रौपदी आणितां शत्रूंनीं । तिची हांक ऐकिली कानीं ॥ धांवोनियां चक्रपाणी । लज्जा अंगीं रक्षिली ॥ १५० ॥ कोणा हातीं निरोप धाडिला । कैसा वृत्तांत कळला ॥ मजविषयींच स्वामीला । निद्रा कैसी लागली ॥ ५१ ॥ गजेंद्राची हांक । कैसी आइकिली रमानायक ॥ माझेंच कैसें पाप देख । ओढवलें दयाळा ॥ ५२ ॥ माझा स्वामी आनंदघन । मी तों भोगितों कष्ट दारुण ॥ याची लज्जा करुणाघन । असों द्यावी सर्वज्ञा ॥ ५३ ॥ माझी हांक चक्रपाणी । कैसी न पडे तुझिये कानीं ॥ सर्वज्ञता काय हिरोनि । नेली कोणी समर्थाची ॥ ५४ ॥ कटाहास लागतां

अग्निज्वाळ । तूतें आठवी मंडूक बाळ ॥ तयातें रक्षिलें तत्काळ । सर्वज्ञ नाथा ॥ ५५ ॥ उपमन्यूतें क्षीरसागर दिला । ध्रुव अचळपदीं बैसविला ॥ लाक्षागृहीं पांडवांला रक्षियेलें ॥ ५६ ॥ सुदाम्यातें कांचनपुरी । बिभीषणातें लंका नगरी ॥ सुग्रीवातें किष्किंधा हरी । दिधली स्वयें ॥ ५७ ॥ गजघंटेखालीं । पक्षिणीचीं बाळें रक्षिलीं ॥ तीं कैसीं विदित झालीं । पांडुरंगा ॥ ५८ ॥ कित्येक वर्णावे पवाडे । सामर्थ्याचें दळ वाडे ॥ वेदशास्त्रां मौन पडे । गुण वर्णितां अनंताचे ॥ ५९ ॥ अनंताचे अनंत गुण । कैसा वर्णूं हीन दीन ॥ आतां आपलें दयाळुपण । प्रकट कीजे मजविषयीं ॥ १६० ॥ जरी माझे अपराधांचा । रागचि आला तुज साचा ॥ वधचि करिसी शरणागताचा । तरी विनंति परिसावी ॥ ६१ ॥ लोकीं प्राणांत दंड करिती । परि तयाचें अभीष्ट देती ॥ 'इच्छा असेल तें माग' म्हणती । वध्यातें ॥ ६२ ॥ तेवीं माझा मनोरथ जाण । जाणोनियां करीं पूर्ण ॥ मग माझा घेईं प्राण । सर्वेश्वरा सद्गुरो ॥ ६३ ॥ माझें आर्तीचें बोलणें । जरी बोलिलों अधीक उणें ॥ हेंही स्वामी क्षमा करणें । कृपाळूपणें ॥ ६४ ॥ दोघे येतां शरण । एकास देणें अभयदान ॥ एकाचा घेशी प्राण । हें उचित कैसें समदर्शी ॥ ६५ ॥ ध्रुवादिकांतें वरदान । माझा घेसी जाणोनि

प्राण ॥ ऐसें सांप्रत नारायण । कैसें मानलें ॥ ६६ ॥ आतां 'ध्रुवादिकांसी । बरोबरी करितोस कैसी' ॥ ऐसें म्हणाल तरी समदर्शी । नाम स्वामीचें ॥ ६७ ॥ ध्रुवादिकांचे तपकरणी गुण । मी हीणाहूनी हीण ॥ परी स्वामीतें समसमान । दोघे असती ॥ ६८ ॥ 'ध्रुवादिकीं करणी केली । तेणें आपुली कृपा झाली' ॥ ऐसें म्हणाल तरी फळली । त्यांची करणी तयांतें ॥ ६९ ॥ मी कमाईचा हीन । माझी उपेक्षा करिशी म्हणोन ॥ तरी तुझें ब्रीद लाजिरवाण । होईल स्वामी ॥ १७० ॥ आम्हीं करणीचे दक्ष असावें । करणीचें फळ पावावें ॥ मग तुज शरण यावें । कासयासी ? ॥ ७१ ॥ मग तो करणीच फळली । ऐसें होईल वनमाळी ॥ तेणें तुझी ब्रीदावळी । केशी राहील दयाळा ॥ ७२ ॥ करणी करूनि शरण यावें । मग आपण अभय द्यावें ॥ ऐसें असतां ब्रीद वागवावें । हेंही अनुचित ॥ ७३ ॥ करणीची अपेक्षा कीजे । मग त्यातें अभय दीजे ॥ ऐशियानें केशी साजे । ब्रीदावळी अनंता ॥ ७४ ॥ तूतें करणीची अपेक्षा नाहीं । तूं स्वयें तृप्त असशी पाहीं ॥ समदर्शी समर्थही । तसाच असशी वासुदेवा ॥ ७५ ॥ आतां कैसी करावी विनंती । कैसा येऊंजी काकुळती ॥ कैसी करावी तुझी तृप्ती । नित्यतृप्ता आनंदघना ॥ ७६ ॥ पूर्वीं शरणागतांनीं आळविलें । त्यांतें तात्काळची अंगिकारिलें ॥

माते कैसें उपेक्षिलें । दयासिंधो ॥ ७७ ॥ त्यांहीं स्तवनांत काय मेळविलें । तेणें स्वामीतें गोड झालें ॥ माझें फिकें लागलें । कासयानीं ॥ ७८ ॥ त्यांहीं भक्तियुक्त आळविलें । माझें कोरडेंचि आळवणें झालें ॥ तेणें अधीक उणें गमलें । असेल कांहीं ॥ ७९ ॥ समर्थाचें घृतयुक्त भोजन । अनाथाचें कोरान्न ॥ दोन्ही तूतें समसमान । आहेस समदर्शी ॥ १८० ॥ जो यज्ञीं यज्ञभाग लाहे । तो विदूराच्या कण्या खाये ॥ कोरडे फके मारीत आहे । सुदाम्याच्या तांदुळांचे ॥ ८१ ॥ तैसें मी कोरडें अथवा ओलें । यथामतीनें आळविलें ॥ तेणें आतां सतुष्ट झालें । पाहिजेच स्वामी ॥ ८२ ॥ तूं आमुचा धनी समर्थ होशी । आम्हां दारोदार हिंडविशी ॥ मुखाकडे पाहविशी । दुसऱ्यांच्या ॥ ८३ ॥ मज अधैर्यासी धैर्य नाहीं । म्हणोनि घाबरा झालों पाहीं ॥ आतां धांव लवलाहीं । सर्वज्ञ दयाळू समदर्शी ॥ ८४ ॥ मी अपराधी म्हणोनी । बोभाट यावा तुझे कानीं ॥ रागें भरोनि तरी चापपाणी । स्मरण करीं अनाथाचें ॥ ८५ ॥ कसा तरी सर्वज्ञ देवा । माझा वृत्तांत कळावा ॥ माझा समाचार घ्यावा । आंगें आपुल्या ॥ ८६ ॥ काय माझी ओळखी मोडली । किंवा माझी विस्मृती पडली ॥ कैशी माझी सांड केली । सद्गुरु माये ॥ ८७ ॥ आतां आम्हीं काय करावें । कोठें कोठें फिरावें ॥ वांचवें किंवा मरावें । हेंही सुचेना ॥ ८८ ॥ तुझी आशा

मोठीच धरिली । कैसी निराशा करितोस वनमाळी ॥ यद्यपि नाहीं माझे कपाळीं । तथापि भरंवसा तुझा असे ॥ ८९ ॥ काय मशकें सागर शोषिला । हयगजाचि गोष्पदांत बुडाला ॥ सर्वसमर्थानें त्याग केला । शरणागताचा ॥ १९० ॥ तुझा क्षीरसागर झाला कोरडा । काय वैकुंठावर पडला दरोडा ॥ किंवा झाला निःशेष झाडा । भांडारगृहाचा ॥ ९१ ॥ किंवा लक्ष्मी हिरोनि नेली । किंवा वनमाळा गहाण पडली ॥ काय कौस्तुभमणीची चोरी झाली । सांग देवा ॥ ९२ ॥ चिंतामणी फुटले । किंवा कल्पतरू वाळले ॥ कामधेनूचे समुदाय नेले । वळोनि कोणीं ॥ ९३ ॥ सुदर्शनाची धार मोडली । किंवा गदा समुद्रांत बुडाली ॥ असिलता सामावली । पाताळांत ॥ ९४ ॥ काय तुझें धनुष्य मोडलें । बाणाचीं झालीं शकलें ॥ अस्त्रप्रयोगाचें पडलें । विस्मरण ॥ ९५ ॥ पूर्वीचा स्वभाव गेला । काय दुःसंगाचा गुण लागला ॥ उपेक्षिसी शरणागताला । सर्वज्ञ समर्थ असोनी ॥ ९६ ॥ अनंत राक्षस वधिले । तेणें हृदय कठीण झालें ॥ सखया कां रे टाकिलें । दूर मज ॥ ९७ ॥ किंवा मजविषयीं कोणीं । कांहीं सांगितलें तुझिये कानीं ॥ तेणें मातें अव्हेरुनी । बैसलासी सर्वज्ञा ॥ ९८ ॥ आतां कैसा राहूं । कोणाचे मुखाकडे पाहूं ॥ कैसे तुझे पाय पाहूं । कोणत्या प्रकारें ॥ ९९ ॥ सर्वत्र स्फुरसी ऐकसी । सर्वांचें सर्व जाणतोसी ॥

माझेंच मनावर न घेसी । दयाघन तूं ॥ २०० ॥ कोणता उपाय करावा । कोणाहातीं निरोप पाठवावा ॥ कैसा वृत्तांत कळवावा । सर्वज्ञ व्यापकासी ॥ १ ॥ जे कां मांडलीक भूपती । त्यांचे दूत सर्वत्र हिंडती ॥ दूतद्वारा जाणती । वर्तमान सर्वांचें ॥ २ ॥ खरा खोटा कोण कैसा । आला गेला सर्वत्र ऐसा ॥ शोध घेती जगन्निवासा । सर्व राजे ॥ ३ ॥ तूं अनंत ब्रह्मांडाचा स्वामी । सर्वसाक्षी अंतर्यामी ॥ दत्तात्रेया स्मृतिगामी । वृत्तांत माझा न कळे तुज ॥ ४ ॥ दंभ माया खोटाई । जे जे केली असेल कांहीं ॥ शुभाशुभ सर्वही । तुझेसाठीं गोविंदा ॥ ५ ॥ तुम्हींच सारें घडविलें । तुम्हींच आम्हां वागविलें ॥ आम्हीं तुमचे हातीं हात दिधले । म्हणोनि स्वामी ॥ ६ ॥ जें जें कांहीं करितों । जें जें कांहीं करीन म्हणतों ॥ जें अकस्मात् अनुभवितों । तें सर्व स्वामीकडे ॥ ७ ॥ अथवा मजकडेच लाविसी सर्वथा । तरी पोटीं घालीं क्षमावंता ॥ दीनदयाळा अनंता । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ८ ॥ तूं तुझा केला स्वभाव । कैसा करूं शकतोसि वाव ॥ जरी करणें तरी स्वयमेव । तूंचि करीं ॥ ९ ॥ चंदनाचे संगती । इतर वृक्ष चंदन होती ॥ तैसें करावें श्रीपती । आपुले सेवे योग्य मज ॥ २१० ॥ चंदना अंगीं सामर्थ्य नाहीं । म्हणोन वंशवृक्ष चंदन न होय पाहीं ॥ तुझे अंगीं सर्वही । सामर्थ्य असे ॥ ११ ॥

अन्यथाकर्तुं समर्थ अससी । पाषाणाचा चंदन करिसी ॥ ऐसें असतां श्रमविसी । शरणागतातें दयाळा ॥ १२ ॥ देवा आतां झाली सीमा । कैसा वर्णूं तुझा महिमा ॥ आतां धांव पुरुषोत्तमा । दत्तात्रेया सद्गुरो ॥ १३ ॥ ब्रह्मादिकांनीं आळविलें । त्यांतें तत्काळ दर्शन दिधलें ॥ तें स्वामीचे कर्णीं पडलें । तेचि वेळे ॥ १४ ॥ मी आळवोनि मारितों हांका । हाय कैसे स्वामी नायका ॥ फार काळ झाला देवा । आळवितां तुज ॥ १५ ॥ मी हीनदीन बापुडें । म्हणोनि माझें बोलणें नावडे ॥ समर्थाचें कैसें आवडे । समदर्शी सर्वज्ञा ॥ १६ ॥ आतां कांहीं सुचेना । फार झाली यातना ॥ कैसें करूं नारायणा । सांग मज ॥ १७ ॥ खरा खोटा भाव माझा । सर्व जाणसी सर्वज्ञ राजा ॥ आतां कैसा तरी तुझा । असें स्वामी ॥ १८ ॥ दुःखितासी दुःख देसी । मृत्यासीच मारिसी ॥ आणि दयाळुत्व मिरविसी । हें आश्चर्य देवा ॥ १९ ॥ आपुल्याच कर्मे भोगितों कष्ट । परी तूतें आळवितों स्पष्ट ॥ आतां पापी दुष्ट नष्ट । तरी तुझा असें दयाळा ॥ २० ॥ जरी म्हणसील तुज दुःख । काय झालें असे देख ॥ तरी सर्वज्ञ तूंचि एक । सर्वही जाणसी अंतरींचें ॥ २१ ॥ जो सर्व जाणे । तयास सांगावें. कैसें कवणें ॥ अंतरींच्या खुणा जाणे । सर्वज्ञ स्वयें ॥ २२ ॥ स्वामींनीं मज कांहीं ।

सर्वथा उणें केलें नाहीं ॥ तथापि माझे अंतरीं पाहीं । समाधान नसे ॥ २३ ॥ यासी आम्हीं काय करावें । कोणासि काकुळती यावें ॥ कोण जाणे आघवें । दुःख माझें तुजविण ॥ २४ ॥ मज सर्वथा चैन नसे । याचा उपाय तुजपाशीं असे ॥ माझा त्राता कोणीच नसे तुजवांचोनी ॥ २५ ॥ तूं सर्व जाणसी । सर्वसमर्थ असती ॥ कष्ट कैसे पाहसी । शरणागताचे दयाळा ॥ २६ ॥ मोठा भरंवसा धरून । सर्वथा तूतेंच आलों शरण ॥ रक्ष रक्ष नारायण । आतांच मज ॥ २७ ॥ आतां न लावीं उशीर । तूतें पसरीतसें पदर ॥ करितों साष्टांग नमस्कार । करुणासिंधू गुरूतें ॥ २८ ॥ आतां न यावा राग । सर्वथा न करीं माझा त्याग ॥ आतांच आपले चरणाचा योग । घडों दे मज ॥ २९ ॥ धांव आतां वनमाळी । अभयकरें कुरवाळीं ॥ अंगेंच मजला जेवूं घालीं । प्रसाद ताटींचा ॥ २३० ॥ वेदसार शब्दाचें कवळ । माझिये श्रवणीं घालीं निश्चळ ॥ तेणें माझें अंतर शीतळ । करीं वेगें दयाळा ॥ ३१ ॥ भूत प्रेत रक्षोगण । यांचें करितां भजन ॥ तेही राखिती मान । शरणागताचा ॥ ३२ ॥ आपुले घरींचें श्वान । दुःख पावतां जाण ॥ त्याचाही समाचार घेती जन । आपलें जाणोनी ॥ ३३ ॥ माझी हांक पडेना कानीं । कैसें करूं मी चक्रपाणी ॥ कैशी तुझी विनवणी । करूं आतां

॥ ३४ ॥ कोठें निद्रा लागली । किंवा समाधी साधिली ॥ किंवा माझी भूल पडली । दत्तात्रेया ॥ ३५ ॥ किंवा भक्तांचे कीर्तनीं । तटस्थ बैसला जावोनी ॥ आतां कोठें गुंतोनी । पडलास देवा ॥ ३६ ॥ मी महापातकी म्हणून । मुनींचे हृदयीं बैसलासि दडून ॥ किंवा गरुड नेला हिरून । कोणी तुझा ॥ ३७ ॥ फार मारिले राक्षस । त्याचा शीण आला काय विशेष ॥ म्हणोनि बैसलासी सावकाश । न येसी त्वरें ॥ ३८ ॥ तुझा भांडार असे भरला । कोणीं घाला घालोनि नेला ॥ किंवा कोणीं धरोनि नेला । अनंतबळा ॥ ३९ ॥ किंवा भक्तां घरीं फार जेविला । तेणें तुजला आळस आला ॥ सांग, किंवा नाश झाला । अनंत गुणांचा ॥ २४० ॥ किंवा तुझें कोण मेलें । तेणें तुजला सुतक आलें ॥ किंवा तूतें बांधोनि नेलें । अहिरावणें मागुती ॥ ४१ ॥ तुझे पायीं घातली बेडी । कोणी कोंडोनि लाविली कडी ॥ किंवा तूतें लक्ष्मी न सोडी । म्हणोन न येशी ॥ ४२ ॥ किंवा माझा वीटचि आला । काय पतीत जाणोनि त्याग केला ॥ किंवा संकल्प केला । शरणागताचे वधाचा ॥ ४३ ॥ शरणागताचा त्याग केला । तरी तो वधचि झाला ॥ त्याग आणि वधाला । अंतरचि नसे ॥ ४४ ॥ मायेनें बाळ वधिलें । तरी बाळकाचें काय चाले ॥ तैसें जरी देवें केलें । तरी आम्हीं काय

करावें ॥ ४५ ॥ जैसा फांसीं पारधी । कण घालोनि जंतू वधी ॥ तैसीच देवें मजला आधीं । लालूच दाखविली ब्रीदांची ॥ ४६ ॥ ब्रीदें ऐकोनि विश्वासलों । समर्थासी शरण आलों ॥ दोन्हीकडे अंतरलों । प्रपंच ना परमार्थ ॥ ४७ ॥ क्षीण झाली काया । आयुष्य चाललें वायां ॥ मुकलों आतां दोहीं ठायां । हाय देवा काय हें ॥ ४८ ॥ व्याधें बीन वाजविला । लोभें मृग तल्लिन झाला ॥ तल्लिन होतां फांसीं पडला । प्राण घेणें ॥ ४९ ॥ मृगापरी मातें झालें । ब्रीदें गावोनि भुलविलें ॥ शेवटीं आतां अंतर दिलें । प्रसंग पडतां ॥ २५० ॥ वांचतां दुःखचि पहावें । मेलों तरी व्यर्थचि जावें ॥ दोहींकडे घातलें देवें । संकष्ट मज ॥ ५१ ॥ लोक जेविती स्वस्थ निजती । देशीं विदेशीं आनंद करिती ॥ माझी केशी दुर्गती । मांडिली देवें ॥ ५२ ॥ देवास काय म्हणावें । आपलेंच भोगावर घ्यावें ॥ केलें तैसें भोगावें । दुःख देहीं ॥ ५३ ॥ असतों कमाईचा भरपूर । तरी देवही करिता अंगिकार ॥ मी क्षुद्र म्हणोनि अव्हेर । देवही करी ॥ ५४ ॥ देवदेवें वंचिलों । चिंताडोहीं बुडालों ॥ उभय लोकां मुकलों । आपुल्या कर्में ॥ ५५ ॥ मध्यसमुद्रामाजी देखा । जैशी फुटोनि गेली नौका ॥ तैशी अवस्था माझी देखा । सद्‌गुरु स्वामी ॥ ५६ ॥ भोंवती वन्हिज्वाळा भडकली । मध्येंच धेनू सांपडली ॥

तैसीच गती माझी झाली । सर्व जाणसी सर्वज्ञा ॥ ५७ ॥ आठवेना संध्यास्नान । राहिले नेम अनुष्ठान ॥ नाहीं धारणा न घडे ध्यान । कांहीं मज ॥ ५८ ॥ देवा भांबावलें मन । न घडे तुझें नामस्मरण ॥ कांहीं न घडे साधन । सद्गुरू स्वामीचें ॥ ५९ ॥ जोडूनियां दोन्ही कर । स्वामीसि करितों नमस्कार ॥ भिक्षेकरितां रमावर । पसरिली अंजुळी ॥ २६० ॥ मज लेखूं नको परका । तूंचि माता पिता माझा सखा ॥ प्रणतदुःखनाशका । येऊनि आतां रक्षीं मज ॥ ६१ ॥ तूं तों जवळचि असती । सन्निध असतां अंत पाहसी ॥ म्हणोनि सर्वव्यापकासी । येई ऐसें म्हणतसें ॥ ६२ ॥ आतां वेगीं प्रकट होई । निजभुजें आलिंगन देई ॥ अभय देऊनि आपुले पायीं । ठेवीं मज ॥ ६३ ॥ आतां आपुला अभय कर । ठेवीं माझे शिरावर ॥ सकळ माझें दुःख दूर । करीं वेगें दयाळा ॥ ६४ ॥ आशा धरोनि वाट पाहें । दशदिशा अवलोकिताहें ॥ अझोनि न येशी करिसी काय । कार्यभार त्रैलोकींचा ॥ ६५ ॥ पुरे आतां कार्यभार । आतां न लावीं उशीर ॥ येऊनि माझा समाचार । घेई शरणागताचा ॥ ६६ ॥ तूं कृपाकटाक्षें अवलोकितां । काय दुष्कर लक्ष्मीकांता ॥ तुझाच भरंवसा अनंता । आहे मज ॥ ६७ ॥ आतांच काय एक न करिसी । सकळ कळा तुजपाशीं ॥

माझा अंत कां पाहसी । सर्वभूतसुहृदा तूं ॥ ६८ ॥ घोर कालिया मर्दून । निर्विष केलें यमुनाजीवन ॥ गोपाळ वत्स अवलोकून । सजीव केले ॥ ६९ ॥ पाषाणाची केली नारी । दगडची समुद्रीं तारी ॥ वानरांहातीं लंका नगरी । घेवविली ॥ २७० ॥ नखीं धरोनि गोवर्धन । केलें गोकुळाचें रक्षण ॥ दावाग्नी करोनी प्राशन । गोप धेनू रक्षियेल्या ॥ ७१ ॥ पार्थाचें सारथ्य केलें । लाक्षागृहीं रक्षिलें ॥ भीष्मावरी चक्र धरिलें । आपुली प्रतिज्ञा मोडोनी ॥ ७२ ॥ पार्थासाठीं सुभद्रा झाला । दिवसा भानू लपविला ॥ बळीच्या द्वारीं ठाकला । द्वारपाळ होवोनी ॥ ७३ ॥ पांडवांच्या मेळीं । काढिल्या उष्टचा पत्रावळी ॥ आपुल्या हातीं न्हाऊं घाली । पार्थाचे घोड्यांतें ॥ ७४ ॥ प्रल्हादातें गांजी बाप । तयासाठीं नृसिंहरूप ॥ धरोनियां आपोआप । रक्षण केलें भक्ताचें ॥ ७५ ॥ कुब्जा केली सुंदरी । दासी असतां अंगिकारी ॥ इंद्राकरितां वामन भिकारी । झालासि तूं ॥ ७६ ॥ जाणत असतां मृगापाठीं । धांव घाली भक्तांसाठीं ॥ होतां तुझी कृपादृष्टी । पांडवें जिंकिला संग्राम ॥ ७७ ॥ ब्रह्मास्त्रतेजें पोळतां । परीक्षिती रक्षिला तत्त्वतां ॥ दुर्वासें अंबरीष गांजितां । *रक्षा केली दयाळा ॥ ७८ ॥ ब्राह्मणाचें मृत बाळ । जिवंत केलें तत्काळ ॥

---

* रक्षण

तुझी लीला तमालनीळ । अपार असे ॥ ७९ ॥ देवा तुझी अघटितकरणी । कोण लोकत्रयीं वाणी ॥ मी तों जोडोनि दोन्ही पाणी । प्रार्थितों तुज ॥ २८० ॥ आतां माझी दया । येऊं देई दत्तात्रेया ॥ अनादिपुरुषा अप्रमेया । दर्शन देई पायांचें ॥ ८१ ॥ फार झाली वेळ । अंतरीं झाली हळहळ ॥ आतां माझी कळवळ । येऊं देई श्रीहरी ॥ ८२ ॥ मानवी राजाचे दरबारीं । मागूं आला भिकारी ॥ आक्रंदोनि हाका मारी । तरी राजे शोध घेती ॥ ८३ ॥ मानवी राजाचे घरीं । भिक्षा मिळते श्रीहरी ॥ साक्षात् तूं येतां तुझिये द्वारीं । भिक्षा न मिळे कैसी मज ॥ ८४ ॥ माझी दादही लागेना । कोणी येऊनि सांगेना ॥ हांकही कानीं पडेना । सर्वत्रश्रोतृ असतां तूं ॥ ८५ ॥ तूं अनंत, ब्रह्मांडाचा राजा । मी कैसा तरी आहें तुझा ॥ शरण जाणूनही माझा । त्याग करिसी हें काय ॥ ८६ ॥ अपराध करोनि शरण आलों । तुझे पायीं येऊनि पडलों ॥ आतां कैसा दयाळो । त्यागिशी मज ॥ ८७ ॥ महा अपराध करिती । शरण येवोनि चरण धरिती ॥ त्यांतें चोरही रक्षिती । शरणागत जाणोनि ॥ ८८ ॥ मी तों अभयार्थी आलों शरण । चक्र हाणोनि घेशी प्राण ॥ तरी कोणती कीर्ती देवा जाण । मेळविसी तूं ॥ ८९ ॥ अनंत मारिले राक्षस । तेणें न पुरली हौस ॥ शरणागताचे वधाचा

उल्हास । कैसा वाटला दयाळा ॥ २९० ॥ शरण येऊनि भाकितों करुणा । माझी मांडिली हेळणा ॥ नाना प्रकारची विटंबना । करिसी माझी ॥ ९१ ॥ मीं तों तुमचे हातीं हात दिले । शरण येवोनि चरण धरिले ॥ जैसें तुम्हीं नाचविलें । तैसा नाचलों ॥ ९२ ॥ समर्थाचा अंगिकार । पतिताचा अव्हेर ॥ अपराध्याचा अनादर । करिसी कैसा समदर्शी ॥ ९३ ॥ माझा अव्हेर करिसी । तरी काय भांडार आपुलें भरिसी ॥ जरी मातें अंगिकारिसी । तरी काय बुडेल हें सांग ॥ ९४ ॥ देवा दयाळा हृषीकेशी । कां मागें पुढें पाहसी ॥ माझी विनंती केसी न घेसी । चित्तावरी ॥ ९५ ॥ देवें शरणागत त्यागिला । ऐसा देखिला ना ऐकिला ॥ मजविषयीं कैसा निष्ठुर झाला । दीनदयाळु श्रीराम ॥ ९६ ॥ आतां किती भाकूं करुणा । धांव दयाळा आनंदपूर्णा ॥ दत्तात्रेया विज्ञानघना । सर्व-समर्था सद्गुरो ॥ ९७ ॥ तुझे दयेस नाहीं पार । कैसा होतोसि वज्रधर ॥ लोकीं करुणेचा जलधर । म्हणविसी तूं ॥ ९८ ॥ मज ऐसा पापी पूर्ण । पूर्वीं कोणीच न आला शरण ॥ मज ऐसा याचक जाण । भेटला नाहीं सर्वथा ॥ ९९ ॥ ऐसा पातकी ऐसें माग-णारा । सध्यांच अभयदान घेणारा ॥ मीच एकटा तुझिये द्वारा । आलों असें सर्वज्ञा ॥ ३०० ॥ सर्व

सामर्थ्य सर्व गुण । तुझे अंगीं असती जाण ॥ ऐसियासि ऐसें सध्यां दान । दिलें नाहीं कोणासी ॥ १ ॥ दैवहीन भिकारी । भिक्षार्थ आलों तुझे द्वारीं ॥ समर्थ असतां माघारीं । विन्मुख कैसा दवडिसी ॥ २ ॥ माझिये सारखा भिकारी । तूंहि असतास जरी ॥ तरी तुझिये द्वारीं । भिक्षार्थ कोण येते ॥ ३ ॥ त्रिभुवनाधीश लक्ष्मीपती । सामर्थ्यवंत प्रसिद्ध जगतीं ॥ उदार दाता रक्षक बोलती । वेदशास्त्रें पुराणें ॥ ४ ॥ ऐसें जाणोनि याचक भीत । भिक्षार्थ अभयार्ती शरण येत ॥ पुरविसी सर्वांचे मनोरथ । समर्था सर्वज्ञा ॥ ५ ॥ सामर्थ्य असतां उपेक्षिती । लक्ष्मी असतां भिक्षा न देती ॥ आणी उगीच प्रतिष्ठा मिरविती । ते थोर कैसे म्हणावे ॥ ६ ॥ दीनाचा त्याग करिती । समर्थातें अंगिकारिती ॥ समदर्शी म्हणविती । त्यातें काय म्हणावें ॥ ७ ॥ जरी सामान्याचा त्याग केला । वरिष्ठ अंगिकारिला ॥ तो समदर्शी सहजचि झाला । लाजिरवाणा ॥ ८ ॥ अन्यथाकर्तुं समर्थ आहे । 'दवीं नाहीं' बोलताहे ॥ तया बोलणें कैसें साहे । अन्यथाकर्तुं समर्थ हें ॥ ९ ॥ मिरवी क्षमावंताचा शिरोमणी । शरणागताचे अपराध गणी ॥ ऐसी ज्याची विरुद्ध करणी । काय म्हणावें तयातें ॥ २१० ॥ मिरवी दयाळू करुणाघन । शरणागताची कापी मान ॥ ऐसें विपरीत ज्याचें आचरण । त्यातें काय

म्हणावें ॥ ११ ॥ प्रणतवत्सल ब्रीद वाहे । प्रणतचि दुःखी होत आहे ॥ पाहत असतां स्वस्थ राहे । काय म्हणावें तयातें ॥ १२ ॥ पतीतपावन ब्रीद गाजे । पातक्याचा त्याग कीजे ॥ ऐसें असतां कैसी साजे । ब्रीदावळी ॥ १३ ॥ आतिथाचा कल्पतरु । ऐसा नामाचा बडिवारू ॥ आश्रितासी म्हणे काय करूं । प्रारब्धीं नाहीं तूझिये ॥ १४ ॥ ऐसा कैसा कल्पतरू । इच्छित द्यावया लावी उशीरू ॥ ऐसें असतां चमत्कारू । कोणता कल्पवृक्षाचा ॥ १५ ॥ जेणें जें इच्छिजे । तें तें त्यातें तत्काळचि दीजे ॥ त्याशींच ऐसें नाम साजे । आश्रिताचा सुरतरु ॥ १६ ॥ कामीक कामाचा प्रदाता म्हणवी । शरणार्थी विन्मुख फिरवी ॥ पुनः तयाची करवी । विटंबना ॥ १७ ॥ ऐसा कैसा दाता । मनोरथाचा पूर्णकर्ता ॥ कोरडीं ब्रीदेंच मिरवितां । शोभती केवीं ॥ १८ ॥ नाम गाजे भक्तानुकंपी । भक्ताचींच मान कापी ॥ भक्तास म्हणावें 'पापी'। भक्तानुकंपी हा कैसा ॥ १९ ॥ भक्तइच्छेनें देह धरी । ऐसें नाम लोकांतरीं ॥ दर्शन देतां शंका करी । कैसें साजे नाम हें ॥ २२० ॥ नाम आहे निजलाभतुष्ट । भक्तापासुनि घेई कष्ट ॥ कैसें नाम शोभे स्पष्ट । सांग देवा ॥ २१ ॥ स्वयंतृप्त नामधारी । साधनांची अपेक्षा करी ॥ साधन करितां अंगिकारी । नाम कैसें

शोभेल हें ॥ २२ ॥ विश्वंभर नामधारी । शरणागतातें उपाशी मारी ॥ ऐसी करितो बाजीगरी । नाम कैसें शोभेल त्या ॥ २३ ॥ नाम वाहे अति उदार । भक्तांस हिंडवी दारोदार ॥ भीक मागतां समाचार । घेईना जो दासाचा ॥ २४ ॥ उदार नाम वागवावें । याचक पाहतां गुप्त व्हावें ॥ मुख लपवोनि बसावें । याचकभयें ॥ २५ ॥ ऐसा कैसा उदार । करी याचकाचा अव्हेर ॥ आतां येई माझे समोर । उदार दात्या ॥ २६ ॥ आजपर्यंत पाहीं । कोण वस्ताद भेटला नाहीं ॥ तुझीं ब्रीदें सर्वही । हिरोनि घेता ॥ २७ ॥ ब्रीदें वागवितां वाटलें गोड । प्रसंग पडतां पडलें कोड ॥ आतां कोणती तोड । विचारिली तीं सांगावी ॥ २८ ॥ मागतों तैसें अभय । आतांच देई दाखवोनि पाय ॥ विलंब होतां देवा काय । बिरुदें वागवूं पाहसी तूं ॥ २९ ॥ एवढा लक्ष्मीचा नायक । तुझा होईल ऐसा लौकिक ॥ ब्रीदें घेवोनि गेला रंक । हिरोनियां देवाचीं ॥ ३३० ॥ निश्चळ आणि निर्मळ । निष्कलंक सोज्वळ ॥ ऐशा कीर्तीचें तोंड काळें । करिसी कैसें गोविंदा ॥ ३१ ॥ तुझे दारींचा याचक । विन्मुख दवडिसी जरी देख ॥ तरी तुझा लौकिक । बुडेल सर्व ॥ ३२ ॥ देवा फार विलंब झाला । दास तुझा घाबरला ॥ चिंताक्रांत बैसला । वाट पाहे केव्हांची ॥ ३३ ॥ आतांच वेगीं

यावें । कृपा करोनि अभय द्यावें ॥ आपलें पायीं ठेवावें । मज आपुला जाणोनि ॥ ३४ ॥ तूं प्रीति राखों जाणसी । भक्तांचा कैवार घेसी ॥ मजविषयींच कैसा होसी । वज्ररूप ॥ ३५ ॥ स्नेह तुझा सुटेना । प्रेमा तुझा विटेना ॥ ममता तुझी पालटेना । भक्तांविषयीं ॥ ३६ ॥ तूं करुणेचा जलधर । तूं कृपेचा सागर ॥ तूं अनाथाचें माहेर । दत्तात्रेया ॥ ३७ ॥ तुझे चरणावांचोनि पाहीं । मज कोठेंचि ठाव नाहीं ॥ आतां धांव माझे आई । दत्तदेवा सद्‌गुरु ॥ ३८ ॥ आतां खुंटली माझी मती । कैसें करावें कमलापती ॥ आतां सर्वथा माझी गती । तुझेच हातीं गोविंदा ॥ ३९ ॥ कैसी करावी विनंती । कैसा येऊं काकुळती ॥ सर्वज्ञ स्वामी जाणती । अंतर माझें ॥ ३४० ॥ जाणत असतां अंतर । कैसा लाविला जी उशीर ॥ आतां कोणता प्रकार । करावा आम्हीं ॥ ४१ ॥ माझा *बूता जितका होता । तितकें आळविलें अनंता ॥ अजूनि माझा अंत पाहतां । करुणा कैसी येईना ॥ ४२ ॥ अनंतमुखी नारायणा । सर्वां मुखीं धरिलें मौना ॥ एखादे मुखीं तरी वचना । बोल मजसीं ॥ ४३ ॥ आतां देवा सोडीं मौन । वेगें बोल कांहीं वचन ॥ जेणें माझें समाधान । होय ऐसें ॥ ४४ ॥ माझी अंतवेळा आली । अजूनि निद्रा

---

* पुंजी.

केसी लागली ॥ मज विषयींच कोठें गेली । अपार करुणा ॥ ४५ ॥ माझी वार्ता कोणी न सांगे । सर्वज्ञ स्वामी नायके अंगें ॥ आतां ऐशिया प्रसंगें । साह्य माझें कोण करी ॥ ४६ ॥ देवा तुझाच भरंवसा । धरितां कैसा घालिसी फांसा ॥ शरणागताचिया नाशा । प्रवर्त कैसा झालासी ॥ ४७ ॥ ऐकत असतां माझी करुणा । दयाळू केसा द्रवेना ॥ नाम तुझें करुणाघना । काय झालें ॥ ४८ ॥ माझें अरण्यरुदन झालें । तुझें कारुण्य कोणी नेलें ॥ काय सर्वज्ञपणाचें झालें । निसंतान ॥ ४९ ॥ आम्हीं अमर्याद बोलूं नये । राहवेना करावें काय ॥ सर्वज्ञ स्वामी दत्तात्रेया । जाणसी सर्व ॥ ३५० ॥ जाणत असतां अंत पाहे । आतां आम्हीं करावें काय ॥ वारंवार वंदितों पाय । सर्वज्ञ स्वामीचे ॥ ५१ ॥ नमस्कारावांचोन । आम्हीं काय करावें साधन ॥ म्हणोनि आतां करितों नमन । वारंवार स्वामीतें ॥ ५२ ॥ देवा आतां कृपा करीं । येऊनि मातें हृदयीं धरीं ॥ शरण आलों तुझे द्वारीं । भिक्षा घालीं उदारा ॥ ५३ ॥ उदारपणें घालीं भिक्षा । विलंब न करीं परम दक्षा ॥ आतांच येईं अंतरसाक्षा । आशा माझी पुरवावी ॥ ५४ ॥ पुरवीं माझी कामना । भेट देईं नारायणा ॥ अंतरींच्या उर्मी नाना । शांत करीं दयाळा ॥ ५५ ॥ दयाळाचें दयाळूपण । जाणोनियां आलों शरण ॥ अनाथ जाणोनि

संरक्षण । करीं माझें सद्गुरु ॥ ५६ ॥ सद्गुरूचा अंकित झालों । सद्गुरूचे पायीं पडलों ॥ सद्गुरूचेच नांवें विकलों । लोकांमाजी ॥ ५७ ॥ लोकांमाजी नांव जाहलें । सद्गुरूंनीं अंगिकारिलें ॥ आतां सद्गुरूचे अंकीं लोळें । ऐसें कीजे ॥ ५८ ॥ ऐसें कीजे रामराया । वेगें पाहीन तुझे पायां ॥ आतां माझें आयुष्य वायां । जाऊं न देईं समर्था ॥ ५९ ॥ समर्थाचा केला आश्रय । सर्वज्ञाचे धरिले पाय ॥ आतां माझे नाना अपाय । भस्म करीं निजकृपें ॥ ३६० ॥ निजकृपेंच अनंता । माझी रक्षा करीं आतां ॥ उपेक्षूं नको सुखदाता । तूंच मज ॥ ६१ ॥ तूंच मजला अंगिकारीं । मी तुझेच दारींचा भिकारी ॥ हेतू माझा पूर्ण करीं । दीनोद्धारणा उदारा ॥ ६२ ॥ उदारगृहींचा भिक्षुक । उदारासींच मागतों भीक ॥ आतां देवा मज विन्मुख । दवडूं नको सर्वथा ॥ ६३ ॥ सर्वथा माझा समाचार । घेईं आतांच रमावर ॥ भावें करितों नमस्कार । करुणासिंधू जाणोनी ॥ ६४ ॥ जाणूनि तुझी दयाळूता । शरण आलों लक्ष्मीकांता ॥ माझी लज्जा विज्ञानदाता । आतांच रक्षीं निजअंगें ॥ ६५ ॥ निजअंगें धांवोनि येईं । मस्तक ठेवितों तुझिये पायीं ॥ वेगें आतांच येऊं देईं । कळवळा माझा ॥ ६६ ॥ माझा अंत पाहिला । अतिविलंब लाविला ॥ आतां तरी गोपाळा । धांव घालीं ॥ ६७ ॥

धांव घालीं दयाघना । आतां मातें राहवेना ॥ देवा शरणागताचे प्राणा । घेऊं केसा पाहसी ॥ ६८ ॥ पाहसी दासाचें दुःख । पातकी जाणोनि लपविलें मुख ॥ एकलाची भोगिसी सुख । उचित केसें तुज दिसे ॥ ६९ ॥ तुज दिसे आकाशपाताळ । अनंतब्रह्मांडगोळ ॥ मीच एकटा दुर्बळ । केसा न दिसें तुज देवा ॥ २७० ॥ देवा आतां द्रव वेगें । अनंतभुजें आलिंगें ॥ दास तुझा दुःख भोगे । आतां न करीं विलंब ॥ ७१ ॥ विलंब देवा न लावीं । आतांच येऊनि चरण दावीं ॥ माझी अंजुळी भरावी । अभयभिक्षा घालोनी ॥ ७२ ॥ तुझी कांस धरिली । मग नाना विरुद्ध कर्में केलीं ॥ नाना पाखांडें माजविलीं । तुझाच म्हणोनी ॥ ७३ ॥ तुझा म्हणोनि केलें कर्म । नाना प्रकारचें अधर्म । तूंच जाणसी सकळ वर्म । अंतरींचें दयाळा ॥ ७४ ॥ जरी तुझी कास न धरितों । तरी विरुद्ध कर्में न करितों ॥ अंतरीं भयचि पावतों । निराश्रय म्हणोनी ॥ ७५ ॥ समर्थाचा केला आश्रय । सर्वज्ञाचे धरिले पाय ॥ आतां मजला शंका काय । नाना कर्में आचरितां ॥ ७६ ॥ सार्वभौम राजाचा पुत्र । लोकीं वर्ततां स्वतंत्र ॥ त्यातें म्हणाया अपवित्र । सामर्थ्य नसे ॥ ७७ ॥ जरी तो राजपुत्र नमता । तरी स्वतंत्र कासया वर्तता ॥ शिरीं सार्वभौमाची सत्ता । तेणें स्वतंत्र वर्ते तो

॥ ७८ ॥ तुझे अनंत पुत्र । तुझे म्हणोनि वर्तती स्वतंत्र ॥ परंतु सकळांचें सूत्र विचित्र । तुझिये हातीं ॥ ७९ ॥ त्यांत एक अनर्गळ । अत्यंत जाहला बाष्कळ ॥ तयाचाही प्रतिपाळ । करणें तुजला श्रीवरा ॥ ३८० ॥ इतरांसारिखा नव्हसी । समर्थ दयाळू समदर्शी ॥ कैसा माझा त्याग करिसी । कुपात्र म्हणोनी ॥ ८१ ॥ तुझे अंगीं सकळ कळा । अखंड वागती अनंतबळा ॥ अनंताच्या अनंतलीळा । कोण जाणे ॥ ८२ ॥ आतां खराखोटा जरी । दंभी लोभी अहंकारी ॥ कामीक वाचाळ संसारीं । वर्तता झालों ॥ ८३ ॥ तथापि सर्व तुमच्या नांवें । केलें तुम्हीं शेवटा न्यावें ॥ रागें भरोनि न त्यागावें । देवें मजला सर्वथा ॥ ८४ ॥ मी तों अनधिकारी पापराशी । तूं जरी अंगिकारिसी ॥ सरितासंगम गंगेसीं । जेवीं तेवीं होईन मी ॥ ८५ ॥ तूं समर्थाचा राजा । काय भार मानिसी माझा ॥ देवा सर्वथा आहें तुझा । अंगिकारीं मज आतां ॥ ८६ ॥ तूं काळाचा काळ अससी । मी दुर्बळ अनाथ परदेशी ॥ मातें दर्शन द्यावया भीसी । दुष्टदानवमर्दन तूं ॥ ८७ ॥ जरी मज दर्शन दिधलें । तरी काय तुझें सामर्थ्य गेलें ॥ मातें जरी उपेक्षिलें । तरी अधिक झालें कायसें ॥ ८८ ॥ अनंतशक्तीच्या नायका । भेट देतां करिसी शंका ॥ शरण येतां त्यागिसी रंका । लाभ कोणता तुज सांगें ॥ ८९ ॥ तुझेसाठीं तळमळी ।

विलंब लाविसी वनमाळी ॥ कीर्ती जाईल पाताळीं । येणें तुझी सर्वज्ञा ॥ ३९० ॥ आतां कैशा मारूं हाका । कोणतें साधन करूं देखा ॥ ब्रह्मानंदा ब्रह्मांडनायका । कैसा तूतें रिझवूं मी ॥ ९१ ॥ नाना साधनें योग असती । तेणें तुमची होईना तृप्ति ॥ ऐसें संत स्वामीही बोलती । स्वमुखेंची ॥ ९२ ॥ तेंही मजला सामर्थ्य नाहीं । आळसी अधैर्यराशी पाहीं ॥ दुःख साहूं न शके देहीं । साधन कांहीं न घडे मज ॥ ९३ ॥ तुज भक्तीची चाड । भक्ती तूतें वाटे गोड ॥ तुझी भक्ती परम अवघड । कैसी घडे मज देवा ॥ ९४ ॥ तुझे भक्तीचा पारू । नेणे ब्रह्माहरिहरू ॥ मूढ पापी पामरू । कैसा जाणूं मी रामा ॥ ९५ ॥ भक्ती नाहीं साधन नाहीं । योग नाहीं तप नाहीं । विद्या नाहीं आचार नाहीं । दैवहीन करंटा ॥ ९६ ॥ ऐसा मी दुर्भाग्य दीन । महा पातकांची खाण ॥ चिद्रत्नकैवल्यनिधान । सध्यां इच्छी अनायासें ॥ ९७ ॥ आपण असतां पांगळा । पर्वत उल्लंघूं गेला ॥ मुका असतां अपार लीला । वर्णूं पाहे श्रीगुरूची ॥ ९८ ॥ जैसें लघुबाळ । धरूं पाहे शशिमंडळ ॥ अत्यंत दुर्बळ असतां स्थळ । घेऊं पाहे काळाचें ॥ ९९ ॥ कंठीं बांधोनि शिळा । प्रलयाब्धीतें तरूं गेला ॥ सूर्यातें पाहूं आला । आंधळा जैसा ॥ ४०० ॥ तैसा मी हीणाहुनी हीण । दीर्घदोषी कुलक्षण ॥

पुरुषोत्तम स्वामीचें दर्शन । घेऊं पाहें आतांची ॥ १ ॥
इति श्रीमत्परमतपःपरायण श्रीमन्नारायणविरचिते करुणासागरे प्रथमभागः समाप्तः ॥ ॥ श्रीगुरुदत्तचरणार्पणमस्तु ॥
श्रीगणेशायनमः ॥ ॥ न करितां सायास । करीत असतां नाना दोष ॥ अनंत ब्रह्मांडांचा अधीश । पाहीन म्हणतों आतांची ॥ २ ॥ अनंत जन्में साधन करितां । नव्हे ज्याची प्रसन्नता ॥ त्यापासोनि म्हणतों आतां । अभयदान घेईन मी ॥ ३ ॥ मी दुर्दैव ठायींचा । कृतघ्न दोषी अपराधी साचा ॥ परी अंकीत झालों सद्गुरूचा । तेणें भरंवसा आहे मज ॥ ४ ॥ आलों सद्गुरूतें शरण । हात जोडोनि करितों नमन ॥ आतांच देई अभयदान । व्हावें तैसें सद्गुरू ॥ ५ ॥ आतां नलगे साधन । अथवा कांहीं पुरश्चरण । माझा स्वामी दावील चरण । दयाळुत्वें आतांची ॥ ६ ॥ माझे अपराध अनंत । क्षमा करील रमाकांत ॥ पापें जाळोनियां शांत । करील मातें सद्गुरू ॥ ७ ॥ मी अत्यंतचि दुर्दैव । स्वामी आतांचि करतील सुदैव ॥ अनंत कला सदैव । वागती अंगीं जयाचे ॥ ८ ॥ मज स्वामीचा भरंवसा आहे । उगाच बेसोनि वाट पाहें ॥ स्वामी सर्व जाणताहे । भार वाहे दासाचा ॥ ९ ॥ मज ऐसा दुर्भाग्य रंक । मागतो मी गुरूसीं भीक ॥ मनोरथ न पुरतां देख । ब्रीदें बुडती

सद्गुरूचीं ॥ ४१० ॥ मज ऐशा दुर्भाग्याचे । मनोरथ पुरवावया साचे ॥ सामर्थ्य आहे सद्गुरूचें । संशय नाहीं यदर्थी ॥ ११ ॥ सर्व सामर्थ्य सर्व गुण । सद्गुरूचे अंगीं असती जाण ॥ ऐसेंच जाणोनि आलों शरण । सद्गुरू स्वामीतें ॥ १२ ॥ गुरु क्षमावंत गंभीर । अति उदार दानशूर ॥ समदर्शी करुणासागर । पतीतपावन सर्वज्ञ ॥ १३ ॥ ऐशा स्वामीतें शरण आलों । येऊनि आशाबद्ध झालों ॥ जरी पातकें आचरलों । स्वअपराधी ॥ १४ ॥ तथापि शंका नाहीं अंतरीं । शरण आलों घेईल पदरीं ॥ स्वामी पतितातें तारी । म्हणोनियां ॥ १५ ॥ विश्वास धरोनि आलों शरण । भावें वंदितों तुझे चरण ॥ आतांच येऊनि दर्शन । अभय देईं सद्गुरो ॥ १६ ॥ देवें शरणागत त्यागिला । ऐसा नाहीं आयकिला ॥ मजविषयीं दयाळा । कठोर कैसा झालासी ॥ १७ ॥ उर्ध्वबाहू हांका मारी । कांसे लावूनि तारीं ॥ तुझिये दारींचा भिकारी । नको दवडूं माघारा ॥ १८ ॥ आतां कोणती अवधी राहिली । जांचणूक फार झाली ॥ जाणत असतां वनमाळी । निर्वाण कैसें मांडिलें ॥ १९ ॥ आतां भेट द्यावी पाहीं । दुसरा उपायची नाहीं ॥ प्राण जातो करूं काई । दीनबंधो सर्वज्ञा ॥ ४२० ॥ तुझीं पाउलें देखिल्याविण । नव्हे माझें समाधान ॥ जरी देसी इंद्रभुवन । सर्व सिद्धि ॥ २१ ॥ इन्द्रपदाचा भोग ।

तुजवीण गमे महारोग ॥ आतां आपले चरणाचा योग । घडवीं मज ॥ २२ ॥ जरी स्वामी ऐसें म्हणतां । जे ब्रह्मादिकां दुर्लभ असती ॥ ते चरण मंदमती । कैसा पाहूं इच्छिसी ॥ २३ ॥ ऐसें म्हणाल जरी । गोष्ट आहे ऐसी खरी ॥ परंतु होऊनि भिकारी । भीक मागें स्वामीतें ॥ २४ ॥ श्रीगुरूचें उदारपण । शीलसमता अनंत गुण ॥ वात्सल्य गांभीर्य सामर्थ्य पूर्ण । श्रवण केलें मीं कर्णीं ॥ २५ ॥ म्हणोनि नाना साधनें सायास । जपतपादी अभ्यास ॥ टाकोनि सारे सद्गुरूस । शरण आलों भिक्षार्थी ॥ २६ ॥ भिक्षा मागतां पाहीं । कोणी विन्मुख दवडिला नाहीं ॥ ऐसें स्वामींचें दृढव्रतही । श्रवण केलें ॥ २७ ॥ म्हणोनि भेटीची आशा धरिली । स्वामीतें अंजुळी पसरिली ॥ ॐ भवति भिक्षा घालीं । दर्शन देईं आतांची ॥ २८ ॥ आतांच द्यावें दर्शन । व्हावें तैसें अभयदान ॥ देऊनि करीं समाधान । ऐसी भिक्षा मागतों ॥ २९ ॥ जरी दैवहीन करंटा । अपराधी दोषी महा खोटा ॥ तथापि आलों दारवंटा । भिक्षार्थी सर्वज्ञ स्वामीचे ॥ ३० ॥ समर्थाचे द्वारीं आलों । तुझा म्हणोनि पायीं पडलों ॥ भिक्षा घालीं म्हणतां दयाळो । कैसा न देसी मज भिक्षा ॥ ३१ ॥ आतांच भिक्षा देणार नाहीं । ऐसी मातें शंकाच नाहीं ॥ म्हणोनि आशा धरिली पाहीं । दर्शनाची स्वामीच्या ॥ ३२ ॥

मी तों भाकिली करुणा । आतांच न दाविसी चरणा ॥ तरी होसील लाजिरवाणा । लोकीं ब्रीदें वागवितां ॥ ३३ ॥ मुनी म्हणतील हृषीकेशी । कासया ब्रीदें वागविशी ॥ क्षुद्र जाणोनि शरणागतासी । कैसा त्यागेल दयाळ ॥ ३४ ॥ ऐसा उपहास होईल पाहें । ब्रीदें जातां करसील काय ॥ म्हणोनि आतांच दावोनि पाय । अभय देई मज देवा ॥ ३५ ॥ सर्वज्ञाचा विश्वास । समर्थ म्हणोनि धरिली कांस । देवा न लावीं अवकाश ॥ दर्शन देई आतांची ॥ ३६ ॥ दैव माझें आडवें पडलें । म्हणोनि येणें तुझें न घडलें ॥ गगन कोसळोनि पडलें । देवा कैसें मजवरी ॥ ३७ ॥ कोणता प्रतिबंध झाला । वाटे येतां पडला घाला ॥ किंवा माझा त्यागचि केला । सर्व लज्जा टाकुनी ॥ ३८ ॥ ऐसें कैसें विपरीत झालें । पायीं पडतां लोटोनि दिलें ॥ शरणागतातें उपेक्षिलें । समर्थानें ॥ ३९ ॥ आतां कैसें वांचावें । वांचोनि दुःखचि भोगावें ॥ प्राणासी मुकावें । हेंचि बरें ॥ ४४० ॥ स्वामीचा वियोग साहीना । सर्वज्ञ स्वामी ऐकेना ॥ मज कोठेंही राहवेना । नमन करितों सद्गुरूतें ॥ ४१ ॥ काळभयें शरण आलों । तुझे पाठीं रिघालों ॥ कैसा धरोनि देसी दयाळो । धनुर्धरा श्रीरामा ॥ ४२ ॥ कैसी लज्जा सोडिसी । शरणागताची उपेक्षा करिसी ॥ नमन करितां कापिसी । मान देवा

दीनाची ॥ ४३ ॥ लोकीं दुष्टें गांजिलें । त्यातें तुम्हीं सोडविलें ॥ स्वयें तुम्हींच त्यागिलें । तरी कैसें करावें ॥ ४४ ॥ आतां कोणाचें करावें स्मरण । कोण करील समाधान ॥ देवा तूतेंच करितों नमन । रक्ष आतां दयाळा ॥ ४५ ॥ मातेनें बाळ परतें केलें । रागें जरी सोडिलें ॥ तथापि रुदन करूनि लोळे । मातेकरितां ॥ ४६ ॥ तेंवि माझें जीवन । दत्तात्रेया तुझे चरण ॥ माझा कळवळा दयाघन । येऊं देई तुज आतां ॥ ४७ ॥ वेडावांकुडा अज्ञान । मूर्ख क्षुल्लक बुद्धिहीन ॥ कैसा तरी तुझा जाण । अंत काय पाहसी ॥ ४८ ॥ तूं माय मी बाळ तान्हें । तुजवीण एकटें दैन्यवाणें ॥ सद्गुरू आतां धांवूनि येणें । विलंब देवा न लावीं ॥ ४९ ॥ हांका मारितों वारंवार । अंतरीं वाटे हुरहुर ॥ सद्गुरो माझा विसर । पडों न द्यावा ॥ ४५० ॥ देवा आतां काय करूं । लोकीं कैसा धीर धरूं ॥ वांचूं किंवा मरूं । मातें कांहीं सुचेना ॥ ५१ ॥ प्राण तरी कैसा देऊं । तुजवीण कैसा राहूं ॥ सद्गुरू आतां कोठें जाऊं । कोठें राहूं कवणपरी ॥ ५२ ॥ अंतरीं दुःख होय । कोणतें सांगतांही नये ॥ तूंच जाणसी सद्गुरुमाये । काय सांगूं सर्वज्ञा ॥ ५३ ॥ माझी अंतरींची हळहळ । तूंचि करिसी शीतळ ॥ देवा माझी कळवळ । तूजच असे ॥ ५४ ॥ तूंच जरी कृपा करिसी ।

थांतोनि माझें समाधान करिसी ॥ तरीच माझा हृषीकेशी । प्राण राहे ॥ ५५ ॥ नाहीं तरी वाहवलों । चिंताडोहीं बुडालों ॥ काढीं आतांच दयाळो । अनंतबळा सद्गुरो ॥ ५६ ॥ जीव जाय तोंवरी अंत । काय पाहसी दयावंत ॥ माझा तूतें लक्ष्मीकांत । भार झाला फारसा ॥ ५७ ॥ माझा प्राण जातां । तुम्ही स्वस्थ होऊनि पाहतां ॥ ऐसा कैसा तत्त्वतां । विचार केला अंतरीं ॥ ५८ ॥ जरी माझा प्राण गेला । तुझेच ठायीं हेतू गुंतला ॥ तूतें न सोडीं दयाळा । जीत मेल्या कदापि ॥ ५९ ॥ सूर्य अंधारीं लोपला । मुंगीनें हत्ती गिळिला ॥ देवा तसा उणा झाला । सद्गुरूचा पराक्रम ॥ ४६० ॥ माझा अंगिकार करितां । शंका वाटे लक्ष्मीकांता ॥ मज पाउलें दाखवीं आतां । खंती वाटे अंतरीं ॥ ६१ ॥ मी काय तुझें हिरोनि घेतों । किंवा तूतें कैद करितों ॥ काय तुझा नाश होतो । दर्शन देतां पायांचें ॥ ६२ ॥ कैसा त्यागिसी अधोक्षजा । अनादिसिद्धा आनंदबीजा ॥ कंठीं प्राण आला माझा । लज्जा कैसी सोडिली ॥ ६३ ॥ माझा होतसे अंत । तूं तों बैसलासी निवांत ॥ ऐसा कैसा रमाकांत । शरणागतवत्सल तूं ॥ ६४ ॥ विनंतीची सीमा झाली । मति माझी भांबावली ॥ जैशी माझी गति झाली । देवा तैसी जाणसी तूं ॥ ६५ ॥ देवा आयुष्य चालिलें वांया । रोगें व्यापिली

काया । विलंब लाविसी दत्तात्रेया । अत्यंत दयाळु असतांही ॥ ६६ ॥ आधींच थोडें जीवन । तेंही चाललें निघून ॥ अजूनिही स्वामीचे चरण । दृष्टी न पडती ॥ ६७ ॥ अंतकाळ जवळ आला । करुणा भाकीं वेळोवेळां ॥ स्वामीसेवेचा सोहळा । कधीं पाहावा सर्वज्ञा ॥ ६८ ॥ आयुष्य निघोनि गेलें । अंतीं जरी दाविलीं पाउलें ॥ तेणें माझें काय झालें । समाधान ॥ ६९ ॥ झालें कंठा अवरोधन । कैसें करावें गुणवर्णन ॥ कोणत्या प्रकारें सेवन । अंतीं घडे मज देवा ॥ ४७० ॥ माझे मनींचा उल्हास । मनीं जिरला जगन्निवास ॥ कांहींच माझी हौस । पुरविली नाहीं समर्था ॥ ७१ ॥ मनांत होतें चरण पहावे । चरण सेवूनि रहावें ॥ लोकीं सोहळे भोगावे । सद्गुरूचे सेवेचे ॥ ७२ ॥ सद्गुरूचें उच्छिष्ट । खाऊनि रहावें संतुष्ट ॥ गुण वर्णावे स्पष्ट । सद्गुरूचे ॥ ७३ ॥ स्वामीमुखाची वाणी । नित्य ऐकावीं कानीं ॥ स्वामीचे आज्ञेकरूनी । वर्तावें जगीं ॥ ७४ ॥ स्वामी आज्ञा करतील जेथें । आनंदें रहावें तेथें ॥ स्वामीसेवेस भावार्थें । लोक लावावे ॥ ७५ ॥ नित्य दर्शन घ्यावें । तीर्थप्रसाद सेवावे ॥ हितगूज आपुलें सांगावें । नित्य स्वामीतें ॥ ७६ ॥ स्वामीतें प्रश्न पुसावे । स्वामींनीं समाधान करावें ॥ आपुला म्हणोनि वागवावें । लोकीं मज ॥ ७७ ॥ हृदयीं स्वामीचे चरण ।

धरोनि रहावें आनंदघन ॥ नित्य करावें कीर्तन । स्वामीपुढें ॥ ७८ ॥ असावा स्वामींचा आधार । स्वामींनींच घ्यावा समाचार ॥ इतर लोकांसी पदर । पसरूं नये म्यां ॥ ७९ ॥ मज कोणाची आशा नसावी । स्वामींनीं वृत्ती चालवावी ॥ स्वामी सांगतील तैसी व्हावी । वर्तणूक माझी ॥ ४८० ॥ कोणाचेही आधीन । म्यां न व्हावें दयाघन ॥ अखंड स्वामीचे चरण । सेवूनि रहावें ॥ ८१ ॥ महानुभव संतांची । संगती असावी सद्भक्तांची ॥ सेवा घडावी साधूंची । अंगेंच मज ॥ ८२ ॥ कांहीं काळ देवाधिदेवा । ऐसी करावी तुझी सेवा ॥ मग माझा देह पडावा । तुझे चरणीं ॥ ८३ ॥ हा देह पावतां पतन । तत्काळचि दुसरा देह धरीन ॥ स्वामीचे बरोबरीच राहीन । निरंतर ॥ ८४ ॥ घालीन स्वामींतें स्नान । मांडीन स्वामींचें आसन ॥ आपुले हातीं धुवीन । वस्त्रें स्वामींचीं ॥ ८५ ॥ स्वामींसी पाहिजे तैसें अन्न । तत्काळचि सिद्ध करीन ॥ आपुले हातीं वाढीन । जेवितील स्वामी ॥ ८६ ॥ काढीन स्वामींचें ताट । सेवीन स्वामींचें उच्छिष्ट ॥ स्वामीपुढें वागेन स्पष्ट । सेवक होवोनि ॥ ८७ ॥ तांबूल देईन । मीच उगाळ घेईन ॥ स्वामींचे गुण गाईन । ऐकेन कानीं ॥ ८८ ॥ वेदसार सिद्ध बोल । स्वामी सांगतील सखोल ॥ ऐकोनि निश्चळ । सन्निध राहीन स्वामींचे ॥ ८९ ॥ निकट वर्तन समोर ।

उभा राहीन निरंतर ॥ सद्गुरूचे सेवेसी तत्पर । राहीन मी ॥ ४९० ॥ स्वामीची शेज घालीन । गुरू करतील शयन ॥ करीन पादसेवन । सद्गुरू स्वामीचें ॥ ९१ ॥ हितगुजाच्या गोष्टी । स्वामी सांगतील कृपादृष्टी ॥ होईल आनंदाची वृष्टि । सेवितां चरण ॥ ९२ ॥ स्वामीचे आज्ञेकरून । सन्निधची करीन शयन ॥ प्रातःकाळीं उठोन । उठवीन स्वामीतें ॥ ९३ ॥ अंतरीं धरोनि हेवा । करीन स्वामीची सर्व सेवा ॥ माझें सेवन सद्गुरू देवा । गोड वाटावें ॥ ९४ ॥ ऐसें स्वामीचें सेवन । कल्पकोटी करीन ॥ कदापि स्वामीचे चरण । सोडणार नाहीं ॥ ९५ ॥ मी तों स्वामीचे जवळ । अखंड राहीन सर्वकाळ ॥ सद्गुरूतें अर्धपळ । विसंबणार नाहीं ॥ ९६ ॥ जेव्हां जेथें ज्ञानविग्रह । स्वामी अवतरतीं निःसंदेह ॥ तेव्हां तेथें माझा देह । सेवेसि व्हावा स्वामीचे ॥ ९७ ॥ ऐसा माझा सद्गुरूचा । अखंड योग राहो साचा ॥ सदा राहीन स्वामीचा । शिष्य होवोनी ॥ ९८ ॥ जें तुमचें आदिपीठ । ज्यातें बोलती वैकुंठ ॥ मातें नलगे सांगतों स्पष्ट । सद्गुरू स्वामी ॥ ९९ ॥ एवं माझा मनोरथ । सर्वज्ञा जाणतोसी यथार्थ ॥ आतांच पूर्ण कराया समर्थ । तूंच अससी ॥ ५०० ॥ यांत कांहीं न्यून झालें । विलंब लावूनि दर्शन दिलें ॥ तथापि न्यूनत्वचि आलें । ब्रीदावळीसी ॥ १ ॥ आतांचि द्यावें दर्शन । आतांच द्यावें अभयदान ॥ तरीच

माझे मनोरथ पूर्ण । केले ऐसें होईल जी ॥ २ ॥ विलंब लावूनि दाविले पाय । तरी माझी हौस पुरली काय ॥ म्हणोनि आतांच माझी हायहाय । शांत करणें दयाळा ॥ ३ ॥ आतांच लागली तळमळ । काळांतरीं करिसी शीतळ ॥ तरी कैसें घननीळ । व्हावें तैसें मिळावें ॥ ४ ॥ व्हावें तैसें आतांच देई । देऊनि ठेवीं आपुले पायीं ॥ ह्याच प्रसंगीं सद्‌गुरू आई । हौस माझी पूर्ण करीं ॥ ५ ॥ क्षणक्षण काळ चालिला । अंतरीं लागली हे ज्वाला ॥ दयासिंधो गोपाळा । शीतळ करणें आतांची ॥ ६ ॥ तूं कैवल्य कल्पतरु असती । काय अशक्य समर्थासी ॥ पाहिजे तैसे पूर्ण करिसी । मनोरथ माझे सर्वज्ञा ॥ ७ ॥ भरंवसा धरोनि वाट पाहतों । जीवें भावें करुणा भाकितों ॥ शरण येऊनि विनंती करितों । मस्तक ठेवूनि पायांवरी ॥ ८ ॥ अंजुळी पसरोनि भिक्षा मागें । आतांच देईं आपुल्या अंगें ॥ सर्वज्ञ समर्था ऐसिया प्रसंगें । उपेक्षूं नको समदर्शी ॥ ९ ॥ थोडक्यासाठीं नारायणा । कासया करितोसि विटंबना ॥ फार भोगिल्या यातना । पाव आतां सद्‌गुरो ॥ ५१० ॥ अनाथावरी क्षोभ करिसी । दीनावरी अस्त्र बांधिसी ॥ पायां पडतां लोटोनि देसी । योग्य कैसें दयाळा ॥ ११ ॥ मी तों सर्वस्वी अन्यायी । हात जोडोनि पडतों पायीं ॥ आतां गुणदोष कायी । विचारिसी माझे

॥ १२ ॥ तुझिये विरहग्राहें । ग्रासलों मी पाहसी काय ॥ धांव घालोनि लवलाहें । सोडवीं मज ॥ १३ ॥ चिंताधामीण डसली । तेणें अज्ञानमूर्च्छा आली ॥ गुरू गारोड्या धांव घालीं । वेगें मातें वांचवीं ॥ १४ ॥ भ्रमव्याळें गिळिलें । देवा कंठीं प्राण उरले ॥ चक्रधरा धांवोनि सोडविलें । पाहिजे आतां ॥ १५ ॥ मोहांधकाराची रजनी । घोर जाळीं पडलों व्यसनीं ॥ सद्गुरू तूं प्रचंड तरणि । उदयास येई दयाळा ॥ १६ ॥ दुःखप्रळय-हुताशन । चहूंकडे भडकला जाण ॥ कृपावलोकनाचें शिंचन । करीं वेगें दयाळा ॥ १७ ॥ नाना क्लेशांचा सागर देवा । त्यांत बुडालों लक्ष्मीनायका ॥ आतां आपुली चरणनौका । दावोनि तारीं समर्था ॥ १८ ॥ कितीक द्यावा परिवार । सर्व जाणसी अंतर ॥ करितों साष्टांग नमस्कार । सद्गुरुराया ॥ १९ ॥ माझें दुःख तूंच जाणसी । कोणी न जाणे हृषीकेशी ॥ मातें तूंच तारिसी । दुःखसागरापासोनी ॥ ५२० ॥ प्राण जायाची वेळा । सन्निध आली दयाळा ॥ अजूनि कैसा कळवळा । नये माझा ॥ २१ ॥ माझें काय काय पाहसी । मी तों अव-गुणांची राशी ॥ तेथें काय निवडिसी । शुभाशुभ ॥ २२ ॥ माझेसाठीं देवाधिदेवा । आपुला भांडार खर्चावा ॥ माझा अंजुळी भरावा । भिक्षा घालोनि उदारा ॥ २३ ॥ भांडार

तुझा असे पूर्ण । भिक्षा देतां नव्हे न्यून ॥ होऊं नको लोभाधीन । भिक्षा घालीं श्रीवरा ॥ २४ ॥ आतां सोडावा आळस । बैसूं नको सावकाश ॥ मजविषयीं उदास । होऊं नको सद्गुरो ॥ २५ ॥ तुम्हांस संकटीं पाडिलें । शरण येऊनि वंदिलीं पाउलें ॥ माझेसाठीं कुंठित झालें । सामर्थ्य सद्गुरूचें ॥ २६ ॥ दैवहीन शरण आला । म्हणोनि मोठा विचार पडला ॥ कोठें जावोनि बैसला । चिंताक्रांत होउनी ॥ २७ ॥ जरी ब्रीद गाजविलें नसतें । कोणीच शरण न येतें ॥ मीही तें भोगिलें असतें । प्रारब्ध आपुलें ॥ २८ ॥ तुझिये ब्रीदांचा महिमा । आयकिला पुरुषोत्तमा ॥ आशा धरोनि पूर्णकामा । भिक्षार्थी आलों तुजपाशीं ॥ २९ ॥ सेवाहीन तुच्छ दीन । जाणोनि पापी साधनहीन ॥ देवा न देसी अभयदान । तरी माझें कोण असे ॥ ५३० ॥ तुजवांचोनि सद्गुरूराया । कोणास येईल माझी दया ॥ समर्था तुझेच पायां । पडतों आतां ॥ ३१ ॥ दुःखी होतां अंतर । कोणी न घे समाचार ॥ देवा तूतें नमस्कार । करितों स्वामी ॥ ३२ ॥ दयासिंधो करुणाघना । समदर्शी पतितपावना ॥ दिनानाथ अससी जाणा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ३३ ॥ सर्वतः स्फुरसी ऐकसी । सर्वांचा समाचार घेसी ॥ मातें कसा न देसी । अभयदान ॥ ३४ ॥ कोणता राग आला । ममता लावूनि कापिसी गळा ॥ होऊं पाहसी

मोकळा । मारूनि मज ॥ ३५ ॥ आधीं लाविलें सेवे । आतां आम्हीं कैसें रहावें ॥ कोठें जाऊनि पहावें । हृदयस्थासी ॥ ३६ ॥ देवा तूतें आळवितां । अंतकाळ झाला अनंता ॥ तूज आहे माझी ममता । दत्तात्रेया ॥ ३७ ॥ अत्यंत अंत पाहणें । तूतें नाहीं श्लाघ्यवाणें ॥ पायां पडतां लोटोनि देणें । योग्य नाहीं तुज गुरो ॥ ३८ ॥ आम्हीं कोणाचे मुखाकडे पहावें । कोणास काकुळती यावें ॥ कोणें मातें सांभाळावें । तुजवांचोनि ॥ ३९ ॥ एवढा करुणेचा सागर । कैसें द्रवेना अंतर ॥ करुणा भाकितां उशीर । फार झाला दयाळा ॥ ५४० ॥ तुझिये निद्रेचे वेळां । येऊनि करितों गलबला ॥ म्हणोनि माझा कटाळा । करितोसि काय ॥ ४१ ॥ नकळे कोणता राग आला । हांका मारितों वेळोवेळां ॥ आतां धांवणें दयाळा । सद्गुरू स्वामी ॥ ४२ ॥ तुम्हीं जरी त्याग केला । तरी माझा जन्मचि व्यर्थ गेला ॥ तुमचे ब्रीदासि लागला । बोल स्वामी ॥ ४३ ॥ तुज भक्त असती अनेक । परी मजला स्वामी तूंचि एक ॥ आतां विलंब रमानायक । लावूं नको दयाळा ॥ ४४ ॥ तूंचि माझा विश्राम होसी । तूंचि माझा आश्रय असती ॥ तुझियेवांचोनि परदेशीं । पडलों देवा ॥ ४५ ॥ आतांचि अनाथनाथा । धांव घालीं सद्गुरू दत्ता ॥ तुझे पायीं

ठेविला माथा । समर्थ देवा सर्वज्ञा ॥ ४६ ॥ देवा तुझा मी मूर्ख पुत्र । कामीक खोटा अपवित्र ॥ उपेक्षूं नको तुझेंच तंत्र । आहे आतां सद्गुरू ॥ ४७ ॥ मी तुझा दीन सखा । मातें लेखूं नको परका ॥ नमन करितों लक्ष्मीनायका । भेट देई मज आतां ॥ ४८ ॥ देवा तुझा दीन दास । आतां देऊं नको त्रास ॥ नमस्कार जगन्निवास । करितों तुज ॥ ४९ ॥ नमस्कारावांचोन । आम्ही काय करावें साधन ॥ काय द्यावें नारायण । जेणें प्रसन्न होसी तूं ॥ ५५० ॥ मी तों ठायींचा आळसी ॥ भयाभीत अधैर्यराशी ॥ माझा अंत काय पाहसी । दीनदयाळा सर्वज्ञा ॥ ५१ ॥ जैसा तैसा तरी तुझा । सांभाळ करीं वेगें माझा ॥ शरण आलों माझी लज्जा । तुझे हातीं सद्गुरो ॥ ५२ ॥ आतां माझें जीवन । सद्गुरो तुझेंच अधीन ॥ करुणा भाकितों येऊनि शरण । विलंब आतां न लावीं ॥ ५३ ॥ तुम्ही सर्वज्ञ गोसावी । आतां माझी कींव यावी ॥ माझी लज्जा सांभाळावी । शरण आलों म्हणोनि ॥ ५४ ॥ शरण आलियाची लज्जा । बाळगावी सर्वज्ञ राजा ॥ दत्तात्रेया आहें तुझा । कसा तरी शिष्य मी ॥ ५५ ॥ घडली नाहीं तुझी सेवा । म्हणोनि माझा वीट न यावा ॥ आतां प्रतिपाळचि करावा । इच्छितों तैसा सर्वज्ञा ॥ ५६ ॥ माझें अत्यंत सामान्यपण । नको पाहूं दयाघन ॥ शरण येऊनि तुझे चरण । वंदितों मी सद्गुरो

(५१) ३७०८

॥ ५७ ॥ धरीं माझा अभिमान । हातीं घेई धनुष्यबाण ॥ सद्गुरुराया निर्वाण । माझें आतां न पहावें ॥ ५८ ॥ देवा तूतें वारंवार । हात जोडोनि नमस्कार ॥ करितों माझा समाचार । घेई आतां दयाळा ॥ ५९ ॥ आतां द्रवूं दे अंतर । मागुती करितों नमस्कार ॥ धांव आई सत्वर । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ५६० ॥ देवा उणें अथवा आगळें । यथामतीनें आळविलें ॥ गोड करोनि घेतलें । पाहिजे सर्व ॥ ६१ ॥ जैसी माझी मती । तैसें आळवितों श्रीपती ॥ अधीक कोठोनि कृपामूर्ती । आणूं आतां ॥ ६२ ॥ आतां स्वामीनीं संतुष्ट व्हावें । माझें समाधान करावें ॥ शरण आलों जीवें भावें ॥ आस स्वामीचरणाची ॥ ६३ ॥ मातें दुसरा आधार नसे । देवा सर्वथा तुझाच असें ॥ मिथ्या जरी बोलतसें । तरी कल्पकोटी नरक घडो ॥ ६४ ॥ देवा तुझीच आशा धरोनि । वाट पाहें दीनवाणी ॥ आतां माझी हांक तुझे कानीं । पडों देई सर्वज्ञा ॥ ६५ ॥ तूतें भाकीत असतां करुणा । कैशा भोगविसी यातना ॥ माझिया जीवींच्या खुणा । जाणतोसी दयाळा ॥ ६६ ॥ येई करुणेच्या जळधरा । धांव कृपेच्या सागरा ॥ पात्र मुक्तीच्या माहेरा । दत्तात्रेया ॥ ६७ ॥ माझी कठीण वेळा आली । वेगें येई गुरुमाउली ॥ करीं कृपेची साउली । सखया रामा ॥ ६८ ॥ पायीं घातलें लोटांगण । आतां न पाहीं निर्वाण ॥

सद्गुरूराया आपुले चरण । दाविलेच पाहिजे ॥ ६९ ॥ माझे अपराध सर्व कांहीं । क्षमा करीं पडतों पायीं ॥ दत्तात्रेया अनंत उपायीं । सांभाळ माझा अंगें करीं ॥ ५७० ॥ तुझें हृदय अत्यंत कोमळ । मातें गांजी विपरीत काळ ॥ सद्गुरू स्वामी आतां वेळ । लावूं नको दयाळा ॥ ७१ ॥ माझे सारिखा निलाजिरा । कोडगा बेशरम खरा ॥ कानकोंडा गुरुवरा । तुझे पुढें ॥ ७२ ॥ पाहूं नये माझे मुखा । एवढा अपराधी आहें देखा ॥ परंतु तूंतें लक्ष्मीनायका । शरण आलों ॥ ७३ ॥ जैसें माझें सामर्थ्य होतें । तैसी करुणा भाकिली तूतें ॥ कैसें करूं देवा मातें । आतां कांहीं सुचेना ॥ ७४ ॥ मी तों तुझे अधीन असें । तुजवीण माझा प्राण जातसे ॥ सद्गुरूराया तुझें पिसें । लागलें मज ॥ ७५ ॥ शून्य वाटे त्रिलोकीं । तुझिये मुखाकडे अवलोकीं ॥ माझी दुर्दशा भूलोकीं । सद्गुरू आतां न करावी ॥ ७६ ॥ आतां सद्गुरू पूर्ण कृपा । कधीं करशील ब्रह्मरूपा ॥ विश्व-जनाच्या मायबापा । दत्तात्रेया ॥ ७७ ॥ अनंतबळा अनंतभूजा । अनंतगुणा सर्वज्ञराजा ॥ आतां अंगिकार माझा । वेगें करीं ॥ ७८ ॥ मजला आतां नको छळूं । तुजहूनि कोणता कृपाळू ॥ धांवोनि येईं, हळूहळू । चालूं नको दयाळा ॥ ७९ ॥ तुझे हातीं सर्व आहे । कृपादृष्टी

-मजकडे पाहें ॥ आतां मातें न साहे । वियोग स्वामीचा ॥ ५८० ॥ माझें हृदय परम कठीण । आजपर्यंत राहिला प्राण ॥ तेच क्षणीं निर्वाण । व्हावें तुझ्या वियोगें ॥ ८१ ॥ तुझा वियोग साहिला । धिःकार माझे दास्यत्वाला ॥ माझे शिरीं कां न झाला । वज्रपात ॥ ८२ ॥ माझा प्राणही जाईना । सद्गुरूवांचोनि राहवेना ॥ हेतू आशा वासना । सद्गुरूचरणीं गुंतली ॥ ८३ ॥ आतां माझा वृत्तांत कळावा । माझा अंत न पाहावा ॥ वेगें येई सद्गुरू देवा । कृपा करोनी आलिंगीं ॥ ८४ ॥ भयंकर व्याघ्रें वधिली गाय । देवा सोडवीं दावूनि पाय ॥ माझेसाठीं अनंत उपाय । करीं आतां सद्गुरो ॥ ८५ ॥ अनादि देवा विश्वंभरा । अप्रमेया परात्परा ॥ नमो कूटस्था अक्षरा । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ८६ ॥ परमेश्वरा पुरुषोत्तमा । नित्य-निरंजना परमात्मा ॥ अनामरूपा परब्रह्मा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ८७ ॥ रामकृष्णा भार्गवा । नृसिंह वामन हय-ग्रीवा ॥ मत्स्य कूर्म वराह देवा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ८८ ॥ ब्रह्मा विष्णू महेश्वरा । वासुदेवा रमावरा ॥ शूळपाणी चक्रधरा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ८९ ॥ सूर्या भास्करा चंडकिरणा । वक्रतुंडा गजानना ॥ सर्वरूपा सर्वाधिष्ठाना । दत्तात्रेया तुज नमो ॥ ५९० ॥ लक्ष्मी सरस्वती काली । गिरिजा पार्वती महाकाली ॥ सिंहवाहिनी

भद्रकाली । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९१ ॥ शेषा अनंता वेदव्यासा । यज्ञर्षभा आदिहंसा ॥ कपिलदेवा रघूत्तंसा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९२ ॥ रमेशा उमेशा वागीशा । सिद्धेशा विधेशा सर्वेशा ॥ जीवेशा परेशा आदीशा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९३ ॥ एका अनेका एकत्वरहिता । त्राता भ्राता पिता माता ॥ सगुण अगुण गुणातीता । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९४ ॥ नमूं शेषा अशेषा । नमूं विशेषा निर्दोषा ॥ परावरेशा निःशेषा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९५ ॥ नमो विरूपा सुरूपा । नमो अरूपा स्वरूपा ॥ सृष्टी–समष्टी–व्यष्टी–रूपा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९६ ॥ सीतापते राधिकारमणा । रुक्मिणीनाथा जानकीजीवना ॥ कंसनाशका रावणमर्दना । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९७ ॥ अयोध्यापते मथुराधीशा । गोपीरमणा जानकीशा ॥ गोपवल्लभा कपीशा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९८ ॥ त्रैलोक्यपते वैकुंठपते । पार्वतीपते कैलासपते ॥ लक्ष्मीपते कैवल्यपते । दत्तात्रेया तुज नमो ॥ ९९ ॥ कर्मज्ञा तत्त्वज्ञा सर्वज्ञा । धर्मज्ञा मर्मज्ञा मनोज्ञा ॥ शरणागत भावाभिज्ञा । दत्तात्रेया तुज नमो ॥ ६०० ॥ शरण आलों समर्थासी । आतां कोठें हांकूनि देसी ॥ दीन दयाळा परदेशीं । कोठें हिंडूं सांग मी ॥ १ ॥ सद्गुरूराया कोठें जावें । जाऊनि तरी काय करावें ॥ कैसें रहावें वांचावें । दत्तदेवा–

सद्‌गुरो ॥ २ ॥ जैसें पक्षहीन पांखरूं । तैसा तुजविणें झालों सद्‌गुरू ॥ सांग आतां कैसें करूं । न सुचे कांहीं मज देवा ॥ ३ ॥ आतां कसाबाचें कर्म । करूं नको जाणसी धर्म ॥ मानवी मांस अस्थी चर्म । कामा नये सर्वथा ॥ ४ ॥ जरी माझा प्राण गेला । तुझा खर्च काय उणा झाला ॥ किंवा भार उतरला । कांहीं मस्तकींचा ॥ ५ ॥ तुझें होतें क्रीडन । माझा जाऊं पाहे प्राण ॥ ऐसा कैसा नारायण । दयाळू तूं ॥ ६ ॥ आतां बधिर होऊं नको । माझा अंत पाहूं नको ॥ देवा विलंब लावूं नको । नमन करितों दयाळा ॥ ७ ॥ नमस्कारेंचि प्रसन्न होई । आतांचि येऊनि दर्शन देई ॥ कृपा करोनि आपुले पायीं । ठेवीं मजला सद्‌गुरो ॥ ८ ॥ अनंतसूर्यांच्या कोटी । लोपती प्रकाशाचे पोटीं ॥ ज्याचे लावण्यें कंदर्पकोटी । लाजोनि दडती ॥ ९ ॥ सौम्यपणें अनंत–शशी । अनादि तमताप नाशी ॥ शरणागताचे हृल्लोचनासी । ब्रह्मानंददायक जो ॥ १० ॥ मस्तकीं बांधोनि जटाजूट । तयावरी रत्नमुगुट ॥ ज्याची प्रभा करी घोट । अंधकाराचे ॥ ११ ॥ वरी मौक्तिकांचे घोंस । तुरा शोभे विशेष ॥ ज्यातें पाहतां दुःखनाश । निःशेष होय ॥ १२ ॥ कर्णीं कुंडलें तळपती । कपाळावरी ज्यांची दीप्ती ॥ नेत्रीं पाहतां आनंद देती । मकराकार कुंडलें ॥ १३ ॥ कृपापूरित नेत्रकमळें । आकर्णांत विशाळें ॥

त्रैलोक्यदर्शनीं सोज्वळें । आनंद देती ॥ १४ ॥ शोभायमान विशाळ । मनोहर जयाचें भाळ ॥ केशरी चंदन सोज्वळ । अत्यंत शोभे ॥ १५ ॥ मध्यें कस्तूरीतिलक । शोभे आनंददायक ॥ ज्यातें पाहतां तहानभूक । हारपे दासाची ॥ १६ ॥ अत्यंत चारू बिंबाधर । शोभा देती मनोहर ॥ नासिका पाहतां सुंदर । लज्जा वाटे शुकातें ॥ १७ ॥ दार्डिबीबीजापरी । दंतपंक्ती मुखाभीतरीं ॥ कौतुकें हास्य करी । वदनकमळ ॥ १८ ॥ तांबूलरंग अधरपुटीं । शोभायमान हनुवटी ॥ कौस्तुभमणी शोभे कंठीं । तेजोमय ॥ १९ ॥ उन्नत शोभती स्कंद । हृदयचारू स्तनद्वंद्व ॥ वक्षस्थळीं ब्रह्मानंद । दायक जयाचे ॥ ६२० ॥ जेथें शोभे वैजयंती माळा । जलदवर्ण शोभे सांवळा ॥ अंगीं वागती अनंत-कळा । दासां आनंददायक ॥ २१ ॥ वक्षस्थळीं श्रीवत्सलांच्छन । शोभे त्रैलोक्यभूषण ॥ मुक्ताहार गळां संपूर्ण । शोभती हृदयीं ॥ २२ ॥ आवर्तनाभी गंभीर । त्रिवळीमंडित शोभे उदर ॥ कुक्षीभाग मनोहर । वर्णितां न येती ॥ २३ ॥ सरळ शोभती बाहूदंड । सामर्थ्यवंत उदंड ॥ केयूर भूषणें तेज प्रचंड । अत्यंत शोभती ॥ २४ ॥ करीं रत्नकंकणें शोभती । मुद्रिकांची अत्यंत दीप्ती ॥ पद्म शोभे एक हस्तीं । एके हातीं सुदर्शन ॥ २५ ॥ पीतांबरावरी कंठीं सुंदर । कटी मेखळा मनोहर ॥

मांड्या जानू पोटरिया सुंदर । चरणीं शोभती नेपुरें ॥ २६ ॥ चिन्हें पद्मवज्रांकुश । कोमळ आरक्त विशेष ॥ तत्काळ करिती संसारनाश । पादकमळें जयाचीं ॥ २७ ॥ रत्नखचित सिंहासन । वरी मृदुतर अस्तरण ॥ त्यावरी करावें आरोहण । ब्रह्मानंदें ॥ २८ ॥ वामजानुवरी दक्षिणपाद । शोभा देती भक्ताऽभयद ॥ सेवा करिती सुरमुनीसिद्ध । स्तवन करिती योगींद्र ॥ २९ ॥ सहस्रफणामंडित । शेष शिरीं छाया करित ॥ वेद उभे मूर्तिमन्त । हात जोडोनी ॥ ६३० ॥ जें परब्रह्म अनामरूप । अनादि सर्वज्ञ आपेआप ॥ दत्तात्रेय ऐसें नामरूप । भक्तांसाठीं धरिलेंसे ॥ ३१ ॥ परब्रह्म चैतन्यकळा । आदिशक्ति भक्तवत्सला ॥ अनादिरूपा आनंदकळा । जननी त्रैलोक्याची ॥ ३२ ॥ दिव्यालंकारभूषित । दिव्यांबरें परिधानयुक्त ॥ वाम अंकीं शोभत । महालक्ष्मी चित्कळा ॥ ३३ ॥ जें परब्रह्म शाश्वत । तोचि दत्तात्रेय मूर्तिमंत ॥ युक्त प्रकारें विराजित । आदी दयाळू समदर्शी ॥ ३४ ॥ ऐसें आपुलें वरदरूप । आतांचि दावीं आपेआप ॥ आलिंगूनि माझा संताप । दूर करावा गुरुराया ॥ ३५ ॥ आक्रोशोनि भाकितों करुणा । आतां न करीं माझी विटंबना ॥ पाव आतां लागतों चरणा । सर्वज्ञ समर्था सद्गुरू ॥ ३६ ॥ मीं तों अन्याय केले फार । तूंत घालितों नमस्कार ॥

आतां माझा विसर । पडों न देई ॥ ३७ ॥ चिंताग्रस्त वाट पाहें । फार कष्टी होत आहें ॥ धांव देवा लवलाहें । दयासिंधो समदर्शी ॥ ३८ ॥ फार छळूनि दाविसी पाय । यांत तूतें लाभ काय ॥ मातें झाली हायहाय । आतांच पावें सज देवा ॥ ३९ ॥ आतां कांहीं दोष गुण । नको पाहूं करुणाघन ॥ आतां मातें रानोरान । कष्टी न करीं गोविंदा ॥ ६४० ॥ आतां कांहीं राहवेना । राहूनि कांहीं करवेना ॥ कोठेंही यातना सोसवेना । न सुचे कांहीं साधन ॥ ४१ ॥ दत्तात्रेया संकटीं पडलों । चिन्ताडोहीं बुडालों ॥ दुःखसागरीं वाहवलों । काढीं वेगें समर्था ॥ ४२ ॥ नाशिवंत काया आमुची । क्षणभंगुर दों दिवसांची ॥ ऐसें असतां कासयाची । मार्गप्रतीक्षा करितोसी ॥ ४३ ॥ काया शेवटीं जायाची । म्हणोनि धरिली कांस तूमची ॥ नमस्कार घालितों याची । लज्जा शंका सद्गुरू तूतें ॥ ४४ ॥ चरणीं घालितों लोटांगण । आतांच करीं समाधान ॥ सद्गुरूराया आनंदघन । दत्तात्रेया दयाळा ॥ ४५ ॥ येई आतां तांतडी । सद्गुरूराया घालीं उडी ॥ शरण आलों म्हणोनि काढीं । दुःखसागरापासोनी ॥ ४६ ॥ चरणीं ठेविला माथा । धांव आतां सद्गुरूनाथा ॥ कृपासिंधू समर्था । सर्वज्ञ देवा दयाळा ॥ ४७ ॥ माझें हृदय स्वामी जाणसी । विनंती करितों

तीं ऐकसी ॥ समर्थ असतां अंत पाहसी । हें सर्वज्ञासी अनुचित ॥ ४८ ॥ देवा माझे हृदयीं असमी । मज देशोदेशीं हिंडविसी ॥ सर्वत्र असतां दडोनि राहसी । जेथें तेथें ॥ ४९ ॥ आम्हीं कैसें पहावें । कोठें कोठें फिरावें ॥ कोणतें साधन करावें । सांग देवा ॥ ६५० ॥ नाना साधनें बोलिलीं । तीं तों तुम्हींच निंद्य केलीं ॥ म्हणोनि लोटांगणें घालीं । चरणीं सद्‌गुरूचे ॥ ५१ ॥ मज कांहींच साधन करवेना । वियोग तुझा साहवेना ॥ आतां कैसी योजना । करावी स्वामी ॥ ५२ ॥ आतां स्वामींनींच सर्व करावें । मातें हृदयीं धरावें ॥ माझे मनोरथ पुरवावे । शरण आलों म्हणोनी ॥ ५३ ॥ माझें कांकू कांहींच नाहीं । सर्वज्ञ राया पडतों पायीं ॥ आहें सर्वांगीं अन्यायी । परी तुझा असें ॥ ५४ ॥ सर्व साधनाचें साधन । तुझे पायीं करितों नमन ॥ तुझें करितों नामस्मरण । हाचि माझा स्वधर्म ॥ ५५ ॥ तुम्हांतें भाकितों करुणा । हेंच माझें अनुष्ठान जाणा ॥ धर्म-कर्म-योग नाना । नाम तुझें सद्‌गुरो ॥ ५६ ॥ मुखीं नाम हृदयीं पाय । अन्य साधनाचें काम काय ॥ प्रसन्न होसी दत्तात्रेया । नमस्कारमात्रें ॥ ५७ ॥ गजेन्द्रें कोणतें साधन केलें । त्यातें कैसें सोडविलें ॥ युद्धीं पक्षिणीचीं पिलें । स्मरण करितां रक्षिलीं ॥ ५८ ॥ तुझें प्रेम दाटे पोटीं । याच आमुच्या

साधनकोटी ॥ नानासाधन हिंपुटी । कासया व्हावें ॥ ५९ ॥ माझें सर्व साधनांचें सार । स्वामीस घालितां नमस्कार ॥ सद्‌गुरूराया माझा भार । तूंचि वाहसी ॥ ६६० ॥ आतां माझी दीनता ॥ पाहोनि पावावें रमाकांता ॥ नमन करितों क्षमावन्ता । भेट देईं लवकरी ॥ ६१ ॥ वेगें देईं दर्शन । करीं माझें समाधान ॥ मागुती करितों साष्टांग-नमन । दत्तात्रेया सद्‌गुरो ॥ ६२ ॥ तुजचि माझा गौरव । अंगें करणें असे देव ॥ जाणोनि माझा अंतर्भाव । वेगें धांव दयाळा ॥ ६३ ॥ कोठें गुंतवूं नको दयाळा । नमन करितों वेळोवेळां ॥ मज कोणाचाही बांधेला । न करीं आतां दयाघना ॥ ६४ ॥ चक्षुहीन पादहीन । शक्तिहीन साधनहीन ॥ बुद्धिहीन रानोरान । कोठं फिरूं मी दयाळा ॥ ६५ ॥ तुझिये द्वारीं उभा राहिलों । तूतेंच शरण आलों ॥ सद्‌गुरू तुझेच पायीं पडलों । सर्वज्ञ-समर्था करुणाघना ॥ ६६ ॥ आतां कोठें दवडिसी । कोठें कोठें हिंडविसी ॥ कोणत्या राना मोकलिसी । शरणागतवत्सल तूं ॥ ६७ ॥ शीत उष्ण तहान भूक । मजकरवीं सोसविसी देख ॥ यांत तुझी लक्ष्मीनायक । तृप्ती कायसी ॥ ६८ ॥ तूंचि आमुची गती असती । आम्हां व्याघ्रादिकां हातीं भक्ष-विसी ॥ कोठें नेऊन मारिसी । उपवासी मज ॥ ६९ ॥ तरी माझें चाले काय । मी तों धरिले तुझे पाय ॥ माझे

प्राणाचा अपाय । कैसा करिसी शरण येतां ॥ ६७० ॥ माझें तन-मन-धन । सर्व कांहीं जीव प्राण ॥ तूंच आहेस नारायण । देणें घेणें कायसें ॥ ७१ ॥ तूतें द्यावया पाहीं । माझे पाशीं कांहींच नाहीं ॥ सद्गुरूराया सगळा मीही । तुझाचि असें ॥ ७२ ॥ मी माझें कांहीं असावें । तें तूतें मीं द्यावें ॥ तुमचेंच आहे आघवें । मज समवेत ॥ ७३ ॥ आतां तूंच सार करणें । मज मारणें अथवा वांचविणें ॥ माझा समाचार घेणें । तूजचि देवा ॥ ७४ ॥ मज जरी दुःख झालें । तरी तुझेंच नांव बुडालें ॥ तुझींच वंदीत असतां पाउलें । दुःखी आम्हीं कां व्हावें ॥ ७५ ॥ मी अधैर्यराशी कातर । तूं जाणसी अंतर ॥ लोटोनि द्याव-याचा विचार । कैसा करिसी दयाळा ॥ ७६ ॥ मी तुझे वियोगेंच मेलों । मज काय मारिसी दयाळो ॥ दयाळू जाणोनि शरण आलों । उपेक्षूं नको सर्वज्ञा ॥ ७७ ॥ मी तों आधींच दुःखी आहें । कधीं येशील वाट पाहें ॥ भरं-वसा धरोनि वंदिताहें । पाउलें समर्थाचीं ॥ ७८ ॥ आतां मातें भेट द्यावी । पाहिजे तेथें नेऊनि ठेवीं ॥ जैसें पाहिजे तैसें वागवीं । तुझा आहें म्हणोनी ॥ ७९ ॥ माझे अंतरींचें गुज । जाणोनि रक्षीं आतां मज ॥ साष्टांग नमस्कार करितों तुज । सर्वज्ञ समर्था सद्गुरो ॥ ६८० ॥ आधींच तुझिये मायेनें भ्रमलों । आणीक भ्रमविसी दयाळो ॥ नामरूपीं

भांबावलों । न सुचे कांहीं ॥ ८१ ॥ आम्हांस जरी गुंत-
विलें । तुम्हांसीच पाहिजे सोडविलें ॥ येथें आमुचें कांहीं
न चाले । तूंचि जाणसी ॥ ८२ ॥ दत्तात्रेया माझें हित ।
जें काय आहे उचित ॥ तेंचि करावें त्वरित । सर्वज्ञ देवा
॥ ८३ ॥ तूं भवरोगवैद्य अससी । सर्व चिकित्सा
करिसी ॥ तसेंच त्यातें औषध देसी । अधिकार पाहोनी
॥ ८४ ॥ चिकित्सा माझिये रोगाची । तुम्हीं आधीं केली
साची ॥ आतां माझे मनोरथाची । पूर्णता करावी ॥ ८५ ॥
मी तों कांहींचि नेणें । माझें हित सद्गुरू जाणे ॥ तेंचि
माझे हातीं देणें । नलगे अन्य ॥ ८६ ॥ मज तरी तूंच
व्हावा । दुसरा संबंध नसावा ॥ निरंतर तुझीच सेवा ।
घडावी मज ॥ ८७ ॥ जें कांहीं सांगतां येईना । त्याही
जाणसी अंतर-खुणा ॥ माझा शेवट नारायणा । तूंचि
लावीं निजांगें ॥ ८८ ॥ आम्हीं कुपथ्य कीजेल । तें तूंतेंचि
निस्तारावें लागेल ॥ ऐसें समजोनि न लावितां वेळ ।
उचित असेल तें करावें ॥ ८९ ॥ तुजवांचोनि माझी
चेष्टा । कांहीं न होय देवा वरिष्ठा ॥ ऐसें समजोनि सर्वा-
वशिष्टा । योग्य असेल तें करावें ॥ ६९० ॥ जेणें माझें
समाधान राहे । जें काय माझें हित आहे ॥ तें तूंतेंच
माहीत आहे । अंतरसाक्षी सर्वज्ञा ॥ ९१ ॥ बरवें जाणोनि
माझें हित । जें तुज असेल उचित ॥ तेंचि आतां त्वरित ।

सद्गुरू स्वामी करावें ॥ ९२ ॥ मी तों कांहींच नेणें । परी तूतें माझें हित करणें ॥ व्यर्थ जाऊं न देणें । आयुष्य माझें ॥ ९३ ॥ माझें अंतरींची हळहळ । जेणें होईल शीतळ ॥ तुज ठाऊक आहे सकळ । शरणागत हितकरा ॥ ९४ ॥ मज अपार ऐश्वर्य दिलें । अथवा इंद्रपद भोग-विलें ॥ तेणें माझें समाधान झालें । ऐसें न घडे ॥ ९५ ॥ यावत् तुमची भेट झाली नाहीं । मज शब्द सांगीतले नाहीं ॥ तावत्पर्यंत माझें पाहीं । समाधान सर्वथा घडेना ॥ ९६ ॥ तोंवरी तडफडितचि असें । परदेशींच एकला वसें ॥ तुजवीण माझा कोणी नसे । समाधान करिता ॥ ९७ ॥ तोंवरी मी दुःखीच्च असें । तोंवरी माझें दैन्य न नासे ॥ तावत् माझ्या अंतरीं वसे । चिंता हळहळ तळमळ ॥ ९८ ॥ जरी मी तडफडितची राहिलों । चिंता-ग्रस्तचि वाहवलों ॥ तळमळतचि मेलों । तरी बिरुदें गेलीं स्वामीचीं ॥ ९९ ॥ म्हणोनि आतां कांहीं । विघ्न होऊं न देई ॥ जेणें माथा तुझे पायीं । ठेवीन ऐसें करावें ॥ ७०० ॥ आतां मातें दर्शनची द्यावें । देऊनि समा-धान करावें ॥ आपुले पायींच ठेवावें । सेवा करवोनी ॥ १ ॥ वारंवार भाकितों करुणा । कैसें हृदय द्रवेना ॥ सर्वज्ञ करुणेच्या घना । दत्तदेवा ॥ २ ॥ माझी वेडी वांकुडी वर्तणूक । सत्यासत्य बोलणूक ॥ नाना छंद नाना

कौतुक । पाहोनि तुम्ही विटूं नये ॥ ३ ॥ तूतेंच सर्व प्रकारें आहे शरण । यांत कांहींच संशय नसे जाण ॥ हें मिथ्या असेल तरी पतन । पावेन मी ॥ ४ ॥ सर्व प्रकारें रुजूचि आहें । तुझीच वाट पाहताहें ॥ तुजवीण दुसरें कांहीं न साहें । आण तुझी सर्वज्ञा ॥ ५ ॥ तूंचि माझी विश्रांती । तूंचि माझी गती ॥ हे अन्यथा असत्य वचनोक्ती । अधोगती घडो मज ॥ ६ ॥ ऐसें असतां पाहीं । प्रारब्धें विपरीत घडलें कांहीं ॥ जाणोनि पारखा न होई । सर्वज्ञ देवा ॥ ७ ॥ सर्वज्ञासी कांहीं । सांगायाचें प्रयोजन नाहीं ॥ परंतु राहवेना म्हणोनि पाहीं । निवेदन करितों ॥ ८ ॥ तूं सर्वज्ञ आहेसी । म्हणोनि धोका नाहीं मानसीं ॥ सर्व कांहीं जाणसी । अंतरभाव सदसत ॥ ९ ॥ माझें करणें सर्व कांहीं । तुझे साठींच पाहीं ॥ माझें स्वहित तुझेचि पायीं । असे सत्य ॥ ७१० ॥ म्हणोनि माझी कांहीं करणी । बरी वाईट घडली भुवनीं ॥ लक्षांत आणोनि अंतरज्ञानी । त्याग माझा न करावा ॥ ११ ॥ मी तुझें खोडकर लेंकरूं । मूर्ख चपळ भीतरू ॥ आळसी अपवित्र अधीरू । अंगिकारीं सद्गुरो ॥ १२ ॥ माझे ठायीं दुर्गुण अशेष । मी कलंकी अपराधी निःशेष ॥ आतां मूर्तिमंत दोषाचा दोष । काय पाहसी समदर्शी ॥ १३ ॥ ऐशाही दोषांच्या राशी । शरण आलों हृषीकेशी ॥ भरंवसा

धरोनि समदर्शी । तुझे ब्रीदांचा ॥ १४ ॥ तूं अंगिकार करशील सत्य । भरंवसा आहे सत्य सत्य ॥ तूंचि मजला त्रिसत्य । आधार आहेसी ॥ १५ ॥ मातें देशील दर्शन । पाहिजे तसें अभयदान ॥ दर्शन देऊनि करिशील समाधान । आतांच माझें ॥ १६ ॥ ऐसा दृढ भरंवसा । धरोनि शरण आलों जगदीशा ॥ सामान्य म्हणोनि उपेक्षा । न करीं माझी सद्गुरो ॥ १७ ॥ आतां अवधी राहिली नाहीं । दारुण वेळा आली पाहीं ॥ अजूनि बैसविसी कांहीं । धांव दयाळा सद्गुरो ॥ १८ ॥ आतां धांवोनि भेटी देई । माथा ठेवितों तुझे पायीं ॥ मनोरथ पुरवीं माझे आई । दत्तात्रेया सद्गुरो ॥ १९ ॥ नाना अन्याय होती । नाना विघ्नें कोसळती ॥ नाना प्रकारचीं येती । आडवीं द्वंद्वें ॥ ७२० ॥ मी तों आधींच अज्ञानराशी । माझी परीक्षा काय पाहसी ॥ आहें तसा जाणसी । सर्वज्ञ देवा ॥ २१ ॥ माझे अंगीं कर्माकर्म । नानाविध धर्माधर्म ॥ लावूं नको जाणसी वर्म । सर्वातीता निष्क्रिया ॥ २२ ॥ दोन्ही मांडव साजिरे । तूतेंच करणें सारे ॥ ऐसें असतां सांवळ्या कांरे । छळिसी मज ॥ २३ ॥ तुझा आहें म्हणोनि । माझे गुणदोष न गणीं ॥ आतांचि धांव घालोनी । शरणागतातें सांभाळीं ॥ २४ ॥ आतां सांगावें कैसें । सर्व जाणसी आपैसें ॥ कोठेंही चैन नसे । केवीं राहूं दयाळा

॥ २५ ॥ थकले सारे उपाय । आतां स्वामी करावें काय ॥ कोण माझे अपाय । दूर करी तुजविणें ॥ २६ ॥ आतां स्वामी त्वरा करावी । माझी आशा पुरवावी ॥ आतां वृथा न दवडावी । गुरुसेवेची नरतनू ॥ २७ ॥ देवा फार वाटते खंती । प्राण माझे कालवती ॥ तुझा असें मी विपत्ती । न करीं माझी सद्गुरो ॥ २८ ॥ मशकावरी वज्रपात । पिपिल्लिकेवरी पर्वत ॥ तैसा माझा अपघात । शरणागताचा न करावा ॥ २९ ॥ आली अवगतीची वेळा । उडी घालीं गोपाळा ॥ नको उपेक्षूं कृपाळा । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ७३० ॥ तूं परम कृपावंत । नको पाहूं माझा अंत ॥ फार वाटताहे खंत । सर्व कांहीं जाणसी ॥ ३१ ॥ जैसा चक्षु-पाद-हीन । कंठीं उरला प्राण ॥ समाचार घ्यावया कोणी आन । जवळ नाहीं ॥ ३२ ॥ ऐशी अवस्था माझी झाली । बुद्धि चिन्ता-डोहीं बुडाली ॥ व्यर्थ माझी चालिली । वयसा देवा ॥ ३३ ॥ पाव दयाळूच्या राजा । क्षमावंत अनंतभुजा ॥ अनंतनेत्रा आहे तुझा । अनंतश्रोत्रा सद्गुरो ॥ ३४ ॥ अनंतचरणा अनंतमुखा । अनंतनामागुणा अनंतसुखा ॥ अनंतबळ तूं माझा सखा । विलंब आतां न लावीं ॥ ३५ ॥ माझी काय पाहसी करणी । समदर्शी तूं माझा धनी ॥ आतां माझी जांचणी । फार झाली ॥ ३६ ॥ आतां यावी माझी करुणा । हात जोडोनि लागतों

चरणा ॥ आतां न दावीं यातना । दत्तात्रेया दयाळा ॥ ३७ ॥ तूं माझी माउली । याच वेळे धांव घालीं ॥ आतांच माझी आशा पुरविली । पाहिजे देवा ॥ ३८ ॥ जें जें कांहीं निवेदावें । तें तें सरलें आघवें ॥ काय आतां सांगावें । सद्‌गुरूराया ॥ ३९ ॥ ऐसें काय राहिलें । जें तुज नाहीं समजलें ॥ सर्वज्ञासी काय ठेविलें । चोरोनि आम्हीं ॥ ७४० ॥ आतां कैसी विनंती । करावी हे कमळा-पती ॥ कैसा तरी काकूळती । येऊं स्वामी ॥ ४१ ॥ कोठवरी दुःख सांगूं । कैसी तरी भिक्षा मागूं ॥ आतां कोठवरी भोगूं । वियोग स्वामीचा ॥ ४२ ॥ तुझी आशा मोठीच धरिली । तूं तों निष्ठुरता वरिली ॥ तुझी ब्रीदावळी काय पुरिली । नेवोनि कोणीं ॥ ४३ ॥ काय झालें हें दयाळा । कां न येई कळवळा ॥ करुणा भाकितों वेळो-वेळां । कैसें द्रवेना अंतर ॥ ४४ ॥ यापरतें काय करावें । कोणत्या प्रकारें रिझवावें ॥ वेगीं आतां कळवावें । रिझसी जेणें ॥ ४५ ॥ जेणें तुम्हीं रिझावें । तेंचि मज हातीं करवावें ॥ रिझणें रिझवणें आघवें । सर्व तुम्हांकडे जी ॥ ४६ ॥ मी सर्व प्रकारें रुजू आहें । स्वामीतें ठाऊकचि आहे ॥ तुझे साठीं देवा पाहें । काय एक न करीं मी ॥ ४७ ॥ तूंचि माझी विश्रांति । परी सर्व तुझे हातीं ॥ सर्व कांहीं माझी गती । तूंचि देवा ॥ ४८ ॥ शरण

आलों जिवेंभावें । आतां मातें सांगावें ॥ माझ हातीं तें करवावें । जेणें दर्शन देसी तूं ॥ ४९ ॥ माझें सामर्थ्य सरलें । तुज सर्व निवेदिलें ॥ आतां माझा कांहीं न चाले । उपाय देवा ॥ ७५० ॥ आतां तुम्हींच द्रवावें । मज दर्शन द्यावें ॥ माझें समाधान करावें । नमन करितों म्हणोनी ॥ ५१ ॥ माझिये थोडके जीवित्वासाठीं । काय करविसी आटाआटी ॥ समर्थ असोनि संकटीं । पाडिलें मज ॥ ५२ ॥ आतां सोडवीं दातारा । तुजवीण मजला नाहीं थारा ॥ भिक्षा घालीं पूर्ण उदारा । अभय देई मज वेगीं ॥ ५३ ॥ आतां कैसा धीर धरूं । कोणता उपाय करूं ॥ कोठें राहूं कोठें फिरूं । दयासिंधो सद्गुरो ॥ ५४ ॥ देवा आतां अती वेळा झाली । माझी अन्तवेळा आली ॥ दयाघना उडी घालीं । आतांचि गुरो ॥ ५५ ॥ शरणागतातें काय छळणें । दुःखितासी दुःख देणें ॥ मेल्याशींचि मारणें । श्लाध्य नव्हे तुज देवा ॥ ५६ ॥ क्षणक्षणा वाट पाहें । भावें करुणा भाकिताहें ॥ सद्गुरो आतां दावी पाय । नमन करितों तुज देवा ॥ ५७ ॥ तूंच अनाथाचा नाथ अससी । नाना संकटांपासोनि सोडविसी ॥ शरणागताचा अंगें करिसी । संभाळ तूं ॥ ५८ ॥ दुःखिताचें दुःख दवडिसी । प्रणताचें पाळण करिसी ॥ भिक्षुकाचा समाचार घेसी । अचलदान देवोनी

॥ ५९ ॥ मजविषयींच काय झालें । करुणा सामर्थ्य कोठें गेलें ॥ सद्गुरूराया आपुलीं पाउलें । दावीं आतां ॥ ७६० ॥ तूं जैसा असावा तैसा अससी । तत्काळचि धांवसी ॥ विलम्ब कासया लाविसी । परम दयाळो ॥ ६१ ॥ बोलिलेंच बोलिलें । निवेदिलेंच निवेदन केलें ॥ आतां काय राहिलें । दत्तात्रेया दयाळा ॥ ६२ ॥ अजूनि कैसा ना द्रवसी । दयाळू असतां अन्त पाहसी ॥ सर्वज्ञ असतां न येसी । धांवोनि आतां ॥ ६३ ॥ दत्तात्रेया माझे आई । माथा ठेवितों तुझे पायीं ॥ आतांचि धांवोनि दर्शन देई । मनोरथ पुरवीं दासाचे ॥ ६४ ॥ सत्ता तुझी सारखी । सर्वदा वर्ते त्रिलोकीं ॥ माझे कडे अवलोकीं । कृपावन्ता ॥ ६५ ॥ तुझे सत्तेनें दिनकर । तुझे सत्तें समीर ॥ तुझे सत्तें वैश्वानर । वर्ते लोकीं ॥ ६६ ॥ तुझे सत्तें जळधर । तुझे सत्तें फणिवर ॥ तुझेच सत्तें सागर । मर्यादा न सांडी ॥ ६७ ॥ तुझेचि सत्तें ब्रह्मा आपण । करी जगताचें सृजन ॥ विष्णू करितो पालन । तुझेचि सत्तें ॥ ६८ ॥ तुझे सत्तें महेश । करि जगताचा नाश ॥ तुझे सत्तें सुरेश । इन्द्रपद भोगी ॥ ६९ ॥ तुझे सत्तें सुरनर । सिद्ध गन्धर्व किन्नर ॥ ऋषी मुनी चराचर । तुझे सत्तें वागती ॥ ७७० ॥ मृत्यु तुझेच सत्तें । वागे, ग्रासी सर्वांतें ॥ तुझी सत्ता मृत्युतें । मारणारी ॥ ७१ ॥ तुझे सत्तें तारागण । अम्बरीं वागे निशारमण ॥

तुझे सत्तें सकल भुवन । वर्ते निकें ॥ ७२ ॥ तुझे सत्तें वन-
माळी । वृक्ष औषधी नाना वल्ली ॥ फळती काळीं अकाळीं ।
तुझी सत्ता अपार ॥ ७३ ॥ दत्तात्रेया, तुझे सत्तें । लक्ष्मी
सर्वत्र वागते ॥ जगज्जननी बोलिजे ते । तुझे सत्तें सद्‌गुरू
॥ ७४ ॥ ऐसी तुझी अपार सत्ता । सर्वदा वागे सद्‌गुरुनाथा ॥
आतांचि मजला अभय देतां । कोठें गेलां गुरुवर्या ॥ ७५ ॥
तूं कालत्रयीं सारिखा ॥ समदर्शी सर्वसखा ॥ मजविषयीं
लक्ष्मीनायका । उदासीनता न धरीं तूं ॥ ७६ ॥ माझें काय
काय कृत्य स्मरसी । काय काय माझे अंगीं लाविसी ॥
कितीक आतां अपराध गणिसी । सद्‌गुरुराया ॥ ७७ ॥
आतां किती विलंब लाविसी । किती तरी अपेष्टा करिसी ॥
आतां कधीं कृपा करिसी । दयासिंधो समदर्शी ॥ ७८ ॥
तुझेचि हातीं दिधले हात । आतां न करीं माझा घात ॥
ब्रीद तुझें विख्यात । भुवनत्रयीं सद्‌गुरो ॥ ७९ ॥ कष्ट
देवोनि तुष्ट होणें । हें तूतें अश्लाघ्यवाणें ॥ म्हणोनि
आतांचि धांवणें । दत्तात्रेया ॥ ७८० ॥ चोराचेंही अंतर
द्रवतें । कैसी करुणा नये तूतें ॥ श्रमविसी शरणागतातें ।
सर्वज्ञ समर्था दयाळो ॥ ८१ ॥ कैसा माझा विसर पडला ।
तुझा स्वभाव कोठें गेला ॥ सखया आतां कोणता राहिला ।
विनंतीचा प्रकार ॥ ८२ ॥ त्रैलोक्याचें पोषण करिसी । नमन
करितां मारिसी ॥ शरण येतां हांकून देसी । दयाळू हें अनुचित

॥ ८३ ॥ सांग आतां दयाळा । कां नये माझा कळवळा ॥ किती राहिली वेळा । दर्शन द्यावयाची ॥ ८४ ॥ देवा कांहींच अवधी राहिली नाहीं ॥ तूंचि विचारूनि पाहीं ॥ आतां विलंब कांहीं । लावूं नको दयाळा ॥ ८५ ॥ चिन्ताडोहीं बुडालों । वाट पाहत बैसलों ॥ सद्गुरू माये दयाळो । येईं आतां ॥ ८६ ॥ देवा आतांच अंगिकारीं । मातें हृदयीं धरीं ॥ माझें समाधान करीं । सर्वज्ञ देवा ॥ ८७ ॥ आजपर्यंत देवें कांहीं । शरणागत उपेक्षिला नाहीं ॥ येवोनि पडलों तुझे पायीं । त्याग माझा न करीं तूं ॥ ८८ ॥ आतां कितीक वेळ लाविसी । कधीं माझा समाचार घेसी ॥ वाट पाहत परदेशीं । बैसलों आहें ॥ ८९ ॥ करोनियां तांतडी । अकस्मातची घालीं उडी ॥ तुझे पराक्रमाची प्रौढी । अपार आहे ॥ ७९० ॥ आतांचे आतां । काय एक न करिसी रमाकान्ता ॥ सर्व गुण सकळकळावन्ता । सर्वज्ञ देवा ॥ ९१ ॥ तूतें सर्वथा शरण आलों । नको विलम्ब लावूं दयाळो ॥ तार आतां घाबरलों । दीन दयाळो सर्वज्ञा ॥ ९२ ॥ रामा कृष्णा गोविन्दा । दत्तात्रेया सच्चिदानंदा ॥ दयासागरा निर्द्वंद्वा । धांव आतां ॥ ९३ ॥ माथा ठेविला तुझे पायीं । धांव आतां सद्गुरू आई ॥ आतांचि देवा अनंत उपायीं । रक्षीं मज ॥ ९४ ॥ आतां सर्व बोलणें सरलें । माझे कंठी प्राण उरले ॥ धांव

धांव पाउलें । दाखवीं आतां ॥ ९५ ॥ हातीं घेई सुदर्शन । गुरुराजा दया-पूर्ण ॥ येई धांवोन । अवधी नाहीं राहिली ॥ ९६ ॥ आतां कोणती अवधी । समर्थ असतां पाहसी ॥ अजुनि कोणता विचार करिसी । सर्वज्ञ दयाळा ॥ ९७ ॥ आतां स्वामी उठावें । धांवतचि यावें ॥ अंगेंचि आतां सांभाळावें । तुझा आहें म्हणोनी ॥ ९८ ॥ समर्थासी भाकिली करुणा । व्यर्थ न करीं नारायणा ॥ नको आतां यातना । दाखवू दयाळा ॥ ९९ ॥ यावा आतां कळवळा । अत्री-अनसूयेच्या बाळा ॥ आतांचि येई अनंतबळा । महापुरुषा सर्वज्ञा ॥ ८०० ॥ तुझी अतर्क्य करणी । याच वेळे याच क्षणीं ॥ काय एक न करिसी चक्रपाणी । महासमर्था सर्वज्ञा ॥ १ ॥ आतां त्वरा करावी । मातें भिक्षा घालावी ॥ आशा माझी पुरवावी । देऊनि भेटी ॥ २ ॥ सद्गुरूराया वारवार । साष्टांग करितों नमस्कार ॥ आतां कांहींच उशीर । लावूं नको दयाळा ॥ ३ ॥ शरीर झुरणीस लागलें । नाना रोगें व्यापिलें ॥ आयुष्यही सरत आलें । दीनबंधो ॥ ४ ॥ चोर मांग गवाशन । यांचेंही द्रवतें अंतःकरण ॥ करुणाघनातें आलों शरण । दुर्दशा माझी न करावी ॥ ५ ॥ जरी मातें अत्यंत छळिलें । गांजगांजून रडविलें ॥ तुझे हातीं काय आलें । ऐसी करितां विटंबना ॥ ६ ॥ रानोरानीं फिरविलें । अथवा उपवासीं

मारिलें ॥ जरी माझे प्राण गेले । लाभ कोणता झाला तुज ॥ ७ ॥ एक दिवस मरण आहे । तेथें उपाय करिसी काय ॥ वंदित असतां तुझे पाय । चक्र कैसें हाणिसी ॥ ८ ॥ निजकर्मेंचि भोगितों व्यथा । परी तुज शरण आलों त्रैलोक्यनाथा ॥ तुझें पायीं ठेवितों माथा । दुःख माझें निरसावें ॥ ९ ॥ जें काय मातें दुःख आहे । तें तूंचि जाणसी पाहें ॥ तुज सामर्थ्यही आहे । दुःख निरसावयाचें ॥ १० ॥ दुःखाचें कराया निरसन । सद्गुरू तूतें आलों शरण ॥ दुःखचि दाविसी दारुण । सर्वज्ञ समर्थ असतांही ॥ ११ ॥ जैसा माझा हेतू आहे । तैसा आतांचि पुरवीं पाहें ॥ विलंब लावितां वृथा होय । ब्रीदावळी स्वामीची ॥ १२ ॥ व्हावें तेसें अभय आतां । जरी न देसी रमानाथा ॥ जरी देसी काळांतरीं तत्वता । तरी ब्रिद हें व्यर्थ ॥ १३ ॥ व्हावें तेसें आतांच न दिलें । ऐसेंच माझें शरीर गेलें ॥ तुझें वहावलें । सकळ ब्रीद ॥ १४ ॥ तुझें अपार ब्रीद गाजलें नसतें । तरी कोण तूतें शरण येतें ॥ मग भोगिलेंचि असतें । स्वकर्म ॥ १५ ॥ जिवंत असतां दुःख देणें । मारूनि वैकुंठीं नेणें ॥ जळो ऐसें अभय देणें । आश्रिता अमरपदा ॥ १६ ॥ तूं सकळ-कळा-सामर्थ्यपूर्ण । आहेसि म्हणोनि आलों शरण ॥ नमन करितां दुःख दारुण । कैसें दाविसी सर्वज्ञा ॥ १७ ॥ वारंवार हांक

मारितों । म्हणोनि मीच तुझे डोळ्यांत खुपतों ॥ माझा नाश करूं पाहतो । एवढा समर्थ समदर्शी ॥ १८ ॥ जरी मातें अत्यंत छळिसी । तरी तूंचि माझी गती असरी ॥ माझी विश्रांति हृषीकेशी । तुझेचि पायीं ॥ १९ ॥ मातें कोठेंचि ठाव नाहीं । म्हणोनि पडतों तुझे पायीं ॥ धांव घालीं माझे आई । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ८२० ॥ चपळपणें वाचाळपणें । वात्रटपणें मूर्खपणें ॥ बोलिलों जें अधीक उणें । क्षमा करीं सद्गुरो ॥ २१ ॥ मी जडमूढ अज्ञान । पामर खोटा गुणविहीन ॥ कैसा तरी नारायण । तुझाचि असें ॥ २२ ॥ लुब्ध कुश्चळ चावट । क्षुद्र कामी उद्धट ॥ तुजचि दावितों पाटपोट । दीनपणें दयाळो ॥ २३ ॥ कोणापुढें बोलावें । हितगुज कोणा सांगावें ॥ तुझा आहें जिवेंभावें । म्हणोनि बोलें तुजपाशीं ॥ २४ ॥ तूं दयावंत गुणराशी । सर्व माझें पोटीं घालिसी ॥ माझा अंगिकार करिसी । अभय देसी आतांचि तूं ॥ २५ ॥ नमस्कार करितों याची लाज । धरोनि आतां रक्षीं मज ॥ अंजुळी पसरिली सद्गुरो तुज । भिक्षा घालीं उदारा ॥ २६ ॥ काय करूं कोठें जाऊं । कैसा राहूं कोठें पाहूं ॥ कैसें आतां हृदय दावूं । वारंवार उकलोनी ॥ २७ ॥ जपतपादि साधन । पाठपूजा अनुष्ठान ॥ कांहीं न करवे नारायण । सर्व जाणसी अंतर तूं ॥ २८ ॥

मज आणीक कांहीं करवेना । कोणती करावी योजना ॥ नमस्कार करितों दयाघना । दत्तात्रेया धांव तूं ॥ २९ ॥ उगीच बैसलों आहें । भरंवसा धरोनि वाट पाहें ॥ धांव आतां लवलाहें । शरणागतवत्सल तूं ॥ ८३० ॥ माझा आतां हाचि उपाय । भावें वंदितों तुझे पाय ॥ धांव सद्गुरु दत्तात्रेय । प्रणत-क्लेश-विनाशका ॥ ३१ ॥ अभय द्यावयाची वेळा । हीच आहे परमदयाळा ॥ सद्गुरू येऊं दे कळवळा । पूर्णब्रह्म सनातना ॥ ३२ ॥ आपुले घरचें श्वान । त्याचा शोध घेती जन ॥ त्यातें दुःख होतां जाण । उपचार करिती ॥ ३३ ॥ तुझिये घरींचा मी श्वान । माझा समाचार घे नारायण ॥ सद्गुरू घालितों लोटांगण । तुझे चरणीं ॥ ३४ ॥ तूं निरुपाधी निःसंग खरा । तूतें नाहीं कर्तव्यपसारा ॥ पूर्णकाम आनंदनिर्भरा । काज नाहीं कोणासी ॥ ३५ ॥ यद्यपि ऐसें आहे । मी तथापि तुझी वाट पाहें ॥ तुझे बोलिल्याचा आहे । विश्वास मज ॥ ३६ ॥ जो मातें येईल शरण । त्यातें देतों अभयदान ॥ बोलिलासी सत्य वचन । नाना ग्रंथीं पुराणीं ॥ ३७ ॥ तुझिये वचनाचा विश्वास । धरोनि धरिली तुझी कास ॥ आतां मजविषयीं उदास । होऊं नको दयाळा ॥ ३८ ॥ आतां कितीक वेळ लाविसी । कधीं येवोनि अभय देसी ॥ वाट पाहें मी उपवासी । जेवूं घालीं गुरु माये ॥ ३९ ॥ न करीं आतां

टाळाटाळी । माझी अति अवस्था झाली ॥ आतां माझी आशा पुरविली । पाहिजे देवा ॥ ८४० ॥ आतांचि येई देवा आज । येऊनि अभय देई मज ॥ माझें आपुलें अंतरींचें गुज । ऐकावें सांगावें ॥ ४१ ॥ स्वामीगौरवाचा सोहळा । पाहीन आपुले डोळां ॥ ऐसें आतां त्रैलोक्यपाळा । करीं वेगें समर्था ॥ ४२ ॥ अतिसुलभा कोमळहृदया । निःशंका निर्गुणा निर्भया ॥ अनादिपुरुषा दत्तात्रेया । पाव आतां सर्वज्ञा ॥ ४३ ॥ धांव शरणागतप्रियकरा । धांव करुणेच्या सागरा ॥ धांव भक्तांच्या परमाधारा । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ४४ ॥ धांव संकष्ट-नाशका । धांव प्रपन्नरक्षका ॥ धांव ब्रह्मांडनायका । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ४५ ॥ तुझ्या भक्ताचा मनोरथ । तोच तुझा निजस्वार्थ ॥ नाना कौतुकें भक्तार्थ । करिसी तूं ॥ ४६ ॥ जरी मी खोटा भक्त । तथापि तुझाचि म्हणवितों व्यक्त ॥ हीच लज्जा धरोनि पक्षपात । करीं माझा सद्गुरो ॥ ४७ ॥ तूं खोट्याही दासाचा मान । खरा राखिसी नारायण ॥ तुझा स्वभावशीलगुण । कोण वर्णी अनंता ॥ ४८ ॥ मी खोटा तरी दयाळो । तुझा होऊनि वागलों ॥ तुझेचि नांवें विकलों । एवढी लज्जा रक्षावी ॥ ४९ ॥ अपराध फार केले । वंदितों तुझीं पाउलें ॥ सर्व माझे क्षमा केले । पाहिजे क्षमावंता ॥ ८५० ॥ कैसा तरी तुझा आहें । तुझींचि पाउलें वंदिताहें ॥ आतां

कृपादृष्टी पाहें । मजकडे दयाळा ॥ ५१ ॥ तुझिये संतुष्टते-कारणें । कोणतीं करूं मी अनुष्ठानें ॥ कोणतीं कोणतीं साधनें । करूं देवा ॥ ५२ ॥ जपतपादि नाना । साधन मातें करवेना ॥ आलस्यें अथवा प्रमादें म्हणा । अथवा इच्छा तुमची ॥ ५३ ॥ मज स्नानसंध्याही करवेना । एवढा आळस संचरला जाणा ॥ शरण आलों तुझे चरणा । म्हणोनि ऐसें झालें हें ॥ ५४ ॥ समर्थाची कांस धरिली । म्हणोनि स्नानसंध्या बुडाली ॥ नाना साधनें राहिलीं । तुझे पायीं गोविंदा ॥ ५५ ॥ करितां नाना साधन । तुझें मोडतें अनुष्ठान ॥ कंटाळा आला नारायण । मजला नाना साधनांचा ॥ ५६ ॥ नाना साधनीं मजला आतां । नको घालूं दयावंता ॥ तुझे चरणीं लक्ष्मीकांता । नमस्कार करितों मी ॥ ५७ ॥ तूतें नमस्कार करावा । तुझा महिमा वर्णावा, आइकावा ॥ तुझा मुखचंद्र अवलोकावा । निरंतर ॥ ५८ ॥ तुझे सन्मुख उभें रहावें । हितगुज तूतें सांगावें ॥ तुझ्या परिचर्येंत असावें । सर्वकाळ ॥ ५९ ॥ तुझेंच करावें नामस्मरण । तुझेंच असावें अनुसंधान ॥ हेंचि मातें साधन । आवडे अंतरापासोनी ॥ ८६० ॥ आवडे तें यथाशक्ति । करितों येतों काकुळती ॥ आतां यापरतें रमापती । कोणतें साधन करूं मी ॥ ६१ ॥ तुज आवडे जें हृषीकेशी । तेंचि मजकरवीं घडविसी ॥

आतां किती तरी छळिसी । विलंब लावोनी ॥ ६२ ॥
ज्याणें तिन्हाईत असावें । त्याणें अन्य साधन करावें ॥
फळ मागूनि वेगळें व्हावें । दात्यापाशीं ॥ ६३ ॥ तैसा
पारखा मी नाहीं । मी तों तुझे घरचा गुलाम पाहीं ॥
माझी गती तुझेचि पायीं । असे सत्य ॥ ६४ ॥ माझें सर्व
तें तुझेंचि साचें । तुझें तें माझ्या बापाचें ॥ तूंचि जाणसी
अंतरीचें । सर्व कांहीं ॥ ६५ ॥ तूंचि माझा मायबाप असती ।
माझा प्राणसखा तूं चिद्विलासी ॥ परब्रह्म अविनाशी । तूंचि
माझा स्वामी गुरू ॥ ६६ ॥ म्हणोनि जपतपादि अनुष्ठान ।
आचार नाना विधिविधान ॥ स्नानसंध्या सर्वसाधन । तूंचि
माझें ॥ ६७ ॥ तूं मायबापाहूनि मायावंत । तुझे ठायीं गुण
अनंत ॥ धांव आतां निवांत । बैसूं नको दयाळा ॥ ६८ ॥
सर्व कांहीं जाणसी । किती आतां अंत पाहसी ॥ धांव
दयाळा गुणराशी । दत्तात्रेया गुरुवर्या ॥ ६९ ॥ प्रसंग हाच
आहे । धांव आतां पाहसी काय ॥ दत्तात्रेया सद्गुरु माये ।
नमस्कार करितों मी ॥ ८७० ॥ कोठें जाऊं काय करूं ।
कोठें राहूं कोठें फिरूं ॥ कैसा वांचूं कैसा मरूं । दीन दयाळा
सद्गुरो ॥ ७१ ॥ मज दुःखापासोनि तारीं । धांव आतां
झडकरी ॥ सद्गुरु माये अंगिकारीं । नमन करितों तुजलागीं
॥ ७२ ॥ इति श्रीमत्परमतपःपरायण श्रीमन्नारायणविरचिते
करुणासागरे द्वितीयभागः समाप्तः ॥ ॥ श्रीगुरुदत्तचरणार्पणमस्तु ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ आधिं पोळवावें । मग उपचार करावे ॥ हें केसें म्हणावें बरवें । दयाळुपण ॥ ७३ ॥ धांव घालायाची हीच वेळा । न करीं आतां कंटाळा ॥ सर्वज्ञ समर्था कळवळा । येऊं देई आतांचि ॥ ७४ ॥ तुझिये दयाळुपणाचा । भरंवसा आहे मज साचा ॥ ऐकोनी दीन वाचा । धांव घाली सद्गुरो ॥ ७५ ॥ तुझे द्वारीं उत्तम पुरुषा । शरण आलों मथुरार्धाशा ॥ आतां कोठें लावण्यवेशा । पिटोनि देसी सर्वज्ञा ॥ ७६ ॥ लोकांचीं लेकुरें मूर्ख असती । त्यांचा ते समाचार घेती ॥ आपुल्या बाळातें गौरविती । विश्वजन ॥ ७७ ॥ मी तुझें दीन बालक । माझा मायबाप तूं जगज्जनक ॥ आतां निरसीं माझें दुःख । सर्वज्ञ समर्था दयाळा ॥ ७८ ॥ अनादि देवा सद्गुरुराया । परब्रह्म दत्तात्रेया ॥ तुजचि आहे माझी माया । प्रणतवत्सला उदारा ॥ ७९ ॥ धन्य मानवी माउली । बाळकातें कुरवाळी ॥ भूक लागतां जेऊं घाली । कळवळोनी ॥ ८० ॥ मातेच्या कळवळ्या परिस । तुझा अनंतगुणे विशेष ॥ मी बाळ तुझें जगदीश । सांभाळी समर्था ॥ ८१ ॥ नको लावूं काळवेळा । आतां यावा कळवळा ॥ दत्तात्रेया अत्यंत कोमळा । आतांच येई ॥ ८२ ॥ काय करूं राहवेना । म्हणोनि तरंग उठति नाना ॥ नको पाहूं कल्पना । दयापूर्णा धांव रे ॥ ८३ ॥ येथें आतां येच समयीं । भेट देई अभय देई ॥ दत्तात्रेया तुझे पायीं । ठेविला माथा सर्वज्ञा ॥ ८४ ॥

आतां माझें सामान्यपण । तुच्छपण पोरपण मलीनपण ॥
सर्व कांहीं हीनपण । नको पाहूं समदर्शी ॥ ८५ ॥ मी
निंद्यपथाचा ओहळ । तूं ब्रह्मगंगा केवळ ॥ अंग संगें निर्मळ ।
क्षणांत करिसी मज हरे ॥ ८६ ॥ आतां कांहीं मागें पुढें ।
नको पाहूं मी पायां पडे ॥ सद्गुरु माये घेईं कडे । दत्तात्रेया
सर्वज्ञा ॥ ८७ ॥ समर्था तूं कृपा करिसी । मग पूर्वस्थिती
राहेल कैसी ॥ आतां मजला विदेशीं । लोटूं नको दयाळा
॥ ८८ ॥ तुझे हातीं सर्व आहे । मी तुझाचि असें मजकडे
पाहें ॥ मी दुर्बळ मातें न साहे । वियोग तुझा ॥ ८९ ॥
देवा जें काय झालें । सर्व तुतें कळलें ॥ सर्व कांहीं शेवटा
नेलें । पाहिजे समर्था ॥ ९० ॥ तुझा आहे म्हणोनी ।
येऊनि पडलों तुझे चरणीं ॥ दत्तात्रेया दासाभिमानी । अभिमान
माझा धरावा ॥ ९१ ॥ तुज आपले मनोरथा परिस । भक्त
मनोरथ प्रिय विशेष ॥ शरणागताचा परम तोष । संतोष तुझा
होतसे ॥ ९२ ॥ तूं भक्त कौतुकी आहेसी । भक्तासंगें राहसी ॥
भक्तसंगें क्रीडसी । भक्तास व्हावा तैसा तूं ॥ ९३ ॥ भक्ताचे
मनोरथ । तोचि तुझा निजस्वार्थ ॥ निज भक्त कार्यार्थ । सदा
उद्यत अससी तूं ॥ ९४ ॥ भक्ताचा जो व्यवहार । तोचि तुझा
संसार ॥ निजभक्ताचा कदापी विसर । न पडे तुज ॥ ९५ ॥
भक्ता सन्निध अससी । मागें पुढें वागसी ॥ उष्ण लागतां छाया
करिसी । पितांबराची ॥ ९६ ॥ भक्तास लागतां तहान ।

तात्काळ होसी जीवन ॥ क्षुधा लागतां दिव्यान्न । होसी स्वयें ॥ ९७ ॥ भक्तासि होतां क्षीण । आड घालिसी सुदर्शन ॥ करिसी भक्ताचें समाधान । निजांगें तूं ॥ ९८ ॥ भक्त तुझें कुटुंब असे । भक्त तुझा आत्मा असे ॥ तुझे अंतरीं चिंता वसे । भक्ता कार्याची ॥ ९९ ॥ भक्त तुझा इष्टमित्र । भक्त तुझें कुळ गोत्र ॥ भक्त तुझे पुत्र कलत्र । सर्व कांहीं ॥ १०० ॥ भक्त तुझें धाम धन । भक्त तुझा जीव प्राण ॥ स्वतंत्र असतां भक्ताधीन । असती तूं ॥ १ ॥ तुज नावडे आपली काया । अत्यंत आहे भक्ताची माया ॥ धांव आतां सद्गुरुराया । दत्तात्रेया तुज नमो ॥ २ ॥ मी अतपस्क दुर्बळ । भाग्यहीन कुश्चळ ॥ परंतु माझा सद्गुरु प्रबळ । भरंवसा तुझा ॥ ३ ॥ जैसी पित्यानें संपदा मेळवावी । ती पुत्रानें भोगावी ॥ तैसी आपुले सद्गुरूची कमाई । भोगीन मी ॥ ४ ॥ आतां कितीक चाळविसी । किती विलंब लाविसी ॥ कितीक आतां भोगविसी । नाना कष्ट ॥ ५ ॥ आजपर्यंत कष्ट भोगविले । तेणें तुझें समाधान न झालें ॥ म्हणोनि नूतन नेम केले ॥ कष्ट द्यावयाचे ॥ ६ ॥ अनंत राक्षस वधिले । असंख्य राजे संहारिले ॥ तेणें तृप्त न झाले । भुजदंड तुझे ॥ ७ ॥ मी भयभीत दुर्बळ । शरण आलों जाणोनि दयाळ ॥ माझाच नाश करोनि शीतळ । करूं पहासी करकंडू ॥ ८ ॥ चक्र तुझें तेजोरासी । तेणें ची माझी मान कापिसी ॥ काय नवीन

परिक्षा घेसी । शस्त्रधारेची ॥ ९ ॥ तुझा बाण अतापरासी । फार दिवसांचा उपवासी ॥ म्हणोनि माझें रुधिर पाजिसी । शरणागताचें ॥ ११० ॥ तुझी गदा काय भुकेली । तुचले तुतें गुर्वी झाली ॥ म्हणोनि माझाचि बळी । देणें योजिला ॥ ११ ॥ बापाचीं श्राद्धें केलीं उदंड । परंतु तृप्ति न झाली अखंड ॥ म्हणोनि माझे शरीराचा पिंड । देऊं योजिला ॥ १२ ॥ तुझे घरिं दुष्काळ पडला । तुझा परिवार उपासी मेला ॥ म्हणोनि त्याचे निर्वाहाला । मांस माझें योजिलें ॥ १३ ॥ तुजला झाले कांहीं क्लेश । अथवा पडलें संकष्ट विशेष ॥ म्हणोनि केला त्वां देवीस नवस । शरणागताचे वधाचा ॥ १४ ॥ जंववरी मी जीत आहें एक । तववर तुज वाटे कंटक ॥ माझा नाश करोनि निष्कंटक । राष्ट्र पहासी ॥ १५ ॥ माझे घेऊनि प्राण । शीतळ करिसी आपलें मन ॥ होईल तुझे समाधान । निवतील डोळे ॥ १६ ॥ भक्त-रक्षक आहेसी । भक्तभक्षक होऊं पहासी ॥ काय तुतें ग्रहरासी । विपरीत आल्या ॥ १७ ॥ काय तुजला झडपणी झाली । तेणें तुझी बुद्धि गेली ॥ शरणागताची मांडिली । दुर्दशा कैसी ॥ १८ ॥ किंवा अनादि पुरातन । म्हणोनि आलें म्हातार-पण ॥ तेणें तुझें लक्षण गुण । सटवलें काय ॥ १९ ॥ फार केलीस रासक्रीडा । स्त्रीसंगतीनें झालासी वेडा ॥ कीं झालासी कानकाडा । लपविलें मुख ॥ १२० ॥ केली गोकुळीं

चोरी । म्हणोनि दडाला गिरीकपारीं ॥ किंवा कोठें परद्वारीं । रतलासी कुब्जेसी ॥ २१ ॥ स्त्रीबुद्धीस लागावें । पुत्रास वनास काढून द्यावें ॥ किंवा ऐसाचि देवें । कुळधर्म आपुला स्वीकारिला ॥ २२ ॥ वानराचि संगती केली । म्हणोनि तैसी मति झाली ॥ किंवा तुतें प्राप्त झाली । विपत्तिवेळा श्रीवरा ॥ २३ ॥ भक्त फार झाले । म्हणोनि तुतें दरिद्र आलें ॥ किंवा तुतें भोंवलें । कलियुग काय ॥ २४ ॥ सांग आतां दयाळा । एवढा विलंब कां लाविला ॥ किन्निमित्त राग आला । क्षमावंता हें सांगें ॥ २५ ॥ शरणागताची छळणा केली । यांत काय कीर्ति मेळविली ॥ किंवा कांहीं अधिक आली । शोभा तुज ॥ २६ ॥ कैसा मूग गिळोनि बैसला । कानांत बोटें घालोन निजला ॥ किंवा कांहीं पाजिलें तुजला । महादेवें ॥ २७ ॥ कोणता झाला प्रतिबंध । धांव आतां ब्रह्मानंद ॥ शरणागतातें परम सुखद । दुःख कैसा देतोसी ॥ २८ ॥ केले पराक्रम गाढे । ऋषी गाती पवाडे ॥ माझें दुःख निरसितां पडे । संकष्ट कैसें ॥ २९ ॥ पराक्रम केले अपार । परंतु कोणतें केलें सार ॥ जरी करिसी विचार । तरी फोल सारे ॥ १३० ॥ दुर्बळ नारी पूतना । तिचा प्राण घेतला जाणा ॥ यांत काय नारायणा । पराक्रम झाला ॥ ३१ ॥ बक दीन पाखरूं । त्याचा केला संहारू ॥ याचा करितां विचारू । पराक्रम कायसा ॥ ३२ ॥ पाहूनि कीट विशेष । सर्पाचा केला दर्पनाश ॥ लोकांतही

सर्पातें वश । गारोडी करितां ॥ ३३ ॥ एकटी वनांतरीं । मारिली ताटिका नारी ॥ दीन दुर्बळ बिचारी । शूर असतां ॥ ३४ ॥ भक्षित असतां तृण । मृग मरीची दीन ॥ त्याचा घेऊनि प्राण । पराक्रम केला ॥ ३५ ॥ जो वृक्षाचा विहारी । फळ पुष्पांचा आहारी ॥ वाळी वानर पृथ्वीवरी । व्राधिकपणीं मारिला ॥ ३६ ॥ जें युगादिचें पुरातन । शिवकोदंड जीर्ण ॥ त्याचें केलें खंडण । पराक्रम झाला ॥ ३७ ॥ विशेष कंदरा पाहोन । जो पोकळ पुरातन ॥ उचलोनि गोवर्धन । बळवंत झाला ॥ ३८ ॥ माझा दुःखरिपू मारवेना । माझें प्रारब्ध जाळवेना ॥ माझा भार झेलवेना । काय ऐसा पराक्रम ॥ ३९ ॥ जे तुतें शरण आले । त्यांतें दुःखचि दाखविलें ॥ तुझें दयाळुत्व कळों आलें । दत्तात्रेया ॥ १४० ॥ प्रल्हाद तुतें शरण आला । तो डोहामाजि लोटिला ॥ शेवटीं अग्नींतही टाकिला । दिधलें विष ॥ ४१ ॥ द्रौपदी तुझी बहिणोली । ते तुतें शरण आली ॥ तिची विटंबना केली । सभेमाजी ॥ ४२ ॥ पांडव तुझे भक्त जाण । त्यांतें फिरविलें रानोरान ॥ जटायूचा घेतला प्राण । भक्तवरदा ॥ ४३ ॥ मांडव तुझा भक्त हरी । त्यातें दिधलें शूळावरी ॥ पाणी भरविलें डोंबाघरीं । हरिश्चंद्रातें ॥ ४४ ॥ ऐसी तुझी विपरीत करणी । कोण जाणे कोण वर्णी ॥ जेणें बापासी म्हातारपणीं । दुःख देऊनि मारविलें ॥ ४५ ॥ रेणुके मातेचा वध केला । देवकी

जननीस बंधिशाळा ॥ उडविला गोपिकांचा मेळा । यशोदे समवेत ॥ ४६ ॥ ज्याणें तुझे पाय धरिले । त्यातें त्वां दुःखचि दिल्हें ॥ शरणागतातें रडविलें । जेथें तेथें ॥ ४७ ॥ नाना देवांचे भक्त असती । सर्वच विलास करिती ॥ तूं निजभक्ताची फजिती । करिसी स्वयें ॥ ४८ ॥ नकळे कोणती मोहिनी । घालोनि लाविसी आपुले भजनीं ॥ भूलथाप देवोनि । फांसा घालिसी ॥ ४९ ॥ तुजसीं प्रसंग पडतां । तुझे पायीं प्रेम जडतां ॥ मग अनंत उपाय करितां । न सुटे मिठी ॥ १५० ॥ ऐसा तूं परम गारोडी । नादीं लावोनि करिसी वेडीं ॥ होतां हिंपुटीं बापुडीं । कष्ट भोगिती मनुष्यें ॥ ५१ ॥ आधिं मातें नादीं लाविलें । आतां माझें छळण आरंभिलें ॥ वंदित असतां पाउलें । मारीन म्हणसी ॥ ५२ ॥ शरणागताचा करितां अपाय । यांत तुतें लाभ काय ॥ अभय देतां दत्तात्रेय । हाणी कोणती समर्था ॥ ५३ ॥ मी तुझा आहें । केव्हां येसील वाट पाहें ॥ धांव आतां दावी पाये । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ५४ ॥ मी अधिक उणें बोलिलों । क्षमा करीं तूं दयाळो ॥ काय करिसी मी भागलों । जाणसी तूं ॥ ५५ ॥ देवा कोणापुढें बोलावें । कोणास हृदय दाखवावें ॥ कोणास काकुलती यावें । तुजवांचोनि सद्गुरो ॥ ५६ ॥ कोणें माझें सोसावें । कोणें मज आपलें म्हणावें ॥ कोणें माझे लळे पुरवावे । तुज-वांचोनि सद्गुरो ॥ ५७ ॥ कोण निवारी माझें दुःख ।

कोण पाहील माझें मुख ॥ कोण वारील तहान भूक । तुज-वांचोनि ॥ ५८ ॥ कोणास देऊं परिहार । कोणास घालूं नमस्कार ॥ कोण माझा समाचार । घेईल तुजवांचोनि ॥ ५९ ॥ कैसा तरी केशवा । माझा वृत्तांत तुज कळावा ॥ म्हणोनि नाना प्रकारें सद्गुरुदेवा । आळवी तुज ॥ १६० ॥ वृत्तांत आधिं कळलाच आहे । कळवावा हा बोल न साहे ॥ राहवेना करूं काय । हेंही जाणसी सर्वज्ञा ॥ ६१ ॥ तुझे सारिखा करुणाराशी । कोणी नाहीं हृषीकेशी ॥ हेतुवांचूनि प्रीति करिसी । शरणागताची ॥ ६२ ॥ तूं ब्रह्मानंद स्वाराम । स्वयंतृप्त पूर्णकाम ॥ शुद्ध निरहं विश्राम । मुनिजनांचा ॥ ६३ ॥ तथापि आहेस करुणाघन । म्हणोनि झालासी भक्ताधीन ॥ अर्जुनाचा गाडीवान । निजलाभतुष्टा झालासी ॥ ६४ ॥ जो निजानंदें तृप्त होय । त्यातें कोणासी काज काय ॥ तथापि भक्ताचे अपाय । दूर करी निजांगें ॥ ६५ ॥ भक्त जाणोनि अंबरीशी । त्या कारणें जन्म सोशी ॥ आणिक दयाळुता कैसी । निरपेक्षाची असावी ॥ ६६ ॥ जो यज्ञभुक्त होय । तो भिल्लिणीचें उच्छिष्ट खाय ॥ हें दयाळुत्व नव्हे तरी काय । नित्यतृप्ताचें ॥ ६७ ॥ जो निजानंदीं डोले । तेणें वानर मित्र केले ॥ दंडकवनीं पायीं चाले । अनपेक्ष असतां ॥ ६८ ॥ कोठें शुद्ध निरंजन । कोठें गोपी मलिन ॥ तिचे अंकावरी लोळण । घाली स्वयें ॥ ६९ ॥ कोठें निजलाभतुष्ट । कोठें

व्रजनारी व्यभिचार दुष्ट ॥ अगसंगें त्यांचे कष्ट । दूर केले ॥ १७० ॥ कोठें पर परमानंद चिद्विलासी । कोठें निंद्य कुब्जा दासी ॥ रतला तियेसी याह्नि कैसी । दयालुता असावी ॥ ७१ ॥ रावणादि राक्षस मारिले । आणिक मोठे पराक्रम केले ॥ पराक्रम तुच्छचि गमले । अनतबळाचे ॥ ७२ ॥ गजेंद्रें मारिलें मच्छकाचें पिलूं । भुजगेंद्रें मंडूक बाळू ॥ मृगेंद्रें मारिली अजा दुर्बळू । यांत पराक्रम कोणता ॥ ७३ ॥ तैसे काळाचे महाकाळें । अनंत बाहू अनत बळें ॥ नाना पराक्रम केले । परंतु पराक्रम कोण म्हणे ॥ ७४ ॥ पराक्रमाचा प्रसग पाहें । तुतें आतांच पडला आहे ॥ काळभीत शरणागताची बाहे । धरीं आतां ॥ ७५ ॥ माझा दुःखरिपू मारिसी । माझें संरक्षण करिसी ॥ तरीच पराक्रमी होसी । भुवनत्रयीं ॥ ७६ ॥ माझें दुर्दैव दारुण । आतांचि करूनि गतप्राण ॥ व्हावें तैसें देसी दान । तरि अघटित करणी म्हणावी ॥ ७७ ॥ दैव माझें खोटें । जें लोटितां न लोटे ॥ जाळूनि आतांचि येऊनि भेटें । अभयदान देसी जरी ॥ ७८ ॥ तरी म्हणों अघटित करणी । माझें दुर्दैव जाळोनि ॥ अभय देऊनि ठेविसी चरणीं । अन्यथा कर्तुं समर्थ ॥ ७९ ॥ ऐसा दुर्भाग्य ऐशा समयीं । जैसें मागतों तैसें देई ॥ सर्वज्ञाचे पडतों पायीं । म्हणोनि देवा ॥ १८० ॥ लहान तोंडीं मोठा ग्रास । व्याघ्रया तुझी धरिली कास ॥ आतां करावा प्रकाश ।

अघटित करणीचा ॥ ८१ ॥ मच्छकें सागर शोषावा । मूषकें पर्वत कोसळावा ॥ ऐसाच माझा जावा । प्रसंग देवा ॥ ८२ ॥ जैसा खद्योत प्रकाशे तरणी । लोपला असतां अघटित करणी ॥ ऐसीं वेळा चक्रपाणी । प्राप्त झाली तुज आतां ॥ ८३ ॥ कोठे माझे मासाचे डोळे । कोठें परब्रह्म सांवळें ॥ पाहीन म्हणतों येच वेळे । सापराधी पातकी ॥ ८४ ॥ कोठें अपवित्र भाग्यहीन । कोठें ऐसें मागणें दर्शन ॥ घेऊनि अभयदान । घेऊं पहासी आतांचि ॥ ८५ ॥ माझें सामर्थ्य कायसें । ऐसें मागणें साजे कैसें ॥ मागतां मातें लज्जा नसे । पहा केवढें साहास ॥८६॥ मी लघू तुच्छ दीन । ऐसें आतांच मागतों दान ॥ जैसा राजपत्नीचा भोग जाण । नीच इच्छी अतिरंक ॥ ८७ ॥ तेवीं भिकारी पामर । भिक्षा मागतों पसरिला पदर ॥ आतां होऊं दे चमत्कार । अन्यथा कर्तुं समर्था ॥ ८८ ॥ हेच अघटित करणीची वेळ आहे । त्वरा करीं पहासी काये ॥ दत्तात्रेया वंदितों पाये । सर्वज्ञ समर्था ॥ ८९ ॥ काळांतराची आपेक्षा । न करीं आतां रमादक्षा ॥ धांव शरणागताच्या पक्षा । दत्तात्रेया आतांचि ॥ ९० ॥ आपलाल्या काळीं । वृक्ष फळती भूमंडळीं ॥ नाना औषधी नाना वल्ली । काळें होती नासती ॥ ९१ ॥ काळेंचि नारी ऋतुमती । काळेंच प्रसूत होती ॥ काळें व्यथा नासती । नाना रोग ॥ ९२ ॥ काळें होय वृष्टि । काळें चाले सर्व सृष्टी ॥ म्हणोनि काळांतराच्या

गोष्टी । बोलूं नको समर्था ॥ ९३ ॥ काळांतरींचें होणें । त्यास कोण म्हणे अघटित करणें ॥ म्हणूनि आतांच येऊनि देणें । व्हावें तैसें अभय मज ॥ ९४ ॥ सर्व ब्रीदांचें प्रयोजन । आतांच पडलें नारायण ॥ सकळ ब्रीदांचें स्मरण । करीं आतां सर्वज्ञा ॥९५॥ ऐसा मी आहें अधम । जेथें सर्व ब्रीदांचें पडलें काम ॥ धांव आतां विराम । काय करिसी समर्था ॥ ९६ ॥ हे वसात्रयाची वेळ नाहीं । धांव आतां पडतों पायीं ॥ हातीं आपलें चक्र घेई । सद्गुरुराया ॥ ९७ ॥ पूर्वी पराक्रमाची ख्याति झाली । अघटीत करणी केली ॥ खरीसी वेळा आतांच आली । अघटित करणीची ॥ ९८ ॥ जरी आतांच न देसी दर्शन । व्हावें तैसें अभयदान ॥ तरी तुझें व्यर्थ जाण । अघटित करणी पराक्रम ॥ ९९ ॥ न करी शरणागताचें रक्षण । व्यर्थ ऐसें ब्रीद भूषण ॥ व्यर्थ ऐसे सामर्थ्य गुण । कामा न येती दासाच्या ॥ १००० ॥ जैसें लुब्धकाचें धन । कां नपूंसकाचें यौवन ॥ जेवीं अजागल स्तन । लोंबती व्यर्थ ॥ १ ॥ तेंच सामर्थ्य तेच गुण । करावें शरणागताचें रक्षण ॥ तेच विद्या तेंचि धन । शरणागतातें दिजे ॥ २ ॥ म्हणोनि आतांच नारायण । येऊनि देई दर्शन ॥ अभय देऊनि मनोरथ पूर्ण । करीं माझे समर्था ॥ ३ ॥ आतांचि मातें अभय द्यावें । नातरी बीरुद सोडावें ॥ मजपुढें येऊनि बोलावें । सामर्थ्य नसे मज कांहीं ॥ ४ ॥ स्वामी माझा झगडा । याचा करावा निवाडा ॥ अभय द्या कीं ब्रीद सोडा ।

सर्व कांहीं आपलें ॥ ५ ॥ तूं ब्रह्मांडाचा ईश । तूंच अससी न्यायाधीश ॥ न्याय करी तूं हृषीकेश । नीतिनिपुणा आतांचि ॥ ६ ॥ आजपर्यंत ब्रीदें वागविलीं । मिथ्या बढायी भोगिली ॥ याची ऊणखूण केली । पाहिजे आतां ॥ ७ ॥ निज बिरुदानें केशवा । भुलवूनि मज घातला गोवा ॥ याचाही जाब करवा । लागेल तुतें ॥ ८ ॥ तूं समर्थ त्रैलोक्यपति । सर्व तुतें अनुसरती ॥ तुझेसारिखे खुशामती । बोलती ते नायके मी ॥ ९ ॥ सनकादिक योगेश्वर । शुक नारदादि मुनीश्वर ॥ देवा यांच्या समोर । न्याय माझा करावा ॥ १०१० ॥ हे सत्यशील समदर्शी । तूं यांच्या आधीन अससी ॥ यांचे देखत तुझी मोडसी । जिरवीन मी ॥ ११ ॥ धरणें घेतलें तुझे दारीं । आतांच माझा न्याय करीं ॥ कैसा ओढोनि टाकिसी दुरी । दत्तात्रेया अभिज्ञा ॥ १२ ॥ आधिं माझा तंटा तोडावा । मग दुसरा उद्योग करावा ॥ विलंब आतां दत्तदेवा । लावूं नये सर्वथा ॥ १३ ॥ मनुष्या सारीखा कांहीं । तुझे दरबारीं अंधेर नाहीं ॥ म्हणोनि आतांचि तोडीं पाहीं । झगडा माझा सर्वज्ञा ॥ १४ ॥ देवा छळणें फार झालें । सर्व तूतें निवेदन केलें ॥ इतक्यावरी जरि मज काढून दिल्हें । तरि तुझा दुर्लौकिक ॥ १५ ॥ अपराध करोनि शरण आला । म्हणोनि देवें काढोनि दिला ॥ दत्तदेवा तुझे ब्रिदाला । लागेल काळें ॥ १६ ॥ लोकपाळांचे वकील । तुझे दरबारीं सर्वकाळ ॥ झाला वृत्तांत

सकल । नित्य लिहिती लोकीं ॥ १७ ॥ तुझे दरबारीं जें होतें । तें त्रैलोक्यांत कळतें ॥ काढूनि देसी जरी मातें । हेंही प्रसिद्ध होईल ॥ १८ ॥ शरणागताचा त्याग केला । देव काय वेडा झाला ॥ दयाभाव कोठें गेला । गूण पौरुष देवाचे ॥ १९ ॥ देवें अनुचित केलें । जे शरणागतातें त्यागिलें ॥ ब्रह्मांडपतीचें कोठें गेलें । ज्ञानबळ ॥ १०२० ॥ शरणागताचा अंगिकार करिता । व्हावें तेसें अभय देता ॥ काय समर्थाचा उणा होता । भांडार लौकिक ॥ २१ ॥ शरणागताची उपेक्षा केली । एथें देवाची बुद्धि गेली ॥ ऐसी अवाच्यवादांची पुष्पांजली । वाहतील तुज ॥ २२ ॥ हजार अपराध आचरलों । परी तुझे पायां येऊनि पडलों ॥ एवढा दुराग्रह दयाळो । कासया धरिसी सर्वज्ञा ॥ २३ ॥ तूं सर्वज्ञांचा राजा । आतां समाचार घेईं माझा ॥ मी कैसा तरी आहें तुझा । समर्था दयाळा ॥ २४ ॥ माझी विशाद कायसी । मजवरी शस्त्र कां धरिसी ॥ एवढा कोप कां करिसी । शरणागतवत्सल तूं ॥ २५ ॥ मी तुझे पायींची वहाण । तुझे हातीं माझें जीवन ॥ मी तुझेच आधीन । रुजू आहे ॥ २६ ॥ जय श्री मुनीमानसविलासी । तुज शरण आलों समर्थासी ॥ माझी दुर्दशा देशीं विदेशीं । सर्वज्ञ दयाळा न करावी ॥ २७ ॥ तुतें निवेदिलें जें जें । त्याचें स्मरण कीजे ॥ आतां येऊनि अभय दिजे । सद्गुरुस्वामी ॥ २८ ॥ करिसील रात्रीचा दिवस । महारवाड्या कैलास ॥ कावळ्याचा राजहंस ।

अर्ध निमिषें करशील तूं ॥ २९ ॥ गर्धभीची कामधेनू । खद्योताचाच करिसी भानू ॥ जंबुकाचाच पंचानन् । अर्ध निमिषें करिशील तूं ॥ १०३० ॥ एरंडाचा कल्पतरु करिसी । अस्वलीची उर्वसी ॥ जन्मांधातें दाखविसी । दिव्य नेत्रें निधान ॥ ३१ ॥ ऐसी तुझी अघटित करणी । प्रगट सत्ता त्रिभुवनीं ॥ नमन करितों तुझे चरणीं । धांव आतां सर्वज्ञा ॥ ३२ ॥ नाहीं राहिला अवकाश । नको पाहूं गुणदोष ॥ सर्वज्ञ समर्था माझी आस । आतांचि येऊनि पुरवीं तूं ॥ ३३ ॥ प्राण जाई तंववरी अंत । काय पहासी दयावंत ॥ पाव आतां वाटे खंत । फार तुझी सद्गुरु ॥ ३४ ॥ बाळकातें कोणी गांजिलें । तरी माउलीपासीं रडत गेलें ॥ मातेनें जरि त्यागिलें । बापासि सांगे ॥ ३५ ॥ उभयतांनीं घेतला त्रास । तरी रक्षी धराधीश ॥ तोही करूं पाहे नाश । मग देवास बाहे ॥ ३६ ॥ देवानेंही उपेक्षितां । मग कोठें जावें अनंता ॥ तुजवीण दुसरा त्राता । कोण आहे दीनाचा ॥ ३७ ॥ तैसा तैसा मी सर्वत्र भागलों । तुझेच पायीं येऊनि पडलों ॥ आतां कैसा दयाळो । त्यागिसी देवा ॥ ३८ ॥ आतां कोठें जाऊं फिर्याद । कोठें लागेल माझी दाद ॥ द्रवावें आतां ब्रह्मानंद । सद्गुरुस्वामी ॥ ३९ ॥ तू म्हणसील काय झालें । तरी तुज सर्वही समजलें ॥ आतां माझें समाधान केलें । पाहिजे देवा ॥ १०४० ॥ मज रोग झाला दारुण । हा तूंच जाणसी नारायण ॥ याचें आहे जें निदान । भवरोगवैद्या जाणसी

तूं ॥ ४१ ॥ नाना मात्रा रसायण । तुजपासींच असतां पूर्ण ॥ धन्वंतरीचा गुरू जाण । तूंचि असती ॥ ४२ ॥ माझे रोगाचें औषध । तुजपासींच आहे सिद्ध ॥ तूंच जाणसी ब्रह्मानंद । ठावें नाहीं इतरातें ॥ ४३ ॥ चांगला दिसतो वरीवरी । कुजोनि चाळणी झाली अतरीं ॥ अखंड चाले सुरी कातरी । जाणसी तूं सर्वज्ञा ॥ ४४ ॥ याचा उपाय तुजपासीं । तूंच एक जाणतोसी ॥ सर्वथा न कळे दुसऱ्यासी । सर्वज्ञ देवा ॥ ४५ ॥ माझें समाधान कांहीं । दुसरे वस्तू होणार नाहीं ॥ तूंचि समाधान करिसी पाहीं । परब्रह्म सद्गुरो ॥ ४६ ॥ दत्तात्रेया तुझी आण । तूंच समाधान करिसी जाण ॥ जाणूनि माझी अंतरखूण । शांत करिसी तूंच मज ॥ ४७ ॥ माझा उपाय कांहींच नाहीं । मी तों पडतों तुझे पायीं ॥ दत्तात्रेया माझे आई । धांव आतां सर्वज्ञा ॥ ४८ ॥ समर्थ असतां उपेक्षा करिसी । सर्वज्ञ असतां नायकसी ॥ समदर्शी असतां गुणदोष पहासी । हें उचित नाहीं दयाळा ॥ ४९ ॥ आतां कांहींच अवधी नाहीं । धांव आतां पडतों पायीं ॥ आतांच मातें पदरीं घेईं । दत्तात्रेया सद्गुरो ॥ १०५० ॥ तुझे मनास आलें । तेथें कोणाचें काय चाले ॥ सर्व कांहीं तुझें केलें । होय देवा ॥ ५१ ॥ जंव जंव मातें दुःख होतें । तंव तंव तुझें अंतर कळतें ॥ मातेचें चित्त द्रवतें । बाळ कष्टी पाहोनि ॥ ५२ ॥ जे गर्भश्रीमंत असती । ते दुसऱ्याचें दुःख नेणती ॥ मूढपणें

मदांध होती । क्षुद्र जन ॥ ५३ ॥ लक्ष्मीचे अंशलेशें । मूर्ख जनातें लागतें पिसें ॥ दुसरा दुःखी होतसे । हें न कळे तया ॥ ५४ ॥ तूं अनादिच श्रीमंत असती । साक्षात् लक्ष्मी तुझी दासी ॥ तथापि देवा जाणसी । दुःख शरणागताचें ॥ ५५ ॥ प्राण्याचें दुःख जाणसी । परदुःखें दुःखी होसी ॥ समर्था तूं दूर करिसी । कृपाळूपणें ॥ ५६ ॥ अनंत ब्रह्मांडांचें प्रभुत्व । अनंत लक्ष्मीचें स्वामित्व ॥ असतां एवढें दयाळुत्व । ऐसा तूंच असती सद्गुरो ॥ ५७ ॥ देवा शरणागतासाठीं । धांव घालिसी उठाउठी ॥ नसतां भक्ताचे अदृष्टीं । सौख्य देसी समर्था ॥ ५८ ॥ ऐसें जाणोनि शरण आलों । तुझे पायीं येऊनि पडलों ॥ आतां माझी गती दयाळो । काय करिसी सर्वज्ञा ॥ ५९ ॥ माझा आधार तूंच असती । अझूनि तरी काय काय म्हणसी ॥ आतां कोठें कोठें हांकोन देसी । दयासिंधो सर्वज्ञा ॥ १०६० ॥ आतां अवकाश राहिला नाहीं । धांव देवा पडतों पायीं ॥ तुझे पोटांत घातली डोई । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ६१ ॥ तुझे पाया शरण आलों । तुझे भंरवशावरी बसलों ॥ सद्गुरुराया वायांच गेलों । ऐसें न करावें ॥ ६२ ॥ समर्था तुतेंच आहे शरण । सत्य देवा तुझी आण ॥ माझे मनोरथ पूर्ण । करीं आतां समर्था ॥ ६३ ॥ तूं समर्थाहूनि समर्थ । मी तुझाच आहें यथार्थ ॥ वंध्या माझे मनोरथ । न करीं देवा ॥ ६४ ॥ चित्तीं धरिली जे कामना ।

ती आतांच पुरवीं नारायणा ॥ अंतरिच्या जाणूनि खुणा । सर्व देवा ॥ ६५ ॥ मी कांहीं साधन करावें । शून्य जाणायाचें नांवें ॥ तुम्हींच मजला पोटीं धरावें । नमन करितों म्हणोनी ॥ ६६ ॥ मी साधना योग्य आहे किंवा नाहीं । हा शोध घेतलाच आहे पाहीं ॥ आतां सांगूं कायी । सर्वज्ञासी ॥ ६७ ॥ मज कांहीं पुरवेना । धैर्य नाहीं नारायणा ॥ वाट पाहें जगज्जीवना । केव्हां येसी म्हणोनि ॥ ६८ ॥ मज कोठें नेसी । कोठें काय करविसी ॥ हें तूंच जाणसी । सर्वज्ञ देवा ॥ ६९ ॥ मी तों तुझेंच आधीन । तुझेच वंदितों चरण ॥ हेंच माझें साधन । आणीक न कळोनि घडेना ॥ १०७० ॥ भरंवसा मोठा धरिला । सर्व समर्थ सद्‌गुरु वरिला ॥ आतांच माझा मनोरथ पुरविला । पाहिजेच देवा ॥ ७१ ॥ आतां कासया श्रमविसी । कोठें कोठें हिंडविसी ॥ दयाळो दुर्दशा काय करिसी । सर्व समर्थ असतांही ॥ ७२ ॥ मज कष्टी केलें । तेणें तुज सामर्थ्य अधिक आलें ॥ अधिक अंतर संतुष्ट जाहलें । ऐसें नव्हे ॥ ७३ ॥ तूं सामर्थ्यवंत अससी । स्वयंतृप्त प्रतापराशी ॥ टाळाटाळी काय करिसी । दयाळू असतांही ॥ ७४ ॥ कोणता किंतू आला । एवढा विलंब कां लाविला ॥ विलंबास हेतू दयाळा । कांहींच नाहीं ॥ ७५ ॥ देवा कलियुग आलें । म्हणोनि बहुतेकांचें सत्त्व गेलें ॥ तुझें सत्त्व कैसें नेलें ।

कलियुगें देवा ॥ ७६ ॥ पृथ्वी मंदफला झाली । मेघाची शक्ती गेली ॥ लोकांची बुद्धि नाशली । अधर्म वसे ॥ ७७ ॥ ब्राह्मणांचे धर्म बुडाले । स्त्रियांचें पातिव्रत्य गेलें ॥ वृक्षौषधींनी सोडिलें । सत्त्व आपुलें ॥ ७८ ॥ तैसें काय तुज झालें । तुतें कैसें कलियुग भोंवलें ॥ तुझें सत्त्व कैसें गेलें । सदैक रूपाचें ॥ ७९ ॥ तूं अचल शक्ती आहेसी । सदां शरणागत रक्षिसी ॥ माझाच कैसा त्याग करिसी । शरणागतवत्सल तूं ॥ १०८० ॥ तुजवीण माझा कोणी । रक्षक नाहीं चक्रपाणी ॥ आतांच येईं धांवोनी । नमन करितों सर्वज्ञा ॥ ८१ ॥ मी तुझाच अंकित आहें । ऐसें सर्वत्र प्रसिद्ध झालें पाहें ॥ माझी लज्जा सद्गुरुमाये । रक्षीं आतां सर्वज्ञा ॥ ८२ ॥ माझे आंगीं खोटायी । नको लावूं पडतों पायीं ॥ मी तुझाच शिष्य आहें पाहीं । दत्तात्रेया सद्गुरू ॥ ८३ ॥ आणिक जे कांहीं केलें । तें तुझेंच संबंधीं झालें ॥ लज्जा धरोनि शेवटा नेलें । पाहिजे सर्वज्ञा ॥ ८४ ॥ तुझा लौकिक ऐकोनि कानीं । शरण आलों चक्रपाणी ॥ त्रासूं नको तूं अभयदानी । प्रसिद्ध असती दयाळा ॥ ८५ ॥ लोकीं दाते असती । याचकांतें दान देती ॥ उडी पडतां त्रास घेती । याचकांचा अंतरीं ॥ ८६ ॥ यांतें दाते न म्हणावे । हे दांभिक स्वभावें ॥ जेथें समत्वाचे नांवें । शून्याकार ॥ ८७ ॥ मुख पाहूनि देती । येरा गाळीप्रदान करिती ॥ राग येतां पिटोनि

लाविती । दीन जाणोनि ॥ ८८ ॥ हें दान नव्हे । हें छळण होये ॥ यानें बाधूं नये । दानब्रिद ॥ ८९ ॥ रघु हरिश्चंद्रादि नृपती । हेही दानशूर असती ॥ शरणागतातें रक्षिती । सर्व प्रकारें ॥ १०९० ॥ हे मानवी राजे असती । हेही शरणागताचा अभिमान धरिती ॥ ज्याची त्रैलोक्यांत ख्याती । प्रसिद्ध आहे ॥ ९१ ॥ तूं ब्रह्मांडाधीश अससी । मी अभयद ऐसें बोलसी ॥ मागें पुढें काय पहासी । सर्वज्ञ समर्थ असतांही ॥ ९२ ॥ शरणद ऐसें म्हणावें । ब्रिरुदही बाळगावें ॥ शरणागतातें छळावें । विलंब लावोनी ॥ ९३ ॥ हें काय दयाळूपण । शरणागताचा घेसी प्राण ॥ ऐसें असतां ब्रीद भूषण । वागवावें कां व्यर्थ ॥ ९४ ॥ देवा ओघास येतें । म्हणोनि बोलावें लागतें ॥ रागास येसी तरी मातें । कोण रक्षी तुजवीण ॥ ९५ ॥ एवढी अवकृपा केली । समदर्शी असतां उदासी धरिली ॥ माझी दुर्दशा कां आरंभिली । सर्वज्ञ समर्थ दयाळो ॥ ९६ ॥ आतां दयाळा कोठें जावें । कोठें काय आचरावें ॥ कैसें रहावें वागावें । सर्वज्ञ देवा ॥ ९७ ॥ मज कोठेंही राहवेना । कोठेंच नाहीं ठिकाणा ॥ तुजवांचोनि नारायणा । समाधान नाहीं ॥ ९८ ॥ माझी जैसी अवस्था झाली । सर्व तुतें कळों आली ॥ आतांच देवा सांभाळीं । तुझा आहें सर्वज्ञा ॥ ९९ ॥ माझी योजना काय केली । काय माझी वृत्ती योजिली ॥ धांव आतां

उडी घालीं । दत्तात्रेया समर्था ॥ ११०० ॥ मी जरी आहें पामर । परी तुझाच आहें किंकर ॥ आतांच माझा समाचार । घांवोनि घेई सर्वज्ञा ॥ १ ॥ माझें धैर्य माझें पौरुष । माझी करणी माझे दोष ॥ माझी मूर्खता विशेष । सर्व जाणसी गोविंदा ॥ २ ॥ सर्व कांहीं जाणसी । ऐसें असतां सत्त्व पाहसी ॥ दयाळू असतां कष्ट देसी । शरणागतातें हें काय ॥ ३ ॥ सर्वज्ञ असतां मौन्य धरिसी । समर्थ असतां उपेक्षा करिसी ॥ पाहत असता डोळे झांकिसी । सद्गुरुराया हें काय ॥ ४ ॥ कांहीं केल्या राहवेना । कैसें करूं मी नारायणा ॥ जाणसी तूं अंतरखुणा । सर्वसाक्षी सर्वज्ञा ॥ ५ ॥ आतां माझा तूंच वाली । तूं माझी माउली ॥ निजकृपेची साउली । करीं आतां सर्वज्ञा ॥ ६ ॥ माझी दशा कैसी झाली । सर्व तुतें कळों आली ॥ यांत माझी बुद्धी गेली । पाहिजे तें म्हणावें ॥ ७ ॥ मी काय करूं आतां । मज चैन नाहीं लक्ष्मीकांता ॥ माझें दुःख नाश कर्ता । तूंच असमी सर्वज्ञा ॥ ८ ॥ तुतें सर्वथा आहे शरण । करीं माझें समाधान ॥ करितों साष्टांग नमन । तुझे चरणी दयाळा ॥ ९ ॥ कोट्यावधी कष्टी असती । लक्षावधी हाका मारिती ॥ मरती वांचती भोगिती । आपलें कर्म ॥ १११० ॥ त्यांत एक तूंही असमी । मरसी अथवा वांचसी ॥ आपलें कर्म भोगिसी । ऐसें मातें न म्हणावें ॥ ११ ॥ त्यांत मजला न लेखावें । मज आपलाच अंकित जाणावें ॥ शरण जाणोनि

रक्षावें । आतांच मज ॥ १२ ॥ सामान्य म्हणोनि उपेक्षूं नये । मूर्ख म्हणोनि छळूं नये ॥ मी तुझाच आहें तुझे पाये । सर्वभावें वंदितों ॥ १३ ॥ मातें सर्व समान असती । समदर्शी ऐसी माझी ख्याती ॥ तूंचि एक मूढमती । काय अधिक ॥ १४ ॥ ऐसें जरी म्हटलें । मज सामान्य जाणोनि लोटिलें ॥ तरी तुझेंच बोलणें तुतें घडलें । विरुद्ध देवा ॥ १५ ॥ हा वद तो व्याघात झाला । विरुद्ध आलें आपल्याच बोला ॥ याचा विचार पुरता केला । पाहिजे स्वामी ॥ १६ ॥ तुतें सर्व सारिखे । प्रल्हाद उद्धवा सारिखे सखे ॥ लघू जाणोनि मजला पारखें । कैसें करिसी ॥ १७ ॥ त्यांतें तत्काळ पोटीं धरिलें । मातें दूर लोटिलें ॥ म्हणोनि तुझेंचि बोलणें तुतें झालें । विपरीत पाहा ॥ १८ ॥ म्हणोनि ऐसें बोलें । बहुतेकांतें कष्ट झाले ॥ बहुतेक जैसे वाहवले । तैसें मातें न करावें ॥ १९ ॥ तूंच माझी गती । पायां पडतों रमापती ॥ फार येतों काकूळती । आतांच येईं सर्वज्ञा ॥ ११२० ॥ कोठें माझी लघुता । कोठें तुझी चिन्मय सत्ता ॥ पाहीन म्हणतों रमाकांता । हे मूर्खता वाटे लोकांसी ॥ २१ ॥ माझें वजन काय । पाहीन म्हणतों तुझे पाय ॥ तेही आतांच दत्तात्रेया । याच वेळे ॥ २२ ॥ जैसें श्वान अमंगळ । इच्छी पुरोडाश निर्मळ ॥ तैसा मी पापी केवळ । दर्शन इच्छी तुमचें ॥ २३ ॥ आपलें पौरुष न पाहतां । आपलें आचरण

न विचारितां ॥ पोरपणें रमाकांता । पाहीन म्हणतों आतांचि ॥ २४ ॥ माझा अधिकार काये । मनोरथांचा पार नव्हे ॥ घटामाजी साठवूं पाहे । समुद्र जेवीं ॥ २५ ॥ श्वानपुच्छाचा आश्रय केला । जेवीं सागर तरूनि गेला ॥ तैसे माझे दयाळा । साधन मनोरथ जाणावे ॥ २६ ॥ नेम नाहीं धर्म नाहीं । तप नाहीं आचार नाहीं ॥ भक्ति भाव भजन नाहीं । मनोरथ एवढा धरिला म्यां ॥ २७ ॥ मी आपली शक्ती । पाहिली नसतां विरक्ती ॥ एवढा मनोरथ रमापती । धरिला आहे ॥ २८ ॥ तोही आतांच येच वेळा । विलंब न लागतांचि दयाळा ॥ माझ्या हौसी सकळा । पुरविल्या पाहिजे ॥ २९ ॥ खडक भुयींसी संबंध । बीज पेरुनि कीडस्वाद ॥ जळेवीण पीक सिद्ध । साध्य व्हावें भोजन ॥ ११३० ॥ माझेसारिखा अनर्थी । इत्थंभूत मनोरथी ॥ आजपर्यंत कोणी अर्थी । नाहीं आला तुजपासी ॥ ३१ ॥ तुझा लौकिक ऐकिला । म्हणोनि तुतें शरण आला ॥ तूंही मनोरथ पुरवायाला । समर्थ अससी तैसाची ॥ ३२ ॥ तुझे ऐसे देण्यासी । माझे ऐसे मागण्यासी ॥ प्रसंग पडला हृषीकेशी । आतांच तुज ॥ ३३ ॥ आतां सार्थक व्हावें । माझे पूर्ण मनोरथ पुरवावे ॥ आणी तुतेंही कळों यावें । सामर्थ्य आपल्या देण्याचें ॥ ३४ ॥ उक्त प्रकारें दुर्घट पाहे । परी तुझें सामर्थ्य तैसेंच आहे ॥ ऐसेंचि जाणोनि तुतें पाहे ।

शरण आलों तुच्छ मी ॥ ३५ ॥ जरी ऐसा मी दुर्मती । तुतें शरण आलों श्रीपती ॥ माझे मनोरथ अस्तांचे न पुरती । तरी गेलें ब्रीद साच तुझें ॥ ३६ ॥ सांग आतां नारायणा । काय केली योजना ॥ प्रसंग पडले तुतें नाना । परि ऐसा पडलाच नाहीं ॥ ३७ ॥ प्रसंग पडला याची सिद्धी । केलीच पाहिजे कृपानिधी ॥ आतां कांहींच अवधी । राहिली नाहीं सर्वज्ञा ॥ ३८ ॥ अजूनि तरी करसी कांहीं । धांव आतां पडतों पायीं ॥ सर्वज्ञा देवा सद्गुरु आई । आतांच येई ॥ ३९ ॥ फार झाली जाचणूक । काय पहासी कवतुक ॥ जाणत असतां माझें दुःख । विलंब कैसा लाविसी ॥ ११४० ॥ तूं म्हणसी तुज काय झालें । तरी तुतें सर्वही समजलें ॥ मी-ही तुतें निवेदन केलें । सर्वज्ञ देवा ॥ ४१ ॥ याहीवरि म्हणशील मातें । कीं वेडच लागलें तुतें ॥ विशेष केलें सर्वांपरतें । तुतेंच मी ॥ ४२ ॥ उत्तम नरदेह जाण । याहीवरी ब्राह्मण ॥ ब्रह्मविद्या पूर्ण । दिधली तुज ॥ ४३ ॥ यथायोग्य अन्न वसन । प्राधान्य प्रतिष्ठा मान ॥ करोनि ठेविला आपला प्राण । याहूनि काय असावें ॥ ४४ ॥ जें सुरनरां दुर्लभ असे । तें सर्व तुजपाशीं विलसे ॥ आतां तुतें लागलें पिसें । किन्निमित्त ॥ ४५ ॥ असावा शमदमादि अंगिकार । मुक्त असावें निरंतर ॥ करावा जगदुद्धार । निःसंगपणें ॥ ४६ ॥ प्रौढ वैराग्य असावें । निरभिमान

वर्तावें ॥ मानापमानीं रहावें । तुल्य मन ॥ ४७ ॥ निंदा स्तुती समान । न पहावे मानापमान ॥ लाभालाभ तुल्य जाण । असावे तुज ॥ ४८ ॥ जनीं अथवा वनीं । अयाचित अथवा भिक्षा मागोनी ॥ कोरडें ओलें खावोनी । शांत असावें ॥ ४९ ॥ सुखदुःखप्राप्ती । संपत्ती अथवा विपत्ती ॥ असतां समान अंतरस्थिती । दृढ असावी ॥ ११५० ॥ देशीं विदेशीं रहावें । भोगें प्रारब्ध सारावें ॥ सद्गुरूतें भजावें । नित्य नेमें ॥ ५१ ॥ मिथ्या दृश्याची प्रतीति । दृढ असावी आत्मस्थिती ॥ तुतें कैंची गती अगती । अलिप्तातें ॥ ५२ ॥ ऐसी जीवन्मुक्ती वरिष्ठ । तुतें दिधली मीच स्पष्ट ॥ अजून म्हणसी भोगितों कष्ट । हें नवल वाटे ॥ ५३ ॥ तूं आपलें स्वरूप भोगावें । आनंदरूप असावें ॥ किंवा पोरपण करावें । पिशासारिखें ॥ ५४ ॥ माझी भक्ती पूर्ण आहे । स्वरूपही भोगिसी पाहें ॥ तुतें काय उणें आहे । सांग बापा ॥ ५५ ॥ तूं निशंक निर्भय विज्ञानघन । कृतकृत्य कर्तव्यहीन ॥ प्रत्यक्ष ऐसें असतां जाण । दुःख तुजला कायसें ॥ ५६ ॥ मी तुझे अंतर्बाह्य असें । प्रत्यक्ष तुतें दृष्टी दिसे ॥ तुझा माझा वियोग नसे । काळत्रयीं ॥ ५७ ॥ तूं सदा निःसंदेहो । तुतें नाहीं देह विदेहो ॥ आतांच पडों अथवा राहों । कलेवर मिथ्या ॥ ५८ ॥ तूं परमानंदघन । अनादि परिपूर्ण ॥ मजहूनि वेगळेपण । असेचि ना ॥ ५९ ॥ मीच तूं अससी जाणसी ।

कासया वनोवनीं हिंडसी ॥ कष्टी होसी विदेशीं । किन्निमित्त ॥ ११६० ॥ तूं आनंदपूर निवासी । व्यर्थ हाका मारिसी ॥ तुझेच सारिखा विलासी । कोणीच नाहीं ॥ ६१ ॥ आतां सुखी रहावें । निजस्वरूप भोगावें ॥ दीन जन उद्धरावे । कृपाळूपणें ॥ ६२ ॥ तूं सुखरूपचि असर्सी । मातें तरी काय म्हणसी ॥ व्यर्थ कां बा श्रमी होसी । सांग मज ॥ ६३ ॥ बारे तुतें कांहीं । सर्वथा उणें नाहीं ॥ आतां खुशाल राहीं । जेथें तेथें ॥ ६४ ॥ मी जें जें बोलिलों हें । तें तें सर्व तसेंच आहे ॥ यांत कांहीं अन्यथा नोहे । सर्व सत्य ॥ ६५ ॥ याचक पडतां दृष्टी । न द्यावयाच्या शंभर गोष्टी ॥ नाना चातुर्य शब्दवृष्टी । करिती अदाते ॥ ६६ ॥ मी तों आलों भिक्षार्थी शरण । न देतां मातें अभयदान ॥ कैसें करिसी समाधान । शुष्क गोष्टी सांगोनी ॥ ६७ ॥ कोठें माझें लघु मोल । कोठें तुझे दिव्य बोल ॥ तुझा भाव सखोल । तूंच जाणसी ॥ ६८ ॥ तूं बोलिला तैसा । प्रकार असता जगदीशा ॥ तरी ऐसी माझी दशा । कासया होती ॥ ६९ ॥ आपण जें जें बोलिलां । हा मजवर अनुग्रह केला ॥ आपल्याहून मज वेगळा । लेखिला नाहीं ॥ ११७० ॥ आत्मदृष्टी आपली । सर्वत्र समान समरसली ॥ म्हणोनि वचनोक्ति आपली । विरुद्ध नाहीं ॥ ७१ ॥ आपली दृष्टी तशीच आहे । परी माझी अवस्था शोधूनि पाहे ॥ प्राण माझा जाऊं पाहे ।

जाणसी तूं ॥ ७२ ॥ जरी म्हणसी दयाळा । इतके दिवस केसा राहिला ॥ हेंही सर्व सद्गुरूला । ठाउकच आहे ॥ ७३ ॥ प्राणी गर्भी राहती । नरकांतही निवास करिती ॥ त्यांचेही दिवस जाती । निघोनियां ॥ ७४ ॥ दुःखी कष्टी प्राण राहिले । यांत कोण सार्थक झालें ॥ तुझीं वंदितां पाउलें । ऐसें नसावें ॥ ७५ ॥ जरी ऐसें बोलसी । कीं आपलें प्रारब्ध भोगिसी ॥ मज काय म्हणसी । वारंवार ॥ ७६ ॥ देवा माझा प्रारब्ध-भोग । सुख दुःख नाना रोग ॥ भोगीन परंतु तुझा वियोग । साहणार नाहीं ॥ ७७ ॥ मज द्रव्य दारा नलगे । संपत् सिद्धी न मागे ॥ राहीन म्हणतों तुझ्या संगें । सर्वज्ञ देवा ॥ ७८ ॥ माझें सुख संपत् सर्व कांहीं । देवा तूंच असशी पाहीं ॥ तुझ्या व्यतिरिक्त दुसरें कांहीं । सर्वथा नलगे मज रामा ॥ ७९ ॥ तुतें सर्वथा रुजू आहें । तुझे पायीं पडलों पाहें ॥ सर्व जाणसी सद्गुरूमाये । सर्वज्ञ देवा ॥ ११८० ॥ माझे माय बाप धन धाम । सुख संपत् सर्व काम ॥ सर्व कांहीं विश्राम । तूंच माझा सद्गुरो ॥ ८१ ॥ तुज वेगळें काय मागूं । व्यर्थ कासया भागूं ॥ सर्वज्ञासी कैसें सांगूं । वारंवार ॥ ८२ ॥ परंतु मातें चैन नाहीं । याचा उपाय करीं पाहीं ॥ सर्वज्ञ देवा पडतों पायीं । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ८३ ॥ यद्यपी तुम्हीं सर्व कांहीं । मज उणें केलें नाहीं ॥ तथापी मातें चैन नाहीं । कैसें करूं मी समर्था ॥ ८४ ॥ ऐसें असतां तुझे पायीं । वारंवार ठेवितों

डोई ॥ दत्तात्रेया आतांच येई । तुझा आहें सर्वथा ॥ ८५ ॥ दत्तात्रेया आतांच येणें । मज व्हावें तैसें समाधान करणें ॥ हेंच माझें मागणें । हाच माझा हेतू असे ॥ ८६ ॥ हेतू गुंतला तुझे चरणीं । कष्टी न करीं चक्रपाणी ॥ आतांच येई धांवोनि । सद्गुरुस्वामी सर्वज्ञा ॥ ८७ ॥ प्रस्तुत वेळा ऐसीच आली । सद्गुरुराया धांव घालीं ॥ सर्व तुतें कळों आली । अवस्था माझी दयाळा ॥ ८८ ॥ सर्वथा माझें समाधान नाहीं । उपाय मातें न सुचे कांहीं ॥ प्राणांतवेळा आली पाहीं । काय करूं मी सर्वज्ञा ॥ ८९ ॥ मज सर्वथा राहवेना । फार झाल्या यातना ॥ सर्व जाणसी अंतरखुणा । दृष्टेपणें तूं ॥ ११९० ॥ मी उगीच धांवा करितों । किंवा खराच कासावीस होतों ॥ तुझ्याच प्रत्ययास येतो । भाव माझा ॥ ९१ ॥ तुशीं करील जो प्रतरणा । त्यास कोठेंच नाहीं ठिकाणा ॥ जो सर्व जाणे अंतरखुणा । त्यास चोरिलें काय असे ॥ ९२ ॥ पतीनें पाहिली सर्व काया । त्यास काय चोराल जाया ॥ माझें हृदय सद्गुरूराया । सर्व तुतें ठाउकें ॥ ९३ ॥ चहूंकडे अग्नी लागला । दास तुझा घाबिरा झाला ॥ धांव आतां दयाळा । सद्गुरूराजा ॥ ९४ ॥ तुझे भक्त जीवन्मुक्त । मीच कैसा जीवन्मृत ॥ आतां माझी दया त्वरित । येऊं देई दयाळा ॥ ९५ ॥ कोणते प्रकारें आळवूं । कैसा तरी शरण येऊं ॥ भिकारी मी काय देऊं । नित्यतृप्तासी ॥ ९६ ॥ हा प्रसंग ऐसाच आला । प्राण कंठीं उरला ॥ कांहीं

सुचेनासा झाला । प्रकार देवा ॥ ९७ ॥ जीत मेल्या गर्ता नाहीं । तुतें कळलें सर्व कांहीं ॥ चिंतानदीच्या प्रवाहीं । वाहवलों मी ॥ ९८ ॥ तुतें मारितों हाका । धांव धांव लक्ष्मीनायका ॥ आतां माझा त्राता सखा । तूंच अससी ॥ ९९ ॥ जरी माझे प्राण गेले । तरी तुझें ब्रीद बुडालें ॥ शरणागतातें उपेक्षिलें । हें निंद्य कर्म ॥ १२०० ॥ प्राण दिल्यानें जात नाहीं । हा सिद्धांत पाहीं ॥ येथें उपाय कांहीं । नाहीं कोणाचा ॥ १ ॥ कोणी प्राण द्यावा । दिला असतां मग जावा ॥ ऐसी सत्ता केशवा । नाहीं जनाची ॥ २ ॥ जेव्हां आयुष्यास येईल अंत । तेव्हांच होईल देहपात ॥ परंतु लोकीं निमित्यें । नाना असती ॥ ३ ॥ मी निग्रह करावा कांहीं । हें माझें सामर्थ्य नाहीं ॥ निमित्त धणी मात्र पाहीं । होशील तूं ॥ ४ ॥ जरी मी कांहीं केलें । तरी माझें काय चाले ॥ देवा तुझे चित्तास आलें । तेंच खरें ॥ ५ ॥ मी करावें कांहीं । देवा माझा काबू नाहीं ॥ दुःखचि भोगिलें देहीं । करितां करितां ॥ ६ ॥ आतां मी कांहीं करावें । अथवा कोठें मरावें ॥ अथवा कोठें वांचावें । हें कांहींच घडेना मजवरतू ॥ ७ ॥ भांबल्याची अवस्था झाली । न कळे कोणती दशा आली ॥ काय करूं वनमाळी । हेंही सुचेना ॥ ८ ॥ ऐसी अवस्था झाली । तुज कळों आली ॥ धांव आतां सांभाळीं । प्रणतवत्सला सर्वज्ञा ॥ ९ ॥

जें आहे तें ऐसें आहे । धांव आतां पाहसी काये ॥ समर्था तुझें वंदितों पाये । दत्तात्रेया सद्गुरू ॥ १२१० ॥ फार झाली हळहळ । देवा झालों विकळ ॥ आतांच येऊं दे कळवळ । मायबापा सद्गुरो ॥ ११ ॥ जरी तडफडीत राहिलों । भलत्या निमित्यें मेलों ॥ तरी तुझे शेवेसी अंतरलों । आतांच व्हावें तैसा मी ॥ १२ ॥ सर्व कांहीं जाणसी । अंत केसा पाहसी ॥ धांव सद्गुरो हृषीकेशी । उडी घालीं समर्था ॥ १३ ॥ माझेपुरतें अन्नास कांहीं । तुझें घरीं उणें नाहीं ॥ नाना प्रकारें दुर्दशा काई । करिसी माझी श्रीवरा ॥ १४ ॥ जगास अन्नवस्त्र देसी । माझेकरितां उदास होसी ॥ सर्वदां समदर्शी । काय झालें मजविषयीं ॥ १५ ॥ ब्रह्मांडाचा वाहसी भार । माझाच काय झाला फार ॥ दयाळू असतां दुर्विचार । काय करिसी सर्वज्ञा ॥ १६ ॥ तशांत तुतें शरण आहें । तुझी पाउलें वंदिताहें ॥ आणीक तुझी वाट पाहें । केव्हां येसी म्हणोनी ॥ १७ ॥ तुझाच आहें देवाधिदेवा । माझा त्याग न करी केशवा ॥ जाणसी माझे अंतरभावा । सर्वज्ञपणें ॥ १८ ॥ आपले उदरीं हृषीकेशी । अनंत ब्रह्मांडें साठविसी ॥ मातें कैसा काढोनि देसी । जागा नाहीं म्हणोनी ॥ १९ ॥ शरण आलों काय छळिसी । तुझा आहें कां मारिसी ॥ समर्थ आहेसी उपेक्षा करिसी । सर्वज्ञ देवा हें काय ॥ १२२० ॥ देवा आपला जाणोनी । आतांच येई

धांवोनी ॥ सांभाळ माझा चक्रपाणी । अंगें करीं तूं दयाळा ॥ २१ ॥ जैसी माझी मती । तैसी करितों विनंती ॥ विशेष बुद्धी कमळापती । कोठोनि आणूं ॥ २२ ॥ तुझा अंतरीं प्रवेश असे । म्हणोनि हेही स्फूर्ती प्रकाशे ॥ सर्व तुझेंचि सामर्थ्य असे । सत्तारूपा समर्था ॥ २३ ॥ आतां काय करूं मी दयाळा । तुतें कैसा येईल कळवळा ॥ आतां कोणती काळवेळा । पाहसी तू ॥ २४ ॥ सर्वांचा सुहृद असती । निर्दय कैसा झालासी ॥ शरणागताचें पाहसी । दुःख कैसें समर्था ॥ २५ ॥ काय हृदय फोडोनि दाखवावें । किंवा मस्तक तोडूनि वहावें ॥ कितीक तरी रडावें । तुझेपुढें ॥ २६ ॥ तुझें दयाळूपण काय जळालें । समर्थपण काय बुडालें ॥ सर्वज्ञपण काय सामावलें । पाताळांत ॥ २७ ॥ लज्जा कैसी सोडिली । शरणागताची छळणा मांडिली ॥ कोणे तुझी हिरोनि नेली । समशीलता ॥ २८ ॥ काय तुझ्या मनांत आहे । कळों दे तेंही पडतों पाये ॥ घोळ घोळोनि मारिसी काये । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ २९ ॥ जरी तुज घेणें प्राण । तरी एकदांच चक्र हाण ॥ आपले जीवींची तहान । शांत करीं ॥ १२३० ॥ मज छळछळोनि मारिलें । रानोरान रडविलें ॥ यांत तुझे हातां आलें । काय तत्त्व ॥ ३१ ॥ एवढा निष्ठुर नको होऊं । नको छळूनि प्राण घेऊं ॥ माझी करणी नको पाहूं । शरण आलों म्हणोनी ॥ ३२ ॥

माझा प्राण तुझाच आहे । त्यातें छळूनि घेसी काये ॥ घेणे असल्याच पाहें । एकदांचि घेईं ॥ ३३ ॥ देवा छळणेची सीमा झाली । आतां दयाळा धांव घालीं ॥ अवधि नाहीं राहिली । सद्गुरुराया ॥ ३४ ॥ प्राण जावा तंववरी अंत । काय पाहसी दयावंत ॥ कोणें ऐसें संमत । दिधलें तुज ॥ ३५ ॥ माझें कांहीं बरें वाईट । कोणी सांगितलें असेल स्पष्ट ॥ आयकोनि माझा वीट । येऊं न देईं ॥ ३६ ॥ कोणी माझा हितकारी । लोकीं नाहीं नरकेसरी ॥ म्हणोनि बरें वाईट चित्तावरी । नको घेऊं सर्वज्ञा ॥ ३७ ॥ मी तों मुळींच वाईट आहें । सर्व तुजला ठाउक आहे ॥ आतां माझे करतील काये । विघ्नकरते ॥ ३८ ॥ तूं अनादि सर्वाधिष्ठान । परब्रह्म परिपूर्ण ॥ ऐशाही स्वामीस येतां शरण । दुःख माझें न जाये ॥ ३९ ॥ जें परब्रह्म अनादि सिद्ध । सर्वज्ञ समर्थ निर्द्वंद्व ॥ तेथेंच माझा ब्रह्मानंद । सद्गुरु असे ॥ १२४० ॥ जो परमात्मा पुरुषोत्तम । सच्चिदानंद परब्रह्म ॥ तोचि माझा पूर्णकाम । स्वामी असे ॥ ४१ ॥ जें परब्रह्म अनादी । घनानंद निरुपाधी ॥ तोचि माझा कृपानिधी । वाली असे ॥ ४२ ॥ जें अनामरूप निरहंकार । परब्रह्म अगोचर ॥ त्यातेंच करितों नमस्कार । सर्वज्ञातें ॥ ४३ ॥ जो भक्ताचा कैवारी । भक्ताकरितां रूपें धरी ॥ त्यातेंच शरण येऊनि हाका मारी । सर्वज्ञातें ॥ ४४ ॥ जो सर्वांचा भर्ता । जो परेहूनि परता ॥ त्यातें शरण सर्वथा । सर्वज्ञातें ॥ ४५ ॥ जेथूनि सर्व

झाले । जेथूनि वेद प्रगटले ॥ त्याचीं वंदितों पाउलें । सर्वज्ञाचीं ॥ ४६ ॥ जो परमात्मा परमेश्वर । मूळ पुरुष सर्वेश्वर ॥ अनादि देव विश्वंभर । त्यातें शरण असें मी ॥ ४७ ॥ जो अनंत ब्रह्मांडाचा धनी । वेद ज्यातें वर्णी ॥ शरण आहें लोटांगणीं । येतों तया ॥ ४८ ॥ जो एकला एकचि असे । जेथें नाहीं द्वैत पिसें ॥ सर्वथा त्यातें शरण असें । सर्वज्ञातें ॥ ४९ ॥ जो एकलाच स्वतंत्रपणें । क्रीडा करितो अलिप्तखुणें ॥ जो सर्वांचें अंतर जाणें । त्यातें शरण असें मी ॥ १२५० ॥ जो सर्वां अधिष्ठान । प्रकृति पुरुषाहूनि विलक्षण ॥ अनादि ब्रह्मपूर्ण । त्यातें शरण असें मी ॥ ५१ ॥ आपण सदेकरूप असतो । प्रकृति पुरुष होतो ॥ अवतार धरोनि विलास करितो । त्यातें शरण असें मी ॥ ५२ ॥ जो कालत्रयीं सारिखा असे । सर्वत्र सारिखा प्रकाशे ॥ त्यातें सर्वथा शरण असें । सर्वज्ञातें ॥ ५३ ॥ जो अनंतशक्तीचा स्वामी । जो ब्रह्मादिकांचा अंतर्यामी ॥ जो अनंतनामी अनामी । त्यातें शरण असें मी ॥ ५४ ॥ ज्याचें भय वायू वाहे । सविता ज्याचे आज्ञेंत राहे ॥ इंद्र अग्नि मृत्यु वाहे । भीति, त्यातें शरण मी ॥ ५५ ॥ ज्यातें शेष स्तवितां शिणला । वेद वाणितां परतला ॥ ब्रह्मा ज्याचा पुत्र झाला । त्यातें शरण असें मी ॥ ५६ ॥ जो अनादि अविद्या नाशी । लक्ष्मी ज्याची दासी ॥ भुक्ति मुक्ति पायां । पासीं । त्यातें शरण असें मी ॥ ५७ ॥ जो समष्टि व्यष्टिरूप ।

स्वयं कैवल्य आपेआप ॥ ज्यातें नाहीं नामरूप । त्यातें शरण असें मी ॥ ५८ ॥ जो स्वयें तृप्त आहे । परि शरणागताची चिंता वाहे ॥ ब्रह्मादि वंदिती ज्याचे पाये । त्यातें शरण असें मी ॥ ५९ ॥ ज्यातें योगींद्र ध्याती । ज्यातें मुनींद्र पूजिती ॥ ज्यातें सुरेंद्र नमिती । त्यातें शरण असें मी ॥ १२६० ॥ पुराणें ज्यातें स्तविती । शास्त्रें ज्यातें गाती ॥ वेद ज्यातें वर्णिती । त्यातें शरण असें मी ॥ ६१ ॥ जो अनंत ब्रह्मांडांचा नायक । ब्रह्मादिक ज्याचे आज्ञाधारक ॥ जो अनंत व्यापक । त्यातें शरण असें मी ॥ ६२ ॥ जो वेदांतवेद्य असे । सदैकरूप विलसे ॥ जें परब्रह्म अनादि असे । त्यातें शरण असें मी ॥ ६३ ॥ जो अनंत शक्तीचा नायक असे । सर्व सामर्थ्य ज्या अंगीं वसे ॥ जो परब्रह्म दयाळू सर्वज्ञ असे । त्यातें शरण असें मी ॥ ६४ ॥ जेणें प्रल्हादातें रक्षिलें । जेणें ध्रुवातें अभय दिल्हें ॥ जेणें गजेंद्रातें सोडविलें । त्यातें शरण आहें मी ॥ ६५ ॥ जेणें पांडवातें रक्षिलें । सुदाम्यातें दान दिलें ॥ जेणें उद्धवातें ज्ञान दिल्हें । लज्जा माझी त्या असो ॥ ६६ ॥ जेणें वानर मित्र केले । बिभीषणातें अभय दिलें ॥ जेणें रावणातें मारिलें । धावणी माझ्या तो धांवो ॥ ६७ ॥ जेणें मधुकैटभ वधिले । ब्रम्ह्यातें वेद पढविले ॥ ज्यातें शिवानें ध्यानीं धरिलें । माझी लज्जा त्या असो ॥ ६८ ॥ जो शंख चक्र गदाधारी । जो भक्ताचा

सहायकारी ॥ जो भवसागरापासोनि तारी । लज्जा माझी त्या असो ॥ ६९ ॥ जेणें अनंत राक्षस वधिले । भक्तांचें रक्षण केलें ॥ जेणें गोपिकातें आलिंगिलें । लज्जा माझी तो राखो ॥ १२७० ॥ जेणें अयोध्या वैकुंठा नेली । द्रौपदीची लज्जा रक्षिली ॥ त्याचे चरणीं भावें घालीं । लोटांगण मी ॥ ७१ ॥ जो वैकुंठींचा विहारी । निद्रा करितो शेषावरी ॥ भावें त्यातें अंगीं हाका मारी । धांव घालीं असा मी ॥ ७२ ॥ जो क्षीरसागरचा वासी । जो सूर्याग्नीतें प्रकाशी ॥ जो ब्रह्मानंद चिद्विलासी । करुणा त्यातें भाके मी ॥ ७३ ॥ जो आनंदघन तेजोराशी । जो परब्रह्म अविनाशी ॥ जो परमात्मा समदर्शी । नमन त्यातें करितों मीं ॥ ७४ ॥ ब्रह्मा विष्णु हर । हे ज्याचे आज्ञाधर ॥ ब्रह्म जे कां परात्पर । धांव ऐसें म्हणतों त्या ॥ ७५ ॥ जेणें धनुर्भंग केला । गोवर्धन नखीं धरिला ॥ परब्रह्म म्हणती ज्याला । विनंति त्यातें करितों मी ॥ ७६ ॥ जो भक्ताचे संकटीं । धांव घाली उठाउठी ॥ ज्याच्या सत्ते चाले सृष्टी । भिक्षा त्यातें मागे मी ॥ ७७ ॥ ज्याचीं विदें गाती मुनी । जो अनंतबळ चक्रपाणी ॥ ज्याचा महिमा वेद वर्णी । रक्षीं मातें म्हणतों त्या ॥ ७८ ॥ जो मातें शरण येतो । त्यातें मी अभय देतों ॥ जो श्रीराम ऐसें म्हणतो । अभय त्यातें मागे मी ॥ ७९ ॥ जो अनादि निष्काम । नित्यानंद पूर्णकाम ॥ शंकर जपतो ज्याचें नाम । पूजा त्याची करितों मी ॥ १२८० ॥

जो बोधरूप विज्ञानघन । सच्चिदानंद परिपूर्ण ॥ परब्रह्म निरंजन । नामें त्याचीं जपतों मी ॥ ८१ ॥ जो अव्यय अनंत । ज्यातें शरण असती संत ॥ ज्यातें म्हणती भगवंत । आशा त्याची धरिली म्यां ॥ ८२ ॥ जो परब्रह्म परात्पर । ज्यातें ध्याती हरिहर ॥ ज्याचा महिमा अपार । वाट त्याची पाहतों ॥ ८३ ॥ जो देवाचाही देव । जेथें नाहीं भावाभाव ॥ दयाळू ज्याचा स्वभाव । दर्शन त्याचें इच्छितों ॥ ८४ ॥ जो विशुद्ध परब्रह्म । ज्यातें नाहीं रूप नाम ॥ दत्तात्रेय पूर्णकाम । ऐसें त्यातें म्हणतों मी ॥ ८५ ॥ ज्याचा पार न कळे शेषा । शंकर ध्यातो ज्या परेशा ॥ दत्तात्रेया महापुरुषा । धांव ऐसें म्हणतों त्या ॥ ८६ ॥ जें परब्रह्म सच्चिदानंद । जें अनादि निर्द्वंद्व ॥ सदैकरूप ब्रह्मानंद । राम ऐसें म्हणतों त्या ॥ ८७ ॥ ज्याचा पार न कळे वेदा । ज्याच्या चरणीं नमी तो वेधा ॥ परब्रह्म दिव्य बोधा । शंकर शंभू म्हणतों मी ॥ ८८ ॥ ज्याचे अनंत गुण । जो सगुणाचा निर्गुण ॥ जो परब्रह्म पूर्ण । नाना नामीं स्मरतों त्या ॥ ८९ ॥ जो अगोचर अरूप । जें परब्रह्म आपेंआप ॥ जेथें नाहीं पुण्यपाप । ध्यान त्याचें करितों मी ॥ १२९० ॥ ज्याच्या अंगीं अनंत कळा । जो सर्वांत निराळा ॥ त्याचे सेवेचा सोहळा । भोगीन म्हणतों ॥ ९१ ॥ जो निरंतर असंग । जो सर्वदा असंग ॥ त्याचा करीन म्हणतों संग ।

परब्रह्माचा ॥ ९२ ॥ जें परब्रह्म अव्यय । त्याचे वंदितों पाय ॥ त्यापासोनि इच्छितों अभय । आतांच मी ॥ ९३ ॥ ज्याचे नामें वाल्मीक तरला । जेणें अजामिळ उद्धरिला ॥ जो मारीच मृगामागें धांवला । वाट त्याची पाहतों ॥ ९४ ॥ ज्या प्रभूतें नित्यनेमें । सनकादिक ध्याती अतिप्रेमें ॥ त्यातें दत्तात्रेय ऐशा नामें । भावें हाका मारितों ॥ ९५ ॥ जो भक्त-पक्षपाती । ज्याची सेवा ब्रह्मादि करिती ॥ माझे हात त्याचे हातीं । आहेत आतां ॥ ९६ ॥ जो परमात्मा श्रीपती । ज्याचा महिमा नेणती श्रुती ॥ माझी गती त्याचे हातीं । असे सत्य ॥ ९७ ॥ जो जाणें सर्वांतर । द्रष्टा साक्षी परात्पर ॥ तेणें माझा समाचार । घ्यावा आतां ॥ ९८ ॥ जेणें शिळेची केली नारी । जो शरणागतातें तारी ॥ तोचि माझा कैवारी । असे सत्य ॥ ९९ ॥ जो मन वाणीतें अगोचर । जो परब्रह्म परमेश्वर ॥ तोचि माझा आहे गुरु । स्वामी वाली सद्गुरु तो ॥ १३०० ॥ जो जाणे सर्वभावा । जो वंद्य महादेवा ॥ तेणें माझा आतां घ्यावा । समाचार ॥ १ ॥ जो देव कालत्रयीं असतो । त्याची वाट पाहतों ॥ त्यातेंच हाका मारितों । दत्तात्रेया ये आतां ॥ २ ॥ तुजवीण माझें कोणी नाहीं । मस्तक ठेविला तुझे पायीं ॥ येऊनि माझा समाचार घेई । आतांच देवा ॥ ३ ॥ आतां माझी गती । सर्वज्ञ देवा तुझे हातीं ॥ माझा सांभाळ कृपामूर्ती । करावा आतां निजांगें ॥ ४ ॥

देवा आतां काय करूं । कोठें राहूं कोठें फिरूं ॥ कैसा वांचूं कैसा मरूं । कांहीं देवा सुचेना ॥ ५ ॥ आतां अंत न पहावा । माझा समाचार घ्यावा ॥ प्राण माझा देवाधिदेवा । जाऊं पाहे सर्वज्ञा ॥ ६ ॥ आधीं माझा मनोरथ पुरवावा । मग माझा प्राण जावा ॥ माझा हेतू देवाधिदेवा । तुझे चरणीं गुंतला ॥ ७ ॥ आतां कोणती वाट पहाशी । कोठें देवा गुंतलासी ॥ पुढें आतां किती करिसी । दुर्दशा माझी सर्वज्ञा ॥ ८ ॥ पुरे आतां सिमा झाली । करुणासिंधो धांव घाली ॥ माझी आशा पुरविली । पाहिजे आतां सर्वज्ञा ॥ ९ ॥ माझी विटंबना व्हावी । मी महा विपत्ती भोगावी ॥ शरण असतांही पहावी । समर्थानें हें कैसें ॥ १३१० ॥ मी कोणाचे मुखाकडे पाहूं । कोठें जाऊं कसा राहूं ॥ आतां कैसा शरण येऊं । सर्वज्ञ देवा ॥ ११ ॥ आतां माझें कोण आहे । कोण मातें रक्षी पाहें ॥ तूंच आतां सद्गुरूमाये । रक्षीं मज ॥ १२ ॥ तुझें वात्सल्य अपार असे । तुझेसारिखा सखा नसे ॥ फार कष्टी होतसे । दास तुझा सर्वज्ञा ॥ १३ ॥ आतां माझी यावी करुणा । नको दाखवूं यातना ॥ सर्वज्ञ देवा दयाघना । धांव घालीं समर्था ॥ १४ ॥ माझें धैर्य गेलें । माझें सत्त्व बुडालें ॥ देवा माझे पांगुळे । पाय झाले सर्वज्ञा ॥ १५ ॥ माझी बुद्धी गेली । माझी धृती डळमळली ॥ भांबावल्याची अवस्था झाली । माझी देवा ॥ १६ ॥ काय करूं हें

सुचेना । कांहीं केल्या राहवेना ॥ चहूं फेर यातना । झाल्या मज ॥ १७ ॥ सर्वज्ञ जाणसी सांगूं काय । तूंच माझा बाप माय ॥ दत्तात्रेया वंदितों पाय । धांव घालीं आतां तूं ॥ १८ ॥ नित्य मंगल तुझें रूप । ब्रह्मानंद आपेंआप ॥ देवा माझा संताप । दूर करीं तूं दयाळा ॥ १९ ॥ आतां कोठवरी सांगावें । किती तरी लिहावें ॥ कैसें किती कळवावें । सर्वज्ञ देवा ॥ १३२० ॥. धांव आतां दयाळो । वाट पाहत बैसलों ॥ फार आतां भागलों । सर्वज्ञ देवा ॥ २१ ॥ माझें समाधान करावें । धांवोनि मातें दर्शन द्यावें ॥ लळे माझे पुरवावे । दीन दयाळा समर्था ॥ २२ ॥ आतां अवकाश राहिला नाहीं । तूं सर्व जाणसी पाहीं ॥ धांव आतां करूं काई । पायां पडतों सर्वज्ञा ॥ २३ ॥ तुझे द्वारीं दत्तात्रेय । व्याघ्रें धरिली गाय ॥ आतां सोडवीं दावोनि पाय । अनंतबळा सर्वज्ञा ॥ २४ ॥ भक्त तुझें भजन करिती । त्याची असावी अनुरूप वृत्ती ॥ म्हणोनि त्यातें विपत्ती । जाणत असतां दाविसी ॥ २५ ॥ भक्ताच्या हाका ऐकसी । भक्ताचें दुःख जाणसी ॥ मागें पुढें वागसी । सांभाळ करिसी भक्ताचा ॥ २६ ॥ जवळचि असती । ठेस लागतां हात देसी ॥ तहान भुकेचा समाचार घेसी । निरंतर ॥ २७ ॥ शीत उष्ण सर्व दुःख । भक्ताचें निवारी देख ॥ पाहसी भक्ताचें मुख । आवडीनें ॥ २८ ॥ भक्ताची

वाणी । ऐकसी आड ठाकोनी ॥ वैकुंठातें टाकोनि । भक्त- सन्निध राहसी ॥ २९ ॥ सांडोनि लक्ष्मीची ममता । करिसी भक्ताची चिंता ॥ भक्तभार वाहसी माथां । कौतुकें तूं ॥ १३३० ॥ भक्ताचें करिसी स्मरण । करिसी भक्ताचें ध्यान ॥ करिसी भक्ताचें सेवन । निजांगें तूं ॥ ३१ ॥ भक्त तुझा देव । भक्त तुझा ठाव ॥ भक्त तुझा जीव । जीवन कळा ॥ ३२ ॥ भक्ताचें जाणसी गुज । करिसी भक्ताचें काज ॥ राखिसी भक्ताची लाज । दयाळूपणें ॥ ३३ ॥ तुज भक्ताचें वेड असे । भक्त तुझ्या हृदयीं वसे ॥ भक्तावाचोनि कोणी नसे । तुझें देवा ॥ ३४ ॥ ऐसा भक्ताचा हितकारी । राहे भक्ताचे बरोबरी ॥ आघात संकट निवारी । आपुल्या अंगें ॥ ३५ ॥ भक्ता सन्निध राहसी । भक्तकौतुक पाहसी ॥ भक्त दुःखी होऊं न देसी । समर्थ देवा ॥ ३६ ॥ ऐसा दयाळू अससी । सर्वदां सांभाळ करिसी ॥ परंतु बहुधा राहसी । आडपणें ॥ ३७ ॥ भक्तानें अधिक भजावें । सर्व कांहीं विसरावें ॥ अखंड ब्रह्माकार व्हावें । म्हणोनि असें करिसी तूं ॥ ३८ ॥ तुझें गंभीर मत । तुझी करणी अघटित ॥ करिसी भक्ताचें हित । सर्वथा तूं ॥ ३९ ॥ हें सर्व सत्य आहे । माझें हितचि करिसी पाहें ॥ परंतु आतां समय नव्हे । आडपणाचा सर्वज्ञा ॥ १३४० ॥ आडपणाची अवधी सरली । आतां निर्वाण वेळा आली ॥ मातें हळहळ फार झाली । सर्वज्ञ

देवा ॥ ४१ ॥ आडपणाची वेळ नाहीं । आतां उडींच घालीं पाहीं ॥ प्रत्यक्ष येऊनि दर्शन देईं । शरण आलों म्हणोनि ॥ ४२ ॥ आतां जरी विलंब लाविला । तरी तुझा पुरुषार्थ गेला ॥ प्राण माझा कळवळला । अंतरीं देवा ॥ ४३ ॥ खरा खोटा पापी कुश्चळ । अन्यायी कपटी कुटिल ॥ शरण येतां तमालनील । भक्त तुतें प्रिय असे ॥ ४४ ॥ कैसा तरी तुझा भक्त । तुतें असे तो उचित ॥ अंगें करिसी त्याचें हित । आपला जाणोनि ॥ ४५ ॥ मी कैसातरी तुझा आहें । आतां मजकडे पाहें ॥ माझा प्राण जाऊं पाहे । धांव आतां सर्वज्ञा ॥ ४६ ॥ साक्षात् हरीचें द्वारीं आलों । हरीसन्मुख उभा ठाकलों ॥ हरीचे पायीं येऊनि पडलों । हरी जाणे सर्व हें ॥ ४७ ॥ हरीतें करितों विनंती । हरीच माझी गती ॥ आतां हरी कृपामूर्ती । लज्जा राखों दयाळो ॥ ४८ ॥ देवा तुझें नाम हरी । माझें दुःख क्लेश हरीं ॥ माझें समाधान करीं । आतांच देवा ॥ ४९ ॥ भक्तातें मार्ग दाखविसी । शरणागतातें रक्षिसी ॥ आपला जाणोनि सुबुद्धी देसी । सर्वज्ञ तूं ॥ १३५० ॥ मी दीन तुझा शिष्य आहें । चिंताडोहीं बुडलों पाहें ॥ सद्गुरु तुझे वंदितों पाये । मार्ग तुझा दाखवी ॥ ५१ ॥ मातें ऐसी बुद्धी देईं । जेणें भेटेल सद्गुरु आई ॥ माझी करुणा येऊं देईं । सर्वज्ञ देवा ॥ ५२ ॥ जेथें तुझी होईल भेट । तेथें नेईं मातें नीट ॥ तुज व्हावी तैसी खटपट । करवी आतां ॥ ५३ ॥ तेच करवीं

माझे हातीं । जेणें तुझे चरण भेटती ॥ मायबाप कमळापती । कष्टी न करीं मज आतां ॥ ५४ ॥ मी तुझे आधीन आहें । आतां मजकडे पाहें ॥ माझी अवस्था कठीण आहे । सर्वज्ञ राजा समर्था ॥ ५५ ॥ सद्गुरुराजा आजच येईं । कृपाळूपणें पदरांत घेईं ॥ माथा ठेविला तुझे पायीं । सर्वज्ञाच्या ॥ ५६ ॥ जो ज्याचा शरण असे । त्यास त्याची लज्जा असे ॥ शरणागतातें कोणी न त्रासे । समर्थ असतां सर्वज्ञा ॥ ५७ ॥ मी तुतें शरण आहें । तूं समर्थ अससी पाहें ॥ सर्व तुज ठाऊक आहे । उपेक्षा माझी न करी तूं ॥ ५८ ॥ लोकीं राजे असती । ते शरणागतातें नेणती ॥ दाद लागेना श्रीपती । एकाएकीं ॥ ५९ ॥ येथें दाद लागेना । क्षुद्र राजा जाणेना ॥ मग लक्ष्मीपतीपासीं जाणा । दाद कैसी लागेल ॥ १३६० ॥ कोठें ब्रह्मांडांचा पती । कोठें पतित मंदमती ॥ कोठें माझी विनंती । आयकेल देव ॥ ६१ ॥ ऐसी मातें शंका । सर्वथा नाहीं श्रीनायका ॥ सर्वज्ञ स्वामी माझ्या हाका । ऐके सत्य ॥ ६२ ॥ क्षुद्र राजे मदांध असती । अति उन्मत्त अल्पमती ॥ दुःख पराव्याचें नेणती । अज्ञान ते ॥ ६३ ॥ तुझा तैसा प्रकार नाहीं । तू सर्वज्ञ समर्थ अससी पाहीं ॥ समदर्शी दयाळू देव कांहीं । उपेक्षीना सर्वथा ॥ ६४ ॥ ऐसें हृदयीं जाणोनी । शरण आलों चक्रपाणी ॥ आतांच येईं धांवोनि । नमन करितों सद्गुरो ॥ ६५ ॥ तूंच माझा प्राण-प्रिय । तूं विश्रांति अक्षय ॥ सर्व कांहीं दत्तात्रेय । तूच माझें

॥ ६६ ॥ तुझें दर्शन इच्छितों । नित्य तुझे अपराध करितों ॥ नाना दोष आचरतों । विरुद्ध कर्म ॥ ६७ ॥ आचरण तों ऐसें । साधन पाहतां शून्य असे ॥ आतां देवा करूं केसें । आशा मोठी धरिली म्यां ॥ ६८ ॥ आतां तुझी भेट व्हावी । माझी आशा पुरवावी ॥ ऐसी कृपा करावी । शरण आलों म्हणोनी ॥ ६९ ॥ देवा माझा कांहीं । सर्वथा उपाय नाहीं ॥ नमन करितों तुझे पायीं । लज्जा माझी रक्षावी ॥ १३७० ॥ एक शरण आल्याचीच लाज । धरोनि देवा रक्षीं मज ॥ जाणोनि माझें हृद्गुज । आशा पुरवीं सर्वथा ॥ ७१ ॥ सर्वथा तुझेंच पायीं पडतां । काय छळिसी कृपावंता ॥ मातें रक्षावें समर्था । आपला जाणोनी ॥ ७२ ॥ माझी तों क्षुद्र करणी । दयाळू तूं माझा धनी ॥ लोटांगण घालीं तुझे चरणीं । पाव आतां सर्वज्ञा ॥ ७३ ॥ विलंबाचा समय । आतां नाहीं दत्तात्रेय ॥ वेगीं धांवोनि अभय । देईंच देवा ॥ ७४ ॥ आतां कोणत्या युक्ती । विनंति करूं मी सरली शक्ती ॥ देवा माझी विमुक्ती । करीं दुःखापासोनी ॥ ७५ ॥ सद्गुरुराया आतां येईं । तुज पाहिजे तेथें मातें नेईं ॥ माझा समाचार घेईं । सर्वज्ञ दयाळा समर्था ॥ ७६ ॥ कधीं येईल ते वेळा । तुझे चरण पाहीन डोळां ॥ तुझे सेवेचा सोहळा । भोगवी आतां ॥ ७७ ॥ एवं सोहळा भोगावा । ऐसा नाहीं पूर्व ठेवा ॥ तथापि नमितों सद्गुरुदेवा । हाच माझा ठेवा असे ॥ ७८ ॥ सद्गुरु माझें

प्रारब्ध कर्म । सद्गुरु माझा सकळ धर्म ॥ सर्व कांहीं सुकृत धर्म । सद्गुरूच माझा ॥ ७९ ॥ माझें जें जपादि साधन । सर्व तप अनुष्ठान ॥ सर्व कांहीं सद्गुरुचरण । आहेत माझे ॥ १३८० ॥ मी सर्वथा प्रारब्धहीन । परी सद्गुरुतें आहे शरण ॥ सद्गुरुचेच आधीन । आहे आतां ॥ ८१ ॥ जरी मी प्रारब्धाचा खोटा । परी सद्गुरु माझा समर्थ मोठा ॥ यद्यपी भाग्यहीन करंटा । तथापी लज्जा सद्गुरूतें ॥ ८२ ॥ मज तप जप रुचेना । योग साधन आवडेना ॥ आलस्यें कांहींच घडेना । स्नान संध्या व्रत नेम ॥ ८३ ॥ ऐसा मी कुश्चळ । फुटकें माझें कपाळ ॥ परी सद्गुरूतें वेळोवेळ । नमस्कार करीं ॥ ८४ ॥ आहें सद्गुरूतेंच शरण । सद्गुरूचेंच करितों स्मरण ॥ सद्गुरूचाच भरंवसा धरोन । बैसलों मी ॥ ८५ ॥ जळों प्रारब्धाची आशा । जळो साधनांचा भरंवसा ॥ लागलों सद्गुरूचे कासा । सद्गुरु माझा आधार ॥ ८६ ॥ सद्गुरूच माझी आई । पडिलों सद्गुरूचेच पायीं ॥ आतां सद्गुरुतेंचि कांहीं । करणें माझें ॥ ८७ ॥ सर्व कांहीं माझी चिंता । सर्व वाहे सद्गुरु दाता ॥ माझा भार वाहे माथां । आपला जाणोनी ॥ ८८ ॥ देवा सद्गुरु दयाळा । माझा प्राणांत समय आला ॥ अवकाश नाहीं राहिला । धांव आतां सर्वज्ञा ॥ ८९ ॥ देवा झाली विपरीत दशा । न करीं माझी निराशा ॥ अग्नि लागला दाही दिशा । ठाव नाहीं मज कोठें ॥ १३९० ॥ लोक

दरिद्रि असती । देशीं विदेशीं जाती ॥ खाती जेविति राहती । आपुलालें प्रकारें ॥ ९१ ॥ संपत्ति अथवा विपत्ति । सुख-दुःख सारें भोगिती ॥ दिवस आपुले सारिती । आयुष्याचे ॥ ९२ ॥ तैसे दिवस मी काढावे । ऐसा माझा प्रकार नव्हे ॥ सर्व तुतें ठाऊक आहे । सर्वज्ञ देवा ॥ ९३ ॥ भिक्षा मागोनि खावें । अथवा अयाचित घ्यावें ॥ जनीं वनीं रहावें । देशीं विदेशीं आनंदें ॥ ९४ ॥ सुखदुःख भोगावें । सद्गुरूतें भजावें ॥ संतसंगें असावें । निरंतर ॥ ९५ ॥ अन्न-वस्त्रास कांहीं । सद्गुरू उणें करणार नाहीं ॥ अशा प्रकारें पाहीं । कोठें तरी असावें ॥ ९६ ॥ हें सर्व सत्य आहे । परी राहवेना करूं काये ॥ सर्व कांहीं सद्गुरुमाये । ठाउके तुज ॥ ९७ ॥ आजपर्यंत राहिलों । परंतु सर्वत्र भागलों ॥ दुःखीच असतां दयाळो । काळ गेला ॥ ९८ ॥ संपत्ति विपत्ति भोगिली । जनीं वनीं वस्ति केली ॥ परंतु दुःखीच राहिली । स्थिती माझी ॥ ९९ ॥ जैसा कोणाचा बळी देती । आधीं न्हाऊं जेऊं घालिती ॥ तैसी माझी कमळापती । वर्तणूक समजावी ॥ १४०० ॥ फाशी द्यावया नेती । त्यातें लाडू खाऊं घालिती ॥ जैसी त्याची स्थिती । तैसी माझी जाहली ॥ १ ॥ नाना भोग भोगिले । परंतु मातें रोगचि गमले ॥ हें तुतेंच कळों आलें । सर्वज्ञातें ॥ २ ॥ सुखी दुःखी दिवस गेले । परंतु मला तों कष्टचि झाले ॥ जेवीं कारागृहीं राहिले । बंदीजन ॥ ३ ॥ तुम्ही नाना

भोग दिले । परंतु मातें सर्वथा नाहीं रुचले ॥ सौख्य नाहीं वाटलें । आण तुझी सर्वज्ञा ॥ ४ ॥ आतां मातें हृषीकेशी । अणिमादि संपत देशी ॥ तथापि मातें दुःखराशी । आहे सर्व ॥ ५ ॥ तुजवांचोनि सर्व कांहीं । मातें दुःखदायक पाहीं ॥ दत्तात्रेया सांगूं काई । जाणसी सर्व ॥ ६ ॥ जरी देशी इंद्रपदा । तेही होईल आपदा ॥ तुजवांचोनि सच्चिदानंदा । सर्व कांहीं नलगे मज ॥ ७ ॥ तुजवांचोनि सर्व कांहीं । मज दुःखप्रदचि पाहीं ॥ म्हणोनि मातें कोठेंही । राहवेना ॥ ८ ॥ तुजवांचोनि देवा आन । जरी कांहीं मागेन ॥ तरी देवा तुझीच आण । आत्मा माझा तूं असती ॥ ९ ॥ तुजवांचोनि सर्व कांहीं । मज रोग गमे पाहीं ॥ जाणसी तूं सर्व कांहीं । अंतर माझें ॥ १४१० ॥ मज तुझीच आशा असे । तुझेच साठीं व्याकूळ असें ॥ तुजवांचोनि इच्छा नसे । आण तुझी दयाळा ॥ ११ ॥ शपथेचें प्रयोजन नाहीं । सर्वज्ञ जाणे सर्व कांहीं ॥ राहवेना करूं काई । म्हणोनि देवा सांगतों ॥ १२ ॥ सर्व कांहीं सांगितलें । सर्व कांहीं कळों आलें ॥ आतां माझे डोळे । निवतील ऐसें करावें ॥ १३ ॥ शांत रहावयाचा । प्रकार कळविला साचा ॥ म्हणोनि माझे विनंतीचा । कळवळा यावा ॥ १४ ॥ ऐसें असतां स्वभावें । कोठें कैसें रहावें ॥ म्हणोनि मातें जाणावें । निराधार ॥ १५ ॥ चक्षूपादहीनाची । अवस्था झाली मज साची ॥ आण तुझे चरणाची । अन्यथा नाहीं सर्वज्ञा ॥ १६ ॥ अन्यथा

असल्या गोविंदा । मातें घडो नरक आपदा ॥ आतांचि येऊनि माझी आपदा । दूर करावी समदर्शी ॥ १७ ॥ माझेसारिखे अनाथाचा । तूं रक्षक आहे साचा ॥ म्हणोनि तुझेच चरणाचा । आश्रय केला ॥ १८ ॥ शरण आल्याची लाज । धरोनि मातें रक्षीं आज ॥ आपला जाणोनि मज । रक्षीं आतां सर्वज्ञा ॥ १९ ॥ तुझी कांस धरिली । त्याची हाणी झाली ॥ त्याची आशा न पुरली । ऐसें नाहीं ऐकिलें ॥ १४२० ॥ तुज शरण नसतों । तरी प्रारब्ध भोगितों ॥ तुझीं पावलें वंदितों । आतां प्रारब्ध कायसें ॥ २१ ॥ माझें प्रारब्ध हीन होतें । म्हणोनि शरण आलों तुतें ॥ आतां कैसा म्हणसी मातें । प्रारब्ध भोगीं आपुलें ॥ २२ ॥ प्रारब्धाचा भरंवसा सोडीला । तुझाच आश्रय केला ॥ प्रारब्ध कैसें दयाळा । भोगविसी तूं समर्था ॥ २३ ॥ जे तुझे विन्मुख असती । ते आपलें प्रारब्ध भोगिती ॥ मरती अथवा वांचती । आपल्या कर्में ॥ २४ ॥ मी तों तुतेंच शरण आलों । तुझे पायीं येऊनि पडलों ॥ तुझेच हातीं दयाळो । हात दिले ॥ २५ ॥ सर्वज्ञ समर्था तुझाच असें । मज प्रारब्धासी नातें कायसे ॥ तुतें नमितां होतसे । प्रारब्ध भस्म ॥ २६ ॥ आतां प्रारब्ध राहिलें नाहीं । तूंच माझें सर्व कांहीं ॥ येऊनि आतां भेट देईं । अन्यथा कर्तुं समर्था ॥ २७ ॥ करुणा तुतें भाकिताहें । पळ पळ तुझी वाट पाहें ॥

देवा प्रसंग हाच आहे । भेट देण्याचा ॥ २८ ॥ मज दुःखी कष्टी केलें । रानोरान रडविलें ॥ शीत उष्ण सोसविलें । तरी कोणता पुरुषार्थ ॥ २९ ॥ मी क्षुधे तृषेनें पीडिलों । जनीं वनीं भागलों ॥ यांत कोणता दयाळो । पुरुषार्थ तुझा ॥१४३०॥ आदीं माझी छळणा केली । मागूनि मातें भेट दिली ॥ यांत कोणती मिरविली । कीर्ति देवें ॥ ३१ ॥ कष्ट घेऊनि तुष्ट व्हावें । दुःखी करूनि अभय द्यावें ॥ सर्वज्ञ दयाळू म्हणवावें । हें योग्य नाहीं समर्था ॥ ३२ ॥ नाम तुझें समदर्शी । माझे दोष काय पाहसी ॥ देवा आतां कधीं रिझसी । नित्यतृप्ता सर्वज्ञा ॥ ३३ ॥ आतां सकल कलावंता । येईं अनंत गुण मंडिता ॥ नीति निपुणा महापंडिता । दत्तात्रेया तुज नमो ॥ ३४ ॥ शरणागताचा वाली । तूंच असशी उडी घालीं ॥ आतांच अभय भिक्षा घालीं । शरण तुतें सर्वज्ञा ॥३५॥ सर्वज्ञातें आळविलें । मी क्षुद्र म्हणोनि वृथा गेलें ॥ ऐसें न करीं पाउलें । आतांच दावीं समर्था ॥ ३६ ॥ तुतें आळवावें कैसें । हेंही मातें ठाऊक नसे ॥ यथा शक्ति जैसें तैसें । आळवितों ॥ ३७ ॥ चित्त माझें चंचळ । देह अस्थिर अमंगळ ॥ विधि मर्यादा सकळ । कांहीं न घडे दयाळा ॥३८॥ मंद मूढ बाष्कळ । बालबुद्धी अनर्गळ ॥ परी तुझा आहे कळवळ । यावी माझी सर्वज्ञा ॥ ३९ ॥ मी जे केली विनंती । तिची असावी तुतें स्मृती ॥ अधिक उणें बोलाची क्षिती ।

नको मानूं दयाळा ॥ १४४० ॥ सर्वज्ञातें हाका मारी । तुझा आहें घेईं पदरीं ॥ आतांचि येऊनि माझें करीं । समाधान ॥ ४१ ॥ माझें क्षुद्रपण पोरपण । सामान्यपण मूर्खपण ॥ नको पाहूं दावीं चरण । शरण आलों म्हणोनी ॥ ४२ ॥ तुझी कृपादृष्टी होतां । वरद हस्त माथां ठेवितां ॥ क्षुद्रचि होतो दयावंता । शंभू स्वयें ॥ ४३ ॥ एक पळही न लाविसी । यवनाचा ब्राह्मण करिसी ॥ सर्व सामर्थ्य तुझे पासीं । ब्रह्मानंदा कैवल्या ॥ ४४ ॥ अर्धे निमिषाभीतरीं । सृष्टी सारी संहारी ॥ निमिषार्धांत तैसीच सारी । रचना रची ॥ ४५ ॥ ऐसा तूं समर्थ अससी । सर्व कांहीं जाणसी ॥ विलंब कासया लाविसी । दीन दयाळू असतांही ॥ ४६ ॥ देवा माझी अवस्था पाहें । धांव तुतें शरण आहें ॥ आजच देवा दाखवीं पाय । सद्गुरू माये रक्षीं मज ॥ ४७ ॥ दुःखी असतां संसारीं । आर्त कोणतें कर्म न करी ॥ शुभाशुभ ही आचरी । तैसें देवा मज झालें ॥ ४८ ॥ तुझेंच साठीं आर्त आहें । कधीं येशील वाट पाहें ॥ शरण येऊनि वंदितों पाये । म्हणोनि येईं दयाळा ॥ ४९ ॥ सुर नर अनेक असती । स्वार्थाकरितां करिती प्रीती ॥ सेवकाची सेवा घेती । इच्छित देती सेवका ॥ १४५० ॥ ऋणी केल्यावांचोनि कांहीं । क्षुद्र दैवत पावत नाहीं ॥ म्हणोनि देवता सर्वही । स्वार्थी असती ॥ ५१ ॥ जैसें सेवकाचे प्रारब्धीं असतें । तेंच दैवतही देतें ॥ नसल्या स्वप्नीं सांगतें । दैवीं नाहीं

म्हणोनि ॥ ५२ ॥ म्हणे तुझें देवीं नाहीं । वेगें आतां परतोनि जाई ॥ पुढिलें जन्मीं घेई । इच्छित आपलें सेवाफळ ॥ ५३ ॥ धरोनि देवत्वाचा अभिमान । सेवक कुश्चळ म्हणोन ॥ त्यातें देतां दर्शन । शंका करी ॥ ५४ ॥ कांहीं चूक पडली जरी । तात्काळची क्षोभ करी ॥ ऐसीं देवतें लोकांतरीं । अनेक असती ॥ ५५ ॥ कांहीं संबंधी पाहावा । त्याचा अंगिकार करावा ॥ त्याचा मनोरथ पुरवावा । सेवाऋण घेवोनी ॥ ५६ ॥ ऋणावांचोनि देइना । भाव कांहीं ओळखेना ॥ ऐसे स्वार्थी देव नाना । अभय देती अतिलघु ॥ ५७ ॥ तूं तैसा नससी । हेतुवांचोनि प्रीती करिसी ॥ तुझी प्रीति शरणागतासी । कदा काळीं विटेना ॥ ५८ ॥ तुज सेवेची अपेक्षा नाहीं । स्वयंतृप्त अससी पाहीं ॥ ऋण अथवा संबंध कांहीं । तुतें नलगे सर्वज्ञा ॥ ५९ ॥ सोज्वळ अथवा कुश्चळ कोणी । शरण येतां चक्रपाणी ॥ तुतें समसमान दोन्ही । प्रियची अससी समदर्शी ॥ १४६० ॥ तुज कंटाळा नाहीं । शरण येतां ठेविसी पायीं ॥ कुब्जा शबरी वानर हेही । अंगें अंगिकारिले ॥ ६१ ॥ अत्यंत अमंगळ असला । जरी तुतें शरण आला ॥ दर्शन देतां कंटाळा । तुतें नाहीं भावज्ञा ॥ ६२ ॥ तुझे अंगीं अनंत गुण । न लागतां अर्धक्षण ॥ करिसी आपल्या समान । अमंगळ तें समर्थां ॥ ६३ ॥ येरवीं तुझ्या योग्य सोज्वळ ऐसा । कोणी नाहीं जगदीशा ॥ म्हणोनि क्षुद्रासही भरंवसा । तुझाच आहे ॥ ६४ ॥

मी अत्यंत अमंगळ असे । माझे सारिखा पातकी नसे ॥ परी सद्गुरूतें शरण असे । काया वाचा मनेंसी ॥ ६५ ॥ मी कुश्चळ पातकाची खाण । तथापि आतांच देसी दर्शन ॥ तुझा आहें तुतेंच शरण । म्हणोनि देवा सर्वज्ञा ॥ ६६ ॥ तूं जरी कृपा करिसी । क्षुद्र स्थिती राहील कैसी ॥ क्षुद्र जळ मी पापराशी । शुद्ध करीं तूं गुरुगंगे ॥ ६७ ॥ माझें कांहीं असावें । तें मी तुतें द्यावें ॥ मग देवें ही व्हावें । ऋणी माझें ॥ ६८ ॥ माझें कांहींच नाहीं । देवा तुतें देऊं काई ॥ नामरूप सर्वही । तुझेंच असे ॥ ६९ ॥ सेवा करोनि रिझवावें । हेंही कैसें म्हणावें ॥ माझें कांहीं असावें । तेणें सेवा करावी ॥ १४७० ॥ पंच भूतांचा देह । भूतें तुझींच निःसंदेह ॥ देवता प्राण इंद्रिय समूह । तोही तुझाच सर्वज्ञा ॥ ७१ ॥ चित्तचतुष्टय अंतःकरण । तीनी शक्ति तीनी गुण ॥ हेही तुझेच असती जाण । पंचविस या समवेत ॥ ७२ ॥ मीही तुझाच अंश असे । तुझे वेगळा मीही नसे ॥ तुझेच सामर्थ्यें होतसे । सर्व कांहीं सदसत् ॥ ७३ ॥ माझे स्वसत्तात्मक कांहीं । सेवेयोग्य सर्वथा नाहीं ॥ ज्याची वस्तू त्याचेंच पाहीं । असे सत्य ॥ ७४ ॥ ज्याची वस्तू त्यास द्यावी । त्याची मर्जी संपादावी ॥ ऐसी कैसी म्हणावी । योग्य सेवा ॥ ७५ ॥ त्याचेच हातें । त्याचें चंदन लाविलें त्यातें ॥ देवा ऐशा सेवनातें । सेवा कैसी

म्हणावी ॥ ७६ ॥ तुझा सारा इंद्रियगण । तुझे सारे द्रव्य-गुण ॥ तुझे सत्ते तुझें सेवन । काय केलें यांत मी ॥ ७७ ॥ म्हणोनि मी कांहीं करावी सेवा । हेंही सर्वथा दुर्घट देवा ॥ सेवा करोनि रिझवावा । सर्वज्ञ कैसा ॥ ७८ ॥ म्हणोनि उगा बैसलों आहें । भरंवसा धरोनि वाट पाहें ॥ येईं आतां सद्‌गुरू माये । तुझाच आहें सर्वथा ॥ ७९ ॥ देवा पुरता विचार करिसी । तरी माझा ऋणी अससी ॥ माझ्या ऋणाचे व्याजांत जासी । वैकुंठ लक्ष्मी समवेत ॥ १४८० ॥ देवा सत्य सांग मातें । तुज स्वामित्व तरी कोठें होतें ॥ मीच दिधली तुतें । स्वामित्व पदवी ॥ ८१ ॥ मीच शिष्यत्व केलें । मीच तुतें गुरुत्व दिल्हें ॥ तुझे प्रत्ययास आलें । प्रमाण वचन ॥ ८२ ॥ गुरुत्वाचे मोलास कांहीं । दुसरी वस्तूच नाहीं ॥ माझा ऋणीच अससी पाहीं । जन्मवरी ॥८३॥ यास बहूत साक्षी असती । वेद शास्त्रें ग्वाही देती ॥ माझा ऋणी श्रीपती । असे सत्य ॥ ८४ ॥ म्हणोनि आतां श्रीहरी । येईं माझा हिशेब करीं ॥ व्याजांत मातें अंगिकारीं । व्हावें तसें सर्वज्ञा ॥ ८५ ॥ माझें ऋणही फिटेना । तुझा संगही सुटेना ॥ तेणें करीन बंदिखाना । हृदयदरींचा ॥ ८६ ॥ ऐक आतां ब्रह्मानंद । यद्यपि तूं निर्द्वंद्व ॥ तथापि तुझा संबंध । अनादि असे ॥ ८७ ॥ त्वत्संबंधीं जगत् आहे । मीच एकला कैसा नोहे ॥ दत्तात्रेया सर्वथा

पाहें । त्वत्संबंधीं आहे मी ॥ ८८ ॥ गार जलसंबंधीं असे । बुडबुडा जलसंबंधीं विलसे ॥ तरंगचि केसा नसे । जलसंबंधीं सर्वज्ञा ॥ ८९ ॥ मृत्तिके-संबंधीं घट । तंतूसंबंधीं पट ॥ हेमसंबंधीं नग चोकट । असे जेवीं ॥ १४९० ॥ तेवीं तुझे संबंधीं । मीही आहे अनादि ॥ ऐसें जाणोनि इष्ट सिद्धी । करीं माझी सर्वज्ञा ॥ ९१ ॥ तुझी माझी नीति । सर्वज्ञ देवा अनेक असती ॥ तुतें आहे माहिती । सांगूं काय ॥ ९२ ॥ तुझा पुत्र तो बंधू माझा । माझे पुत्राचा तूं आजा ॥ माझा काका तो सहोदर तुझा । जाणसी तूं ॥ ९३ ॥ तुझी स्त्री माझी आई । ऐसें असतां सांगूं काई ॥ पाहिजे तें शोधूनि पाहीं । आवडे तें सिद्ध असे ॥ ९४ ॥ सर्व प्रकारें तुझा असें । आतां दयाळा दाखवीं पाये ॥ सर्वज्ञ देवा करूं काये । न सुचे कांहीं न घडे मज ॥ ९५ ॥ याच वेळे मुहूर्त आहे । येईं आतां मजकडे पाहे ॥ वियोग आतां न साहे । आण तुझी सर्वज्ञा ॥ ९६ ॥ जाणसी माझें अंतर । आतां नको लाऊं उशिर ॥ येऊनि माझा समाचार । आतांच घेईं समर्था ॥ ९७ ॥ देवा विपरीत दशा झाली । तुतें सारी कळों आली ॥ म्हणोनि आतांच उडी घालीं । सर्वज्ञ देवा ॥ ९८ ॥ विनंती जे करायाची । सर्व तुतें केली साची ॥ खूण माझे अंतरींची । ठाउकी तुज ॥ ९९ ॥ जैसी माझी मती होती । तैसी केली

विनंती ॥ जी काय असेल तुझी युक्ती । तीच खरी ॥ १५०० ॥ माझें क्षुद्र शहाणपण । देवा तुझे अनंत गुण ॥ तेथें सहजचि लाजिरवाण । बोलणें माझें सर्वज्ञा ॥ १ ॥ मी सर्व कांहीं निवेदिलें । शहाणपणही खर्चिलें ॥ परी तुझे मनास आलें । पाहिजे देवा ॥ २ ॥ बा जिन्नस योग्य असता । समर्थानें त्रास घेतां ॥ कोण त्याची मान्यता । न करी मग ॥ ३ ॥ प्रबल सत्ता समर्थाची । करील तीच होईल प्राची ॥ तेथें युक्ती दीनाची । काय चाले ॥ ४ ॥ करिशील शरणागताचा नाश । कोण ठेवील तुतें दोष ॥ समर्थातें दूषण विशेष । भूषण होय ॥ ५ ॥ मज अत्यंत छळिलें । शरण येतां उपेक्षिलें ॥ कोण तुतें बोल बोलें । ऐसें न करीं म्हणोनी ॥ ६ ॥ अनंत गुण तुझेपासीं । सर्व सत्तावंत होसी ॥ बरें वाईट काय करिसी । सर्व साजे तुज देवा ॥ ७ ॥ तूं समर्थ गोसावी । कोण तुतें शब्द ठेवी ॥ परंतु आतां करुणा यावी । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ८ ॥ नमन करितों याची लाज । आतांच देवा रक्षीं मज ॥ समर्था तुतें आहे सहज । रक्षण माझें सर्वज्ञा ॥ ९ ॥ प्रसिद्ध व्हावयाचें तें झालें । बहुतेकांस कळों आलें ॥ दत्तात्रेयाचीं पाउलें । पाहीन म्हणतों ॥ १५१० ॥ आतां माझे सारिखे क्षुद्राचा । अंगिकार केला साचा ॥ दर्शन देतां स्वामीचा । लौकिक कांहीं जाईना ॥ ११ ॥ करूं नये ती चावटी । देवा केली हाटोहाटीं ॥ तथापि देवा कृपादृष्टी ।

लौकिक कांहीं जाईना ॥ १२ ॥ देवा तुतें कांहीं । सर्वथा अशक्य नाहीं ॥ सद्‌गुरुराया आतां येई । दर्शन देई पायाचें ॥ १३ ॥ तुझें भजन करावें । लोक भजनीं लावावे ॥ तुझे भजनीं असावें । चित्त माझें ॥ १४ ॥ म्हणोनि खरें खोटें बोलिलों । बरें वाईट आचरलों ॥ रागास येऊनि दयालो । नको त्यागूं भावज्ञा ॥ १५ ॥ जें न होणें तें झालें । बोलायाचें बोलिलें ॥ आतां सर्व शेवटा नेलें । पाहिजे तुतें ॥ १६ ॥ प्रसंग येतां मागुतें । तेंच बोलणें घडतें ॥ सर्व कांहीं घडोनि येतें । शुभ अशुभ कर्म ॥ १७ ॥ बोलिल्या केल्याची सिद्धी । पाहिजे तैसी कृपानिधी ॥ करीं मातें दर्शन आदीं । देई आतां सर्वज्ञा ॥ १८ ॥ आतां याचा राग न यावा । पडला प्रसंग शेवटा न्यावा ॥ मजकडूनि तों अपराध व्हावा । घडला घडतो मागुती ॥ १९ ॥ मी तों सर्व सेवाच करितों । तुतें कांहीं अपराध गमतो ॥ क्षमा करीं तूं नमन करितों । क्षमावंता सर्वज्ञा ॥ १५२० ॥ घडायाचें तें नारायणा । घडलें तें तों पालटेना ॥ आतां प्रस्तुत योजना । करणें तुतें सद्‌गुरो ॥ २१ ॥ मर्जीस येईल तें योजावें । तैसेंच मातें सांगावें ॥ व्हावें तैसें वागावें । मातें दर्शन देवोनी ॥ २२ ॥ अपराध केले दारुण । नित्य करितों नारायण ॥ आहें तुतें अनन्य शरण । आतां कैसा त्यागिसी ॥ २३ ॥ आहे तैसा तुझा आहें । धांव आतां दावी पाये ॥

दत्तात्रेया वंदिताहें । पाय तुझे सर्वज्ञा ॥ २४ ॥ आतां पाहसी काय । माझा कांहींच नाहीं उपाय ॥ सद्‌गुरुराया दाखवीं पाय । सर्वज्ञ राजा ॥ २५ ॥ देवा माझी सामान्यता । नको पाहूं अमंगळता ॥ करीं माझा प्रतिपाळ आतां । सर्वज्ञ समर्था समदर्शी ॥ २६ ॥ धेनू करितां वासरूं । कष्टी होतें न धरी धीरू ॥ तैसें झालें काय करूं । जाणसी तूं सर्वज्ञा ॥ २७ ॥ दयाळा तूं धांव घालीं । पद्मकरें तूं कुरवाळीं ॥ तुझें बाळ मी वनमाळी । जगज्जनका समर्था ॥ २८ ॥ त्रैलोक्य वाटे शून्याकार । दुःख रजनी झाली घोर ॥ थरथरां कांपे अंतर । जाणसी तूं ॥ २९ ॥ नाना विकल्प चोर । प्राणघातक चौफेर ॥ वागती आतां विचार । न सुचे मज ॥ १५३० ॥ भवारण्यांत येऊनि पडलों । ऐसें असतां वाट भुललों ॥ संतसंगा अंतरलों । चोरसंगें ॥ ३१ ॥ चिंतावणवा लागला । विरहवन्ही धडकला ॥ हृदयाकाशीं कोंदला । अज्ञान-धूम ॥ ३२ ॥ कल्पनेची झाडी । भयव्याघ्र आरोळी फोडी ॥ पातकभिल्लाची धाडी । येऊनि पडली ॥ ३३ ॥ काळव्याळ गिळूं आला । सन्मार्ग दिसेनासा झाला ॥ सत्त्वचंद्र अस्ता गेला । प्रकाश नाहीं ॥ ३४ ॥ मदमतंग अनर्गळ । मारूं आला अत्यंत प्रबळ ॥ कामदैत्य आकाश पाताळ । व्यापोनि आला गिळाया ॥ ३५ ॥ नाना अविचारअस्वलें । देश कंटकवृक्ष आले ॥ येऊनि आडवे पडले । मनोरथांचे

पर्वत ॥ ३६ ॥ तृष्णामेघ वळोनि आला । प्रारब्धपवन प्रचंड सुटला ॥ शरीर ब्रह्मांड गोळा । कांपवितो ॥ ३७ ॥ आशानदीतें पूर आला । मोहग्राह सरसावला ॥ ममता-पंकीं निमग्न झाला । दास तुझा दयाळा ॥ ३८ ॥ नाना विषयांचें कंटक । अंग छेदिती देख ॥ ऐसिया अरण्यीं एकला एक । कष्टी होतो सर्वज्ञा ॥ ३९ ॥ आतां लक्ष्मीनायका । सकळ दुःख संहारका ॥ मार्गदर्शका प्रतापअर्का । उदया येईं सद्गुरो ॥ १५४० ॥ सर्वज्ञ देवा ऐशा वेळीं । न करीं आतां टाळाटाळी ॥ जरी नाहीं माझे कपाळीं । तुझा आहें समर्था ॥ ४१ ॥ आतांच दयाळा घालीं उडी । मज दुःखापासोनि काढीं ॥ करीं आतां तांतडी । सर्वज्ञ समर्था ॥ ४२ ॥ नको पाहूं माझी करणी । शरण आहें तुझे चरणीं ॥ आतांच दयाळा येवोनि । रक्षीं मातें समर्था ॥ ४३ ॥ आतां कोणते दिशेकडे जाऊं । कोठें जाऊनि कैसा राहूं ॥ कोणत्या प्रकारें पाहूं । पाय तुझे ॥ ४४ ॥ देवा राहतां अथवा जातां । मरतां किंवा वांचतां ॥ तुजवांचोनि रमाकांता । गत नाहीं सर्वज्ञा ॥ ४५ ॥ आतां निष्ठुरता सोडीं । मज वियोग-दुःखापासोनि काढीं ॥ देवा माझे घालीं तोंडीं । विज्ञान-कवळ ॥ ४६ ॥ दत्तात्रेया लक्ष्मीवरा । अतिथी आलों तुझे द्वारा ॥ आतां मातें माघारा । नको दवडूं समर्था ॥ ४७ ॥ पळ पळ पाहें तुझी वाट । आतां न मानीं माझा वीट ॥

यद्यपि मी अत्यंत शठ । तुझा आहें कैसा तरी ॥ ४८ ॥ कोठें वेदस्तवन सखोल । कोठें माझे बाळबोल ॥ कैसी तुतें कळवळ । येईल माझी ॥ ४९ ॥ माझें सामर्थ्य होतें । आळविलें तसें तुझिये सत्ते ॥ आतां माझी सर्वज्ञातें । करुणा यावी ॥ १५५० ॥ दयासिंधो जगन्निवासा । आहे तुझा भरंवसा ॥ शरण आलों आपले दासा । भेट देईं मज देवा ॥ ५१ ॥ मी अत्यंत कुश्चळ । कसा तरी तुझें बाळ ॥ आतां मातें शीतळ । करीं वेगीं सर्वज्ञा ॥ ५२ ॥ माझीं पातकें अन्याय । नको पाहूं दत्तात्रेय ॥ नमन करितों दाखवीं पाय । आतां दयाळा सर्वज्ञा ॥ ५३ ॥ तुतें सर्वथा शरण असतां । तुझा भरंवसा धरितां ॥ माझी दुर्दशा करितां । संकोच तुतें असावा ॥ ५४ ॥ एवढी निष्ठुरता बरावी । माझी दुर्दशा करावी ॥ ऐशी कुश्चित हीन पदवी । योग्य नाहीं तुज देवा ॥ ५५ ॥ नाशिवंत माझी काया । बुद्बुदापरी जाईल विलया ॥ प्रयत्न करिसी दत्तात्रेया । शरण असतां नाशाचा ॥ ५६ ॥ तूं जगातें पोषिसी । शरणागतातें पाळिसी ॥ माझाच कैसा संहार करिसी । उपासी ठेवोनी ॥ ५७ ॥ प्रणतदुःख निवारिसी । शरणागतातें बुद्धी देसी ॥ सर्वज्ञ म्हणोनि दाखविसी । मार्ग शरणागतातें ॥ ५८ ॥ मी भाकित असतां करुणा । माझी नायकसी दयाघना ॥ शरण असतां तुझे चरणा । कैसें मातें मोकलिशी ॥ ५९ ॥ जेणें माझें कल्याण

होई । ऐसी मातें बुद्धि देई ॥ जेणें प्रत्यक्ष तुझे पायीं । ठेवीन माथा ॥ १५६० ॥ मी तुझे आधीन आहें । हातीं धरोनि माझी बाहे ॥ माझे हातें करवीं पाहें । रुचेल तैसें ॥ ६१ ॥ प्राणिमात्राचें सूत्र । तुझे हातीं स्वतंत्र ॥ मी तों सर्वथा तुझेंच तंत्र । आहे आतां ॥ ६२ ॥ मालिकाचे वंदितों पाये । धन्यातें शरण आहें ॥ सर्वथा स्वामीचें स्वाधीन आहें । लज्जा माझी सद्गुरूतें ॥ ६३ ॥ माझे गुण दोष गणिसी । तरी विरुद्ध कर्म करिसी ॥ जरी क्षमावंताचा असमी । शिरोमणी ॥ ६४ ॥ मी कोणता योग करावा । कोणता प्रकार योजावा ॥ कोठें कैसा रहावा । देह माझा ॥ ६५ ॥ माझी मती खुंटली । स्फूर्ती चालेनासी झाली ॥ आतां माझी योजना केली । पाहिजे स्वामीतें ॥ ६६ ॥ निराधार पक्षहीन । सर्वथा तुतेंच आहे शरण ॥ देवा आतां माझा प्राण । जावयाची वेळ हे ॥ ६७ ॥ सर्वज्ञ दयाळा ऐशा समयीं । आतां मातें बुद्धी देई ॥ जेणें माझे सद्गुरू आई । प्रत्यक्ष आतां भेटसी ॥ ६८ ॥ घेई आतां समाचारू । सर्वथा करितों नमस्कारू ॥ नको लावूं उशिरू । सर्वज्ञ देवा ॥ ६९ ॥ देवा आजच समय आहे । आतां विलंब लावूं नये ॥ सांग कांहीं सद्गुरू माये । उपाय जेणें भेटसी ॥ १५७० ॥ कांहीं माझा काबू आहे । किंवा सर्वथा नोहे ॥ सर्वज्ञ देवा शोधूनि पाहे । ठाउक आहे तुज

सर्व ॥ ७१ ॥ आतां देवा माझी गती । सर्वथा तुझेच आहे हातीं ॥ दयाळा माझी विपत्ती । न करीं तुतें शरण मी ॥ ७२ ॥ जरी बरें वाईट झालें कांहीं । सर्वथा मजकडे नाहीं ॥ मी तों सर्वज्ञ स्वामीचे पायीं । पडलों सत्य ॥ ७३ ॥ आतां व्हावा तैसा प्रकार करीं । सर्वथा माझा अभिमान धरीं ॥ प्रत्यक्ष येऊनि अंगिकारीं । तुझा आहें म्हणोनी ॥ ७४ ॥ मज कोणाचेही आधीन । न करीं आतां नारायण ॥ तुझा आहें प्रत्यक्षच चरण । दावीं आतां सर्वज्ञा ॥ ७५ ॥ माझें धैर्य पौरुष बळ । अंतरींची हळहळ ॥ हित जाणोनि दयाळ । उचित असेल तें करावें ॥ ७६ ॥ आतां देवा माझी लज्जा । अंगें रक्षीं सर्वज्ञराजा ॥ कैसा तरी आहें तुझा । पुत्र सेवक शिष्य मी ॥ ७७ ॥ आतां विशेष बोलूं काय । सर्वज्ञा तुझें वंदितों पाय ॥ सद्गुरुराया दत्तात्रेय । धांव घालीं समर्था ॥ ७८ ॥ तुझे ब्रीदांची आशा । धरोनि शरण आलों जगदीशा ॥ माझी दुर्गती दुर्दशा । न करीं आतां दयाळा ॥ ७९ ॥ धांव भक्तरक्षका । शरणागताचे पाळका ॥ सकळ दुःखनाशका । दत्तात्रेया सद्गुरो ॥ १५८० ॥ आतां कोणती अवधी पाहसी । सर्व कांहीं जाणसी ॥ कोणता दुर्विचार करिसी । समर्थ दयाळा सर्वज्ञा ॥ ८१ ॥ तुझा आहें तुझाच आहें । आतां मजकडे पाहें ॥ सांग आतां करूं काये । विश्वंभरा सद्गुरो ॥ ८२ ॥ ऐशा प्रसंगीं दत्तात्रेया । कोणास

नाहीं माझी दया ॥ धांव आतां सद्गुरूराया । तुझा आहें सर्वज्ञा ॥ ८३ ॥ अशा प्रसंगीं केशवा । काय करूं मी तुझी सेवा ॥ माझी अवस्था दत्तदेवा । ठाऊक आहे तुज सर्व ॥ ८४ ॥ तुझा महिमा ऐकिला । म्हणोनि तुझा आश्रय केला ॥ न करीं माझा कंटाळा । दयासिंधो सद्गुरो ॥ ८५ ॥ ऐसिये विपत्तीचे ठायीं । काय करूं मी सद्गुरू आई ॥ अजूनि पाहसी काई । सर्वज्ञ दयाळा ॥ ८६ ॥ माऊली वांचोनि कांहीं । कोणास कींव येणार नाहीं ॥ दत्तात्रेया माझे आई । तूंच मातें कुरवाळीं ॥ ८७ ॥ तुतें करितों विनवणी । शरण आलों तुझे चरणीं ॥ आतां कोणाची मनधरणी । माझे हातीं करविसी ॥ ८८ ॥ तुझे मुखाकडे पाहतों । तुतेंच करुणा भाकितों ॥ तुतेंच काकुलती येतों । समर्थातें सर्वज्ञा ॥ ८९ ॥ सर्वज्ञाची कास धरिली । समर्थे माझी दुर्दशा केली ॥ सर्वज्ञ देवा कोठें गेली । अपार करुणा समदर्शी ॥ १५९० ॥ सर्वज्ञ देवें माझे वेळे । अनंत कर्णी घातले बोळे ॥ समर्थ असतां झांकिले । अनंत डोळे ॥ ९१ ॥ माझा आतांच अंगिकार करितां । तुज अशक्य नाहीं समर्था ॥ तुझा नावलौकिक समर्था । जाणार नाहीं सर्वज्ञा ॥ ९२ ॥ आतां कैसें हृदय दावूं । अनंत बळाचे अनंत बाहू ॥ दुःखसागरीं कैसें वाहूं । देती शरणागतातें ॥ ९३ ॥ तूं कैवल्यानंद अससी । तुज द्वैत नाहीं सुखरासी ॥ तथापि

शरणागताचे कौतुकासी । करूं जाणसी अभिज्ञा ॥ ९४ ॥ तुम्हीं निजानंदीं रमावें । एकाकीच रमावें ॥ मग दुःखितानें शरण जावें । कोणास देवा ॥ ९५ ॥ सुखरूपी तो सुखीच आहे । परी दुःखित दुःखचि भोगी पाहे ॥ जेणें माझें दुःख जाये । ऐसें कांहीं करावें ॥ ९६ ॥ देवें मज कांहीं । सर्वथा उणें केलें नाहीं ॥ जें द्यावें तें सर्वही । दिधलें तुम्ही ॥ ९७ ॥ तथापि माझें समाधान । नाहीं नाहीं नारायण ॥ शरण तुतें वंदितों चरण । धांव आतां सद्गुरो ॥ ९८ ॥ तूं सर्वज्ञ आहेसी । लोकत्रयीं नांदसी ॥ विलंब आतां गुणराशी । नको लावूं सद्गुरो ॥ ९९ ॥ दोन्ही जोडूनि कर । पायीं तुझे ठेविलें शिर ॥ दर्शन देई सत्वर । दत्तात्रेया तुझा असें ॥ १६०० ॥ तूं सर्वांचा अधिपती । तुझा महिमा सर्व गाती ॥ म्हणोनि तुतें विनंती । करितों देवा सर्वज्ञा ॥ १ ॥ शरणागतातें रक्षावें । प्रणतपालन करावें ॥ पतितातें उद्धरावें । क्षमावंता सर्वज्ञा ॥ २ ॥ आतां कोणता प्रकार करूं । कोठें राहूं कोठें फिरूं ॥ सद्गुरू करितों नमस्कारू । धांव आतां सर्वज्ञा ॥ ३ ॥ क्षमा करोनि अन्याय । देवा दावीं निजपाय ॥ किती आतां दत्तात्रेय । छळिसी तुझा असें मी ॥ ४ ॥ तुझी भेटी घ्यावी । तुझी वाणी आयकावी ॥ ही वार्ता असावी । बहुधा गुप्त ॥ ५ ॥ ऐसें असतां प्रसिद्ध झाली । मीही लोकीं चाउटी केली ॥ सर्व आतां शेवटा

नेली । पाहिजे देवा ॥ ६ ॥ समर्थाचे धरिले पाय । आतां लोकांची भीती काय ॥ माझा सद्गुरु दत्तात्रेय । प्रसिद्ध व्हावी हे कीर्ती ॥ ७ ॥ आतां लोकांचा दरारा । कासया बाळगूं क्षमासागरा ॥ माझा सद्गुरू भक्त-आधारा । तूंच असती ॥ ८ ॥ गुरुशिष्याचें नातें । त्रैलोक्याचें साजे तुतें ॥ माझें विशेष तूंच मातें । सर्व कांहीं उपदेशिलें ॥ ९ ॥ आतां चोरी कायसी । कासयाची शंका करिसी ॥ दत्तात्रेया समदर्शी । येईं आतां सर्वज्ञा ॥ १६१० ॥ आतां मातें त्यागिलें । तरी तुझेंच नांव गेलें ॥ म्हणोनि आतां पाउलें । दावीं देवा सर्वज्ञा ॥ ११ ॥ तुज व्हावें तेसें नारायण । घडवी आतां मजकडोन ॥ मी तों आलों सर्वथा शरण । हातीं धरोनि वागवीं ॥ १२ ॥ आतां देश नाहीं मातें । मी तों शरण आहे तुतें ॥ एक नमस्कारापरतें । कांहीं न घडे मजवस्तु ॥ १३ ॥ माझ्या आर्तीच्या कल्पना । नानातऱ्हेच्या योजना ॥ पाहोनि देवा नारायणा । विलंब आतां न लावीं ॥ १४ ॥ तुझेसाठीं कल्पना करितों । तुतें सर्वथा शरण येतों ॥ आतां माझे काय पहातो । अंतरींचे तरंग ॥ १५ ॥ नाना योजना योजितों । बहुतेकांचे पाय धरितों ॥ अंतरीं बहूत झुरतों । तुझेसाठीं सर्वज्ञा ॥ १६ ॥ कैसा तरी भेटो सद्गुरू । म्हणोनि करितों नाना विचारू ॥ जाणत असतां उशिरू । नको लावूं सर्वज्ञा ॥ १७ ॥ कल्पनादि

दयाळा । पाहोनि विलंब लाविला ॥ तरी माझा घात झाला । सद्गुरू देवा ॥ १८ ॥ मी त्वदाश्रयचि असे आहें । तुतें सर्वथा शरण आहें ॥ जाणत असतां विलंब काये । लाविसी समर्था सर्वज्ञा ॥ १९ ॥ मी तों सर्वथा शरण आहें । तुझे पायीं पडिलों पाहें ॥ आतां सर्व कांहीं उपाये । करणें तुतें सर्वज्ञा ॥ १६२० ॥ पूर्वींपासोनि तुतें पाहीं । शरण नव्हतों ऐसें नाहीं ॥ पहिल्यापासोनि तुझे पायीं । शरण आहें सर्वज्ञा ॥ २१ ॥ नवीन मागुतीं शरण । कैसा येऊं नारायण ॥ जैसा यात्रा तैसा शरण । आहें तुतें अनादि ॥ २२ ॥ सत्य सर्वथा आहें तुझा । आतां सांभाळ करीं माझा ॥ धांव आतां सर्वज्ञ राजा । दत्तात्रेया दयाळा ॥ २३ ॥ आतां दिवस सरले । घडी पळही भरले ॥ कंठीं प्राण उरले । सर्वज्ञ देवा ॥ २४ ॥ लोक सांगती प्रकार नाना । परी न येती माझे मना ॥ तुझें माझें विटेना । प्रेम देवा कालत्रयीं ॥ २५ ॥ कोणी सांगो काई । परी माझें प्रेम तुझे पायीं ॥ तुझे करितां प्राणही । गेला तरी पुरवला ॥ २६ ॥ तुझें माझें प्रेम पूर्ण । जरी होईल किंचिन्यून ॥ तरी देवा पावेन पतन । दत्तात्रेया सद्गुरो ॥ २७ ॥ पहावे दत्तात्रेयाचे चरण । हाच माझा कुळधर्म पूर्ण ॥ माझी गती आम्हीं पूर्ण । दत्तात्रेयचि असे ॥ २८ ॥ अनेक आचरोनि दोष । धरोनि बैसलों तुझी आस ॥ धांव आतां जगदीश । दत्तात्रेया सद्गुरो ॥ २९ ॥

आतां काय सांगावें । सर्व कांहीं जाणावें ॥ आतांच धांवणें धावावें । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ १६३० ॥ माझी तों मति गेली । ऐसें म्हणतोसि वनमाळी ॥ परी सद्गुरू माउली । जाणसी तूं अंतर ॥ ३१ ॥ हिताहित समजावें । तारतम्य जाणावें ॥ तेंही सर्व देवें । सांगितलें मज ॥ ३२ ॥ तथापि मातें राहवेना । कैसी करूं मी योजना ॥ काहूं कांहीं नारायणा । माझा नाहीं सर्वज्ञा ॥ ३३ ॥ कंठीं घालोनियां फासी । पारधी ओढी मृगासी ॥ तैसी अवस्था हृषीकेशी । झाली माझी सर्वथा ॥ ३४ ॥ माझा नाहीं दुराग्रह । माझा नाहीं निग्रह ॥ हा तुझाच अनुग्रह । आहे सत्य ॥ ३५ ॥ सर्वज्ञ देवा सद्गुरू आई । माथा ठेविला तुझे पायीं ॥ तुझे हातीं हात दोही । दिधले मग ॥ ३६ ॥ आतां पाहिजे तैसें करीं । मारीं अथवा तारीं ॥ सर्वथा आतां सर्वज्ञ हरी । तुझाच आहें समर्था ॥ ३७ ॥ तूंच काळाचा काळ । तुझें सारें बुद्धिबळ ॥ मी तों तुझा दुर्बळ । काय मजकडे लाविसी ॥ ३८ ॥ तूं निग्रहानुग्रह करिसी । तैसी त्यातें बुद्धि देसी ॥ तूंचि एक स्वतंत्र अससी । त्रैलोक्याचा धनी तूं ॥ ३९ ॥ तुतें शरण आहें । तुझी वाट पाहें ॥ पाहिजे तैसें सद्गुरू माये । करीं मारीं तारीं तूं ॥ १६४० ॥ तुतें आहें सर्वथा शरण । तुतें करितों वंदन ॥ आतां यातें नारायण । पाहिजे तें म्हणावें ॥ ४१ ॥ कोणी म्हणती पोरपण । कोणी म्हणती

मूर्खपण ॥ कोणी म्हणती पिशाचपण । करितो मंद ॥ ४२ ॥ कोणी म्हणती अविवेक करितो । कोणी म्हणती उगाच फिरतो ॥ कोणी म्हणती अविचार करितो । मूढ आहे ॥ ४३ ॥ कोणी म्हणती साहस करिसी । कोणी म्हणती वृथा मरसी ॥ कोणी म्हणती कां दवडिसी । नरदेहरत्न ॥ ४४ ॥ देवा जैसी ज्याची मती । तैसा मातें बोध करिती ॥ परतु माझी अंतर स्थिती । आहे तैसी जाणसी तूं ॥ ४५ ॥ पाहती वरला प्रकार । परी कोणी जाणेना अंतर ॥ विचार अथवा अविचार । जाणसी तूं सर्वज्ञा ॥ ४६ ॥ मी तों आहें तुतें शरण । सर्व कांहीं तुझें करण ॥ ऐसें असतां दूषण । लाविती त्या लावावे ॥ ४७ ॥ लोक करिती भूषण । माझें हें तों दूषण ॥ तुझें दूषण भूषण । होय देवा समर्था ॥ ४८ ॥ माझेकडे कांहींच नाहीं । मी तों पडलों तुझे पायीं ॥ पाहिजे तैसें करोनि घेईं । शरण आहें म्हणोनी ॥ ४९ ॥ आतांच येऊं दे करुणा । नमन करितों नारायणा ॥ धांव आतां दयाघना । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ १६५० ॥ दत्तात्रेया वेद-वरिष्ठा । माझी करिसी अपेष्टा ॥ यांत तुझी निजलाभ तुष्टा । तृप्ती कोणती दयाळा ॥ ५१ ॥ आसुर कर्म निंद्य केलें । निंद्य ऐसें आपणचि बोले ॥ माझे हातीं घडविलें । तेंच कैसें सर्वज्ञा ॥ ५२ ॥ तुझे हातीं हात दिले । म्हणोनि सारें तूंच घडविलें ॥ आतां मजकडे लाविलें । तरी माझें काय

चाले ॥ ५३ ॥ पाहिजे तैसें करूनि घेई । रुचेल तसी बुद्धी देई ॥ ऐसें म्हणत असतां पाहीं । त्रैलोक्याचे धन्यातें ॥ ५४ ॥ ऐसें असतां तुझे मना । हेंच मानलें नारायणा ॥ हिंडवोनि रानोराना । उपासी मातें मारिसी ॥ ५५ ॥ काय तुझे घरीं नाहीं अन्न । उपासी मारोनि घेसी प्राण ॥ विश्वाचें करिसी पोषण । भार झाला माझाची ॥ ५६ ॥ सद्गुरुराया नीति निपुणा । उत्तम केली योजना ॥ शरण असतां घेसी प्राणा । अन्नेंविण ॥ ५७ ॥ सकळ कळा तुझेपासी । त्यांत हीच आली मनासी ॥ शरणागतातें उपासी । समर्थ असतां मारावें ॥ ५८ ॥ यांत कोणतें तप झालें । काय साधन घडलें ॥ यांत विशेष काय केलें । सद्गुरूचें आराधन ॥ ५९ ॥ ऐशा प्रसंगीं नारायणा । धड स्नानही घडेना ॥ मग संध्यानेम अनुष्ठाना । ठाव कैंचा ॥ १६६० ॥ यथासांग तुझी पूजा । तेही घडेना सद्गुरूराजा ॥ यांत काय संतोष तुझा । अधिक झाला ॥ ६१ ॥ पूर्वीं काय होतें उणें । आतां काय झालें दुणें ॥ कैसें तुतें श्लाघ्यवाणें । वाटलें हें समर्था ॥ ६२ ॥ करीत असतां विनवणी । मज हिंडविलें रानोरानीं ॥ शेवटीं उपासी मारोनी । प्राण घेणें योजिसी ॥ ६३ ॥ प्राण माझाच आहे । दुर्दशा माझी करिसी पाहें ॥ समर्था तुझे वंदितों पाये । सर्वज्ञ दयाळू तूं अससी ॥ ६४ ॥ पूर्वीं होतों अशुद्ध । आतां कैसा झालों शुद्ध ॥

काय ऐसें ब्रह्मानंद । योजिली ही दुर्दशा ॥ ६५ ॥ वंदित असतां तुझीं पाउलें । तेणें माझें पातक न गेलें ॥ आतां मातें तेज आलें । कासयानें फारसें ॥ ६६ ॥ नाम स्मरतां अमंगळ राहिलों । आतां सोज्वळ कैसा झालों ॥ विशेष कोणतें आचरलों । आराधन तुझें ॥ ६७ ॥ आहें तैसा शरण आहें । अधिक काय केलें पाहें ॥ उपाशी मारोनि दत्तात्रेये । अधिक झालें कोणतें ॥ ६८ ॥ पूर्वी कांहीं लक्ष्मीकांता । उणी होती तुझी सत्ता ॥ आतां कांहीं अधिकता । आली तुझ्या सत्तेतें ॥ ६९ ॥ पूर्वी सामर्थ्य नव्हतें । आतां अधिक येईल काय तुतें ॥ उपाशी मारोनियां मातें । समर्थ होसी दयाळा ॥ १६७० ॥ सर्वथा असतां तुतें शरण । कैसा दुःख देसी दारुण ॥ सर्वज्ञाचे अनंत कर्ण । बधिर कैसे जाहले ॥ ७१ ॥ जो अनेक साधनीं पूरा असे । त्यातें पावे आपैसें ॥ येरां म्हणसी अधिकार नसे । ऐसा कैसा समदर्शी ॥ ७२ ॥ मी हीनाहूनि हीन । म्हणोनि करिसी माझें छळण ॥ सर्वथा आहें तुतें शरण । काय मारिसी दयाळा ॥ ७३ ॥ कैशा हांका पडतील कानीं । कैसा ओरडूं चक्रपाणी ॥ आतां माझी दीनवाणी । कधीं घेसी चित्तावरी ॥ ७४ ॥ आपला असे जो सर्वभावें । त्याचें काय काय पहावें ॥ आतांच येऊनि अभय द्यावें । अन्यथा कर्तुं समर्था ॥ ७५ ॥ आज कांहीं उणें आहे । उद्यां कांहीं अधिक होय ॥ ऐसें नाहीं सद्गुरू माये ।

धांव आतां सर्वज्ञा ॥ ७६ ॥ आतांच काय एक न करिसी । सर्व सामर्थ्यवंत असती ॥ अनंत गुण तूं चिद्विलासी । दत्तात्रेया धांव तूं ॥ ७७ ॥ माझे ऐसी दीनता । तुझे ऐसी कृपाळुता ॥ उभयतांची सार्थकता । आजच व्हावी सर्वज्ञा ॥ ७८ ॥ वत्सासाठीं धेनू धांवे । तैसें येऊनि अभय द्यावें ॥ दत्तात्रेया सर्वभावें । तुझाच आहें सर्वज्ञा ॥ ७९ ॥ अजूनि आपल्या बाळासी । काय देवा दुःख देसी ॥ सर्वज्ञ असतां पाहसी । अंत कैसा समर्था ॥ १६८० ॥ कैसा तरी तुझा आहें । आजच येईं सद्गुरू माये ॥ दत्तात्रेया वंदितों पाये । सर्वज्ञ दयाळा समर्था ॥ ८१ ॥ सर्व कांहीं जाणसी । जीवंत नरक भोगविसी ॥ लज्जा माझी समदर्शी । आजचि रक्षीं पावना ॥ ८२ ॥ दत्तात्रेया माझे आई । आतांचि धांवोनि येईं ॥ वारंवार ठेवितों पायीं । माथा तुझे सर्वज्ञा ॥ ८३ ॥ मी तों अपवित्र आळसाळू । दोषी भुकाळू झोपाळू ॥ अंगिकार माझा कृपाळू । कैसा आतां करिशील तूं ॥ ८४ ॥ न घडे तुझें सेवन । देवा कांहीं न घडे ध्यान ॥ अखंड न घडे नामस्मरण । कैसा मातें भेटसी ॥ ८५ ॥ अंगीं माझे आळस आहे । उगा बैसोनि वाट पाहें ॥ कैसे दाखविसी पाये । अपवित्रातें मज देवा ॥ ८६ ॥ जरी सर्व प्रकारें हीन । दोषी कलंकी दारुण ॥ तथापि तुतें आहें अनन्य शरण । म्हणोनि आहे भरंवसा ॥ ८७ ॥ देवा तुतें एकवार । केला असतां

नमस्कार ॥ त्याचा करिसी अंगिकार । लज्जा तुतें नमनाची ॥ ८८ ॥ नाना दोष आचरतों । तुझा आहें ऐसा म्हणतों ॥ त्याचा तुतेंच भार पडतो । अभय देसी त्यातें तूं ॥ ८९ ॥ तुझा स्वभाव शील यश । अनंत गुणही निर्दोष ॥ पाहूनि तुझी धरिली कास । समर्थ देवा सर्वज्ञा ॥ १६९० ॥ तुतें न लगे नाना कर्म । अथवा कांहीं दान धर्म ॥ तुझे प्रसन्नतेचें वर्म । तुझा आहें हें असे ॥ ९१ ॥ तुतें न लगे उग्रतप । कांहीं न लगे साधन जप ॥ जरी आचरला महा पाप । नमन करितां तारिसी ॥ ९२ ॥ तुझा आहें असें म्हणतों । तुझिये चरणीं नमन करितों ॥ मुखीं तुझें नाम वरितों । यथाशक्ति आठवितों ॥ ९३ ॥ यापरतें मातें कांहीं । अन्य साधन इष्ट नाहीं ॥ एवढा भरंवसा आहे पाहीं । देशील मातें दर्शन ॥ ९४ ॥ नमनमात्रें प्रसन्न होसी । तुझा म्हणतां अभय देसी ॥ नाम स्मरतां अंगिकार करिसी । सर्वथा आपला जाणोनि ॥ ९५ ॥ मी हीनच आहें जरी । पापी कुश्चळ भिकारी ॥ दर्शन देतां अंतरीं । शंका न धरीं तुझा असें ॥ ९६ ॥ जरी आहें सामान्य । परी तुझे कृपें होईन धन्य ॥ गुणदोष माझें सामान्यपण । नको पाहूं सर्वज्ञा ॥ ९७ ॥ आजच येईं याच वेळे । देवा माझे निववीं डोळे ॥ मनोहर सुंदर सांवळें । दावीं आतां निजरूप ॥ ९८ ॥ दत्तात्रेया दयाळा । आतांच येऊं दे कळवळा ॥ पायीं तुझे वेळोवेळां ।

माथा ठेवीं सर्वज्ञा ॥ ९९ ॥ स्वकृतेंच होईं तुष्ट । आतांच नाशीं माझे कष्ट ॥ कैसा जरी आहें भ्रष्ट । परी तुझा आहें मी ॥ १७०० ॥ देवा आतांच धांवोनि येसी । जरी मातें दर्शन देसी ॥ तरी तुझी समदर्शी । हानी नाहीं सर्वज्ञा ॥ १ ॥ आजच दाविसी पाय । तरी तुतें अशक्य काय ॥ दत्तात्रेया वंदितों पाय । आजच पावें सर्वज्ञा ॥ २ ॥ दत्तात्रेया शरण आहें । तुझाच असतां छळिसी काये ॥ धांव घालीं सद्गुरू माये । विलंब आतां न लावीं ॥ ३ ॥ माझ्या अंगीं धैर्य नाहीं । नको छळूं तूं सद्गुरू आई ॥ एथें माझें कोण पाहीं । असे देवा तुजविण ॥ ४ ॥ दुःखी कष्टी शरण आलों । दुःखचि भोगूनि जरी मेलों ॥ तरी तुजविण दयाळो । करुणा कोणा भाकूं मी ॥ ५ ॥ शरण आहें नारायणा । धांव घालीं नमितों चरणा ॥ दुर्दशा माझी दयाघना । न करीं आतां सर्वज्ञा ॥ ६ ॥ जरी देवा तूं म्हणसी । कीं आपलें कर्म भोगिसी ॥ मरसी अथवा वांचसी । मातें म्हणसी काय तूं ॥ ७ ॥ तूं म्हणसी तें सत्य आहे । आपलें कर्म भोगिसी पाहें ॥ परंतु तुतें शरण आहें । याची लज्जा धरावी ॥ ८ ॥ जैसे नाना लोक असती । ते आपलें प्रकारें प्रारब्ध भोगिती ॥ तुतें कांहीं न म्हणती । येईं देवा सोडवीं ॥ ९ ॥ जरी इतर लोकांसारिखा । मीही असतों पारखा ॥ तरी भोगिलें असतें देखा । लोकांपरी कर्म मी ॥ १७१० ॥ मी तों तुझा शिष्य

आहें । तूंच माझा बाप मायें ॥ प्राणसखा तूं दत्तात्रेय । सद्गुरू माझा आत्मा तूं ॥ ११ ॥ मी दारुण दुःख भोगावें । तूं समर्थ असतां पहावें ॥ शेवटीं मातें मारावें । उपाशी देवा हें काय ॥ १२ ॥ मी तों तुझा अंकित आहें । शरण असतां छळिसी कायें ॥ आतां वंदितों तुझे पायें । धांव सद्गुरो सर्वज्ञा ॥ १३ ॥ तप नाहीं साधन नाहीं । लघु हीन अपवित्र देही ॥ माझी लज्जा सद्गुरू आई । रक्षीं आतां अंगें तूं ॥ १४ ॥ योगी तुतें शरण येती । नाना साधनें तपें करिती ॥ उग्र तपें आचरती । तुझेसाठीं सद्गुरू ॥ १५ ॥ कोणी नाना व्रतें करिती । कोणी नाना नेम धरिती ॥ यथाशास्त्र आचरती । स्नानसंध्या योग ते ॥ १६ ॥ अंतःशुद्धी बाह्यशुद्धी । तुझे ठायीं निश्चल बुद्धी ॥ त्रिकाळ स्नान समाधी । साधिती धन्य ॥ १७ ॥ शीतोष्णादि नाना कष्ट । भोगोनि राहती संतुष्ट ॥ वेदवेत्ते मुनी वरिष्ठ । भजती तुतें दयाळा ॥ १८ ॥ एक धैर्याचे डोंगर । कोणी सत्त्वाचे सागर ॥ त्यांचा करिसी अंगिकार । निज अंगें तूं समदर्शी ॥ १९ ॥ ध्रुव पंच वर्षाचें बाळ । साधन त्यानें केलें प्रबळ ॥ आली त्याची कळवळ । पाय दाविले सर्वज्ञा ॥ १७२० ॥ सद्गुरू देवा माझे ठायीं । साधनांपैकीं कांहींच नाहीं ॥ आतां कैसें सद्गुरू आई । लज्जा माझी रक्षिसी ॥ २१ ॥ साधन अंगीं कांहींच नाहीं । आशा मोठी धरिली पाहीं ॥ आतां माझे सद्गुरू

आई । तुझें आहें बाळ मी ॥ २२ ॥ यद्यपी माझी क्षुद्र करणी । साधनहीन अपवित्र खाणी ॥ परंतु दोनी जोडोनि पाणी । नमन करितों सर्वज्ञा ॥ २३ ॥ तुझा आहें तुतें शरण । तुझे चरणीं करितों नमन ॥ देवा तुझेंच करितों स्मरण । यथाशक्ति होय तें ॥ २४ ॥ आपला जाणोनि माझी लज्जा । रक्षीं आतां सर्वज्ञ राजा ॥ कैसा तरी आहें तुझा । दोषी दुर्बळ हीन मी ॥ २५ ॥ आहे तैसा तुझा आहें । आतां मातें त्यागूं नये ॥ शरण आहें आतां काये । गुणदोष माझे पाहसी ॥ २६ ॥ चक्रवर्तीचें दर्शन । घ्यावया करिती यत्न जन ॥ नाना उपाय नाना साधन । सायास करिती ॥ २७ ॥ नाना यत्नें उपासना । नाना वस्त्रें भूषणें नाना ॥ योग साधूनि जन । दर्शन इच्छिती ॥ २८ ॥ ऐसें असतां कोणातें । दर्शन होतें न होतें ॥ परंतु राजपुत्रातें । अशक्य नाहीं दर्शन ॥ २९ ॥ अपवित्र असतां जरी । कुरूप मूर्ख अनधिकारी ॥ तथापि राजा अंगिकारी । पुत्र आपला म्हणोनि ॥ १७३० ॥ त्यातें नलगे कांहीं कारण । नाना साधन उपायन ॥ चक्रवर्तीचें दर्शन । सहज आहे तयातें ॥ ३१ ॥ तैसा मी अत्यंत अपवित्र । साधनहीन कुपात्र ॥ माझा पिता तूं स्वतंत्र । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ३२ ॥ असतां कुपुत्र कुमती । त्याचा राजे त्याग करिती ॥ न्याय रीती रक्षिती । धार्मिक ते ॥ ३३ ॥ तैसा मी कुपुत्र म्हणोनि ।

मातें त्यागिसी चक्रपाणी ॥ परंतु तुतें ऐसी करणी । योग्य नाहीं दयाळा ॥ ३४ ॥ तुझे पोटीं कुपुत्र झालों । हा तुझा दुर्लौकिक दयाळो ॥ तूं समर्थ असतां राहिलों । कुपुत्र केसा ॥ ३५ ॥ देव कुपुत्र कैसा व्याला । देवें शहाणा कां न केला ॥ लोकीं पुत्र कुपात्र झाला । हा दोष बापाचा ॥ ३६ ॥ समर्थाचा कुपात्र सुत । हेंच आदीं अनुचित ॥ तथापि झालों निश्चित । आळसें तुझ्या ॥ ३७ ॥ देवें आळसाखालें घेतलें । म्हणोनि मातें कुपुत्र केलें ॥ यांतचि तुझें नांव गेलें । जगज्जनका सर्वज्ञा ॥ ३८ ॥ ऐसें असतां प्राण घेसी । अथवा माझा त्याग करिसी ॥ येणें तुझी हृषीकेशी । फार होईल दुष्कीर्ती ॥ ३९ ॥ देवें कुपुत्र कां केला । पुनः त्याचा त्याग केला ॥ हें सर्वज्ञ समर्थ दयाळूला । योग्य नाहीं सर्वथा ॥ १७४० ॥ ऐसें त्रैलोक्याभीतरीं । दुर्यश होईल तुझें हरी ॥ म्हणोनि आतां आपले घरीं । ठेवीं मातें दयाळा ॥ ४१ ॥ देवा दृष्टांतमिसें सांगावें । कसें तरी समजावें ॥ म्हणोनि आतां सर्वज्ञ देवें । सर्व कांहीं जाणावें ॥ ४२ ॥ कोठें राजा सार्वभौम । कोठें दयाळू परब्रह्म ॥ सर्व समर्थ आत्माराम । समदर्शी तूं सर्वज्ञा ॥ ४३ ॥ क्षुद्र सार्वभौमाची क्षमा । क्षुद्र सार्वभौमाचा महिमा ॥ तुशीं त्यासीं आत्मारामा । साम्यता न घडे सर्वज्ञा ॥ ४४ ॥ त्याचे अंगीं सामर्थ्य नाहीं । म्हणोनि कुपुत्रातें त्यागितो पाहीं ॥ क्षमा दया समत्व पाहीं । नाहीं

त्यातें सर्वज्ञा ॥ ४५ ॥ तूं क्षमेचा सागर । तूं करुणेचा जलधर ॥ सामर्थ्यैंही भरपूर । तसाच अससी समर्था ॥ ४६ ॥ तूं शरणागताचा रक्षक । प्रणताचा दुःखनाशक ॥ पतितातें तारक । तूंच अससी समदर्शी ॥ ४७ ॥ तुज पुत्र असती अनेक । परी तुतें सर्व समान देख ॥ एकाचाही रमानायक । वीट नाहीं तुज देवा ॥ ४८ ॥ कुपुत्र अथवा सुपुत्र । पवित्र अथवा अपवित्र ॥ समान तुतें एकत्र । ठेविसी तूं सर्वांतें ॥ ४९ ॥ पुरे आतां विस्तार । तुतें करितों नमस्कार ॥ तुझें पायीं ठेविलें शिर । क्षमावंता सर्वज्ञा ॥ १७५० ॥ आतां कुपुत्र आहें जरी । अपवित्रता अंगीं खरी ॥ तथापि आहें सहजाधिकारी । सद्गुरू तुझे दर्शनाचा ॥ ५१ ॥ सर्वज्ञ देवा तुझा आहें । समर्था तुझे वंदितों पाये ॥ समदर्शातें शरण आहें । सद्गुरूतें मी सत्य ॥ ५२ ॥ आतां जरी साधन नोहे । नाना कुकर्मे माथां वाहे ॥ तथापि मातें अधिकार आहे । सहज तुझे दर्शनाचा ॥ ५३ ॥ जेवीं राजबाळ तें पांगुळें । अमंगळ अपवित्र जरी असलें ॥ तथापि राजअंकीं सहज लोळे । निःशंक निर्भय अनायासें ॥ ५४ ॥ तेवीं मी सर्व साधनहीन । अपवित्र आळसी गुणविहीन ॥ तथापि घालीन लोळण । प्रत्यक्ष अंकीं सद्गुरूचे ॥ ५५ ॥ जेसें राजबाळक जाण । सहज घेतें राजदर्शन ॥ तेसें दत्तात्रेयाचें प्रत्यक्ष दर्शन । अनायासें घेईन मी ॥ ५६ ॥ नित्य अपराध

करितों । नित्य दोषच आचरतों ॥ तथापि देवा पाहतों । वाट तुझी सर्वज्ञा ॥ ५७ ॥ राजबाळ खोड्या करी । केश श्मश्रू हातीं धरी ॥ तथापी राजा हृदयीं धरी । कौतुकें आपुले बाळातें ॥ ५८ ॥ मी वधाई अपराध करितों । त्यागाई पापें आचरतों ॥ आळस येतां स्वस्थ निजतों । अपवित्र दोषी ठायींचा ॥ ५९ ॥ ऐसें असतां सद्गुरू । दत्तात्रेया करुणासागरू ॥ दर्शन देईल अंगिकारू । करील माझा आतांचि ॥ १७६० ॥ आतां उगा बैसलों आहें । कधीं येशील वाट पाहें ॥ धांव घालीं सद्गुरू माये । दत्ता दयाळा सर्वज्ञा ॥ ६१ ॥ काय अंतरांतूनि बाहेर येसी । अथवा बाहेरूनि धांवोनि येसी ॥ किंवा सन्मुखचि प्रगट होसी । सर्व तुतें शक्य असे ॥ ६२ ॥ तूं सर्व कळावंत अससी । न कळे कोणता प्रकार करिसी ॥ दत्तात्रेया चिद्विलासी । विलंब आतां न लावीं ॥ ६३ ॥ आतां कसा तरी येऊं शरण । कैसें तरी करूं नमन ॥ कैसी विनंती नारायण । करूं आतां सर्वज्ञा ॥ ६४ ॥ सत्य तुतें नारायण । शरण आहें तुझी आण ॥ करावें तैसें तुतें नमन । केलें देवा सर्वज्ञा ॥ ६५ ॥ जैसी होती माझी मती । तैसी केली मी विनंती ॥ यावा तैसा काकूळती । आलों तुतें सर्वज्ञा ॥ ६६ ॥ जैसी भाकावी करुणा । तैसी भाकिली दयाघना ॥ अजूनि कैसें द्रवेना । अंतर तुझें दयाळा ॥ ६७ ॥ आतां कोणता उपाय करूं ।

कैसा तुतें हांका मारूं ॥ कैसा देवा धीर धरूं । सद्गुरूराया सर्वज्ञा ॥ ६८ ॥ आतांच येऊं दे करुणा । तुझा आहें नारायणा ॥ धांव घालीं दयाघना । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ६९ ॥ तूं मनवाणीतें अगम्य । तथापि भक्तिगम्य ज्ञानगम्य ॥ आहेसी देवा भावगम्य । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ १७७० ॥ यांतूनि देवा माझे ठायीं । दत्तात्रेया कांहींच नाहीं ॥ तथापि देवा पडतों पायीं । भेट देई मज आतां ॥ ७१ ॥ तुझे योग्य आवडतें । जरी भक्तिभाव असते ॥ तरी आजपर्यंत मातें । भेटला असता तूं ॥ ७२ ॥ मी सर्व प्रकारें हीन । आजच इच्छितों दर्शन ॥ तूंच माझी आशा पूर्ण । करीं देवा दयाळा ॥ ७३ ॥ मी आपला अधिकार न पाहिला । तुझे दर्शनाचा मनोरथ धरला ॥ आतां समर्था पुरविला । पाहिजे दयाळा ॥ ७४ ॥ मी निंद्य पापी अत्यंत मलिन । तूं दिव्यमूर्ती चैतन्यघन ॥ आजच देणें दर्शन । शंका न धरीं गुरुगंगे ॥ ७५ ॥ तूं देवादिकातें अदृश्य । मी चर्मचक्षू तुझा शिष्य ॥ आजच होई मातें दृश्य । समर्था दयाळो सर्वज्ञा ॥ ७६ ॥ मज भेटावया कांहीं । लज्जा न धरीं सद्गुरू आई ॥ शरण आहें पडतों पायीं । आजच देई दर्शन ॥ ७७ ॥ सद्गुरू आपले वरदहस्तें । आजच हृदयीं धरीं मातें ॥ चाळवूं नको शरण तुतें । सर्वभावें आहें मी ॥ ७८ ॥ आतां कोणती अवधी पाहसी । तुझाच आहें समदर्शी ॥ समर्थ असतां

उपवासी । कासया मारिसी दयाळा ॥ ७९ ॥ नवमास वागविलें उदरीं । बाळक अमंगळ झालें जरी ॥ माता त्यातें अंगिकारी । जगज्ञनका सर्वज्ञा ॥ १७८० ॥ तूंच माझा जननी जनक । मी कैसेंतरी तुझें बाळक ॥ देवा माझें कौतुक । आतां अंगें करिसी तूं ॥ ८१ ॥ कष्टें काळ हा लोटतों । तुतें कैसा पाहवतो ॥ धांव हांका मारितों । व्यापक दयाळा सर्वज्ञा ॥ ८२ ॥ दयावंता आलों शरण । तुझे वंदित असतां चरण ॥ समर्थ असतां दारुण । दुःख कैसें दाखविसी ॥ ८३ ॥ जवीं मशकाचें पिलूं । थोड्याच दुःखें होय व्याकुळू ॥ मक्षिकेसी प्रळयकाळू । वन्ही कासया पाहिजे ॥ ८४ ॥ जें गजेंद्रा सोसवेना दुःख । तें पिपीलिकेसी दाविसी देख ॥ हाहा ! लक्ष्मीनायक । उचित नाहीं दयाळा ॥ ८५ ॥ मातें एकदोन दिवस । आणीक जरी दाविले त्रास ॥ तरी कांहीं जगन्निवास । सामर्थ्य तुझें वाढेना ॥ ८६ ॥ मजला त्रास दाखविला । तेणें तुझा मनोरथ पुरला ॥ अथवा तुतें पुरुषार्थ घडला । ऐसें नाहीं दयाळा ॥ ८७ ॥ तुझे हातीं हृषीकेशी । हात दिधले समदर्शी ॥ जैसा मातें नाचविसी । तैसा देवा नाचतों ॥ ८८ ॥ तुझीं नमितों पाउलें । तूंचि छलन आरंभिलें ॥ येथें कोणाचें काय चाले । सर्वज्ञ देवा दयाळा ॥ ८९ ॥ आतां कैसी करूं विनवणी । कैसा येऊं लोटांगणी ॥ अजूनि कैसी चक्रपाणी । करुणा तुतें येईना

॥ १७९० ॥ देवें शरणागत त्यागिला । ऐसा नाहीं आयकिला ॥ मजविषयींच कैसा झाला । दयाळू असतां वज्ररूप ॥ ९१ ॥ नमन करितों तुझे पायीं । आतां येई दर्शन देई ॥ दत्तात्रेया सद्गुरू आई । दुःख नाशी सर्वज्ञा ॥ ९२ ॥ तुजवीण माझें कोणी नाहीं । तूंच माझा बाप आई ॥ आतांच येऊनि समाचार घेई । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ९३ ॥ फार कष्टी होत आहें । लवपळ तुझी वाट पाहें ॥ आतांच येसी सद्गुरू माये । तुझें आहें बाळ मी ॥ ९४ ॥ देवा आपले बाळासाठीं । उडी घालीं उठाउठी ॥ दत्तात्रेया आतांच भेटी । देई मातें सर्वज्ञा ॥ ९५ ॥ ज्यातें सुईची वेदना । झाली असतां सोसवेना ॥ त्यातें कुठार दयाघना । काय हाणिसी धर्मज्ञा ॥ ९६ ॥ शरणागतानें दुःखी व्हावें । आपण अंगें पहावें ॥ ऐसी हौस सर्वज्ञ देवें । धरिली नाहीं कधींही ॥ ९७ ॥ दुःख जावें दयाळो । म्हणोनि तुतें शरण आलों ॥ देवा फार दुःखी झालों । याची लज्जा असों दे ॥ ९८ ॥ कोटि विप्रांचें हनन । करोनि येईल मातें शरण ॥ त्यान्ता त्याग न करी जाण । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ ९९ ॥ समर्थातें शरण येती । त्यातें जे कां त्यागिती ॥ ते तों पापी मंदमती । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ १८०० ॥ जो मातें शरण येतो । तुझा आहें ऐसें म्हणतो ॥ त्यातें सर्वथा अभय देतों । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ १ ॥ जे सर्व प्रकारें

जाणा । शरण आले माझे चरणा ॥ त्यातें सर्वथा त्यागीना । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ २ ॥ मी भक्ताचे आधीन । भक्त माझा आत्मा जाण ॥ भक्तरक्षक नारायण । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ ३ ॥ जो येईल मातें शरण । त्याचें भय मी नाशीन ॥ ऐसा आहे माझा पण । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ ४ ॥ जो भीत शरण येईल मातें । प्राणापरीस ठेवीन त्यातें ॥ त्यागीना मी शरणागतातें । ऐसा स्वमुखें बोलिला तूं ॥ ५ ॥ मज द्वेष्य प्रिय कांहीं । अधिक उणा कोणी नाहीं ॥ मी समदर्शी आहें पाहीं । ऐसें स्वमुखें बोलिला तूं ॥ ६ ॥ ऐशा तुझे वचनाचों । विश्वास धरोनि दृढतर साचा ॥ शरण आलों पातकांचा । राशी तुतें सर्वज्ञा ॥ ७ ॥ मातें उपवासी मारिसी । विश्वासघात कैसा करिसी ॥ माझे गुण दोष पाहसी । अयोग्य तुज हें विश्वंभरा ॥ ८ ॥ जरी ऐसें म्हणतासी केशवा । तपस्वी सुकृती असावा ॥ पवित्र मातें शरण यावा । त्याचा रक्षक असें मी ॥ ९ ॥ आचारशील असावा । अपराधीही नसावा ॥ साधनीं मातें शरण यावा । रक्षण त्याचें करीन मी ॥ १८१० ॥ तेंही कृत त्रेत द्वापारीं । शरण येईल मातें जरी ॥ त्यातेंच मी अंगिकारीं । कलियुगीं मी रक्षीना ॥ ११ ॥ जे कोणी अपराधी दोषी । कुश्चळ कलंकी आळशी ॥ अमंगळ जे पापराशी । शरण त्यांनीं येऊं नये ॥ १२ ॥ इत्थं ऐसे प्रकार नाना । बोलिला असतास

नारायणा ॥ मग हीन दीन तुझे चरणा । शरण येते कासया ॥ १३ ॥ तप नाहीं आचार नाहीं । सेवा नाहीं साधन नाहीं ॥ विद्यावंत पवित्र नाहीं । शरण त्यांनीं येऊं नये ॥ १४ ॥ समर्थाचा अंगिकार करितो । हीनदीनां त्यागितो ॥ युगत्रयींच अभय देतो । कलियुगीं तो देईना ॥ १५ ॥ ऐसें समजोनियां जन । करिते आपुलें समाधान ॥ तुतें कोणी न येते शरण । हीनपापी कलियुगीं ॥ १६ ॥ मग मीही देवा आपुलें । पौरुष असतें विचारिलें ॥ समजूनि तुझीं पाउलें । धरिलीं असती दयाळा ॥ १७ ॥ तूं चारी युगीं सारिखा असती । कलियुगीं तूं लवकर भेटसी ॥ तूं दीनदयाळू समदर्शी । सर्व तुतें सारिखे ॥ १८ ॥ तूंही बोलिला निजमुखें । शरणागताते माझे सखे ॥ जो शरण मातें त्यातें निकें । अभय देतों सर्वथा ॥ १९ ॥ सत्य तुतें आहें शरण । देवा घाबरा झाला प्राण ॥ आतां काय पहासी जाण । आण तुझी दयाळो ॥ १८२० ॥ कांहीं केल्या राहवेना । फार झाल्या मज यातना ॥ दत्तात्रेया करुणाघना । धांव आतां सर्वज्ञा ॥ २१ ॥ मज दुःख भोगविलें । यांत तुझे हातीं कांहीं आलें ॥ ऐसें नाहीं दयाळू देवें । दारुण कैसें योजिलें ॥ २२ ॥ मी तुझे हातीं हात दिले । म्हणोनि तूंच करविसी ऐसें बोलें ॥ सत्य देवा घडविलें । तूंच सारें सर्वज्ञा ॥ २३ ॥ तुतें जरी शरण नसतों । मग मीच केलें ऐसें म्हणतों ॥ शरण तुझे

पायां पडतों । आतां करणें सर्व तुझें ॥ २४ ॥ देवा दयाळो सर्वज्ञ असर्सी । करुणा भाकितों ती ऐकसी ॥ समर्थ असतां पाहसी । स्वयें कैसा समदर्शी ॥ २५ ॥ तूं सच्चिदानंद पुतळा । सुखदुःखासी निराळा ॥ तथापि तुतें कळवळा । आहे शरणागताचा ॥ २६ ॥ शरणागता जें दुःख होतें । तें तुझे अंगीं उमटतें ॥ ऐसा दयाळू म्हणोनि तुतें । शरण आहें सद्गुरो ॥ २७ ॥ आतां कासया कष्ट देसी । व्यर्थ विलंब कां लाविसी ॥ धांव दयाळा समदर्शी । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ २८ ॥ पायीं ठेवितों माथा । आतांच येईं रमानाथा ॥ सर्वज्ञ दयाळा समर्था । दत्तात्रेया सद्गुरो ॥ २९ ॥ कोमळ तुझें अंतःकरण । मातें मारिसी अन्नाविण ॥ ऐसा कैसा दारुणपण । देवा दयाळा केला त्वां ॥ १८३० ॥ प्राण माझा कालवतो । वाट तुझी पाहतों ॥ करुणा भाकीं नमन करितों । धांव आतां सर्वज्ञा ॥ ३१ ॥ मी उपवासी मरावें । अथवा कांहीं भक्षावें ॥ करणें न करणें आघवें । माझे हातीं कांहीं नसे ॥ ३२ ॥ आतां तुझे मनास जें जें आलें । तेथें माझें काय चाले ॥ तुझे हातीं हात दिले । तुझ्या आहें आधीन मी ॥ ३३ ॥ आतां उपाशी मारणें । किंवा खाऊं घालूनि दुर्दशा करणें ॥ देशीं विदेशीं दुःख देणें । व्हावें तैसें करावें ॥ ३४ ॥ तूं सर्वज्ञ सर्वांचा धनी । समर्थ दयाळू चक्रपाणी ॥ नमस्कार करितों तुझे चरणीं । लज्जा

माझी तुज असो ॥ ३५ ॥ आतां येऊं दे कळवळा । धांव समर्था दयाळा ॥ तुझे अंगीं सकळ कळा । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ३६ ॥ सद्गुरू तुझे पडतों पायीं । तुजवीण दयाळू कोणीच नाहीं ॥ आजचि येऊनि समाचार घेई । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ३७ ॥ जे जे विनंती केली । ते ते सारी व्यर्थ झाली ॥ आतां तरी धांव घाली । सर्वज्ञ देवा सद्गुरो ॥ ३८ ॥ मज भोगविसी दुःख । यांत तुतें काय सुख ॥ धांव आतां लक्ष्मीनायक । दत्तात्रेया सर्वज्ञा ॥ ३९ ॥ देवा आतां आजच येई । दयाळू तूं दर्शन देई ॥ दत्तात्रेया सद्गुरू आई । तुझा आहें सर्वज्ञा ॥ १८४० ॥ देवा अनंत कळा होत्या । एका-परिस एक चढत्या ॥ त्यांतूनि सद्गुरू मातापित्या । दारुण कैसी योजिली ॥ ४१ ॥ मज उपाशी मारावें । दुःख दारुण भोगवावें ॥ ऐसें सद्गुरू दयाळू देवें । विपरीत कैसें योजिलें ॥ ४२ ॥ देवें शरणागत वधिला । ऐसा नाहीं आयकिला ॥ दयाळू कैसा प्रवर्तला । शरणागताचे वधासी ॥ ४३ ॥ एकदांच सुदर्शन हाणिता । तरी लागलाच प्राण जाता ॥ घोळघोळोनि रमानाथा । मारिसी कां दयाळा ॥ ४४ ॥ प्राण्यांतें दुःखें होतीं । ते तुझेंच स्मरण करिती ॥ तूंच गांजिसी कमळापती । तरी तुतेंच आहें शरण मी ॥ ४५ ॥ देवा तुझी दुर्बळ गाय । शरण आली वधिसी काय ॥ चारा घालीं दत्तात्रेय । गोब्राह्मणहितकर तूं ॥ ४६ ॥ जरी आहें

ओढाळ । तरी तुतेंच करणें प्रतिपाळ ।। आतां यावी कळवळ । सद्गुरो आतां श्रमलों मी ।। ४७ ।। आतां धीर धरवेना । फार झाल्या यातना ।। सोडवीं आतां नारायणा । सद्गुरूराया सर्वज्ञा ।। ४८ ।। देवा तुझें बाळ आहें । लवपळ तुझी वाट पाहें ।। येई आतां सद्गुरू माये । जेऊं घालीं निजकरें ।। ४९ ।। जें जें मातें दुःख झालें । तें तुझे अंगीं उमटलें ।। धांव आतां याच वेळे । सद्गुरूराया सर्वज्ञा ।। १८५० ।। देवा मनाचे तरंग कांहीं । नको पाहूं सद्गुरू आई ।। देवा तुझे पडतों पायीं । तुझा आहें सर्वथा ।। ५१ ।। येई आतां गुरुमाउली । मज आपले हातीं जेऊं घालीं ।। आजच माझी कींव आली । पाहिजे तुतें दयाळा ।। ५२ ।। दत्तात्रेया धांव आतां । तुझे पायीं ठेवितों माथा ।। आज मातें सर्वथा । जेऊं घालीं व्हावें तेंसें ।। ५३ ।। तुझे दारीं ब्राह्मण । उपासी तुतें मागतो अन्न । टाकोनि मातें भोजन । कैसा करिसी विश्वंभरा ।। ५४ ।। अतिथी तुझे द्वारीं आलों । फार देवा भुकेलों ।। भिक्षा घालीं दयाळो । दत्तात्रेया निजहातें ।। ५५ ।। तुझ्या दयाळू स्वभावा । जाणूनि शरण आलों केशवा ।। सर्वज्ञ असतां देवाधिदेवा । विरुद्ध कैसें करिसी हें ।। ५६ ।। अभया द्यावें शरणागता । तुझें व्रत हें लक्ष्मीकांता ।। देवा मातें कष्ट देतां । संतोष तुझा होतसे ।। ५७ ।। मी काय तुतें शरण नव्हे । सर्वज्ञ देवा शोधूनि पाहें ।। देवा तुझी आण वाहें । तुतें आहें

शरण मी ॥ ५८ ॥ ऐसें असतां दयाळा । काय माझा कापिसी गळा ॥ तुझे पायीं वेळोवेळां । माथा देवा ठेवितों ॥ ५९ ॥ भक्त तुतें शरण येती । कोणी उग्र दुःख साहती ॥ कोणी आपलें शिर तोडिती । तुझेसाठीं गोविंदा ॥ १८६० ॥ कोणी उग्र तपें करिती । एकपादस्थित राहती ॥ अखंड समाधी साधिती । एकाग्रचित्तें ॥ ६१ ॥ ऐसें तुझेसाठीं पाहीं । दारुण दुःख भोगिती देहीं ॥ परंतु त्यांची स्थिती पाहीं । डळमळेना धीरांची ॥ ६२ ॥ देवा माझी अंतरस्थिती । घाबिरी झाली कमळापती ॥ येतों तुतें काकुळती । सोडवीं आतां सर्वज्ञा ॥ ६३ ॥ देवा माझें धैर्य किती । लघुशक्ति मी अल्पमति ॥ धांव आतां कृपामूर्ति । सोसवेना मज दुःख ॥ ६४ ॥ धांव आतां सद्गुरूराया । दयावंता दत्तात्रेया ॥ आतांच येई पडतों पायां । सर्वज्ञदेवा समर्था ॥ ६५ ॥ मी तों तुतें शरण आहें । तुझे हातीं माझी बाहे ॥ व्हावें तैसें सद्गुरू माये । लोकीं मातें नाचवीं ॥ ६६ ॥ माझी दुर्दशा जेसी करिसी । दारोदारीं नाचविसी ॥ याची लज्जा हृषीकेशी । तुजच असे ॥ ६७ ॥ काय करूं मी लक्ष्मीकांता । तुझे पायीं ठेवीं माथा ॥ माझी लज्जा सद्गुरुनाथा । दत्तात्रेया रक्षीं तूं ॥ ६८ ॥ नाना विकल्प उठती । नाना कल्पना कोसळती ॥ मज गांजणूक होती । म्हणून पावें मज आतां ॥ ६९ ॥ आपलालें प्रकारें लोक । मातें बोध करिती देख ॥ तथापि

माझी लक्ष्मीनायक । स्थिरता नाहीं तुजविण ॥ १८७० ॥ कोठें राहूं कोठें फिरूं । कैसा राहूं काय करूं ॥ एवं कांहीं निर्धारू । दत्तात्रेया होईना ॥ ७१ ॥ स्वामींनीं समाधान केलें । परंतु व्हावें तेसें न झालें ॥ माझें सर्वांग निवालें । परंतु आशा राहिली तव चरणीं ॥ ७२ ॥ माझी तळमळ गेली नाहीं । हळहळ आहे शोधूनि पाहीं ॥ तुझेसाटीं सद्गुरू आई । चैन नाहीं जाणसी तूं ॥ ७३ ॥ मज स्वामींनीं भेट द्यावी । माझी आशा पुरवावी ॥ आनंदाची वृष्टी व्हावी । स्वामीसवें बोलतां ॥ ७४ ॥ माझा काबू होता । तितका उपाय केला अनंता ॥ आतां तटस्थ माझी अवस्था । झाली देवा जाणसी तूं ॥ ७५ ॥ आतां तुझीच पाहतों वाट । राहिली सारी खटपट ॥ नाना साधनें पोंचट । मी तीं न करीं सर्वज्ञा ॥ ७६ ॥ आतां ओघास येतें । तें तों करावेंच लागतें ॥ ग्रावांचोन शरीर चालतें । हें तों घडेना सर्वथा ॥ ७७ ॥ प्रवाहपतित कर्माकर्म । नाना योग धर्माधर्म ॥ करावे लागतीच यांचें वर्म । सद्गुरुस्वामी जाणती ॥ ७८ ॥ शरीरयात्रा लावावी । तुझी सर्वांग सेवा घडावी ॥ म्हणोनि सदसदही आचरावीं । कर्में करावीं लागती ॥ ७९ ॥ मातें जीं जीं कर्में घडती । सर्व तुझेच ठायीं श्रीपती ॥ ऐसें समजोनि कृपामूर्ती । यावें आतां मागलों ॥ १८८० ॥ प्राणच मात्र गेले नाहीं । वरकड सर्व झालें पाहीं ॥ देहपतन होणें कांहीं । हातीं नाहीं

कोणाच्या ॥ ८१ ॥ हें तों तुझेच हातीं असे । तूं करिसी तें होतसे ॥ येथें माझा कांहीं नसे । काय्रू देवा सर्वज्ञा ॥ ८२ ॥ तूं विपरीत काळ निवारिसी । अंतकाळातें टाळिसी ॥ नाना आघातीं रक्षिसी । शरणागतातें सद्गुरो ॥ ८३ ॥ जैसी माझी अवस्था होते । तैसीं निवेदन केली तुतें ॥ आणीक देवा कोणातें । सांगूं आपलें सुखदुःख ॥ ८४ ॥ अनेक दुःखांत बुडालों आहे । हृदयीं धरिले तुझे पाये ॥ म्हणोनि देवा वांचलों आहे । ऐसें असतां सर्वज्ञा ॥ ८५ ॥ तुझे विरहित माझे जिणें । धिक् धिक् देवा लाजिरवाणें ॥ न कळे देवा कवण्यागुणें । प्राण माझा वांचला ॥ ८६ ॥ प्राण माझा कालवतो । ऊर देवा भरोनि येतो ॥ तुझे मुखाकडे पाहतों । केविलवाणें सर्वज्ञा ॥ ८७ ॥ काय करूं काय्रू नाहीं । तुझेच लागतीं पायीं ॥ दत्तात्रेया आजच येईं । आतांच देईं मज भेटी ॥ ८८ ॥ जय परब्रह्म ब्रह्मानंदा । जयजय निरस्तातिशयानंदा ॥ जयजय सच्चिदानंदा । दत्तात्रेया सद्गुरो ॥ ८९ ॥ माझी सारी हळहळ । देवें केली शीतळ ॥ तुतें आली कळवळ । दयासिंधो ॥ १८९० ॥ सिद्धेश्वराचें रूप । तूंचि धरिलें आपेंआप ॥ माझा सकळ संताप । दूर केला दयाळा ॥ ९१ ॥ दयाभरित आपली वाणी । घालोनि देवें माझे कानीं ॥ प्रवेशतांचि अंतःकरणीं । शीतळ झालों दयाळा ॥ ९२ ॥ माझें कर्तव्य नेलें । संकल्प सारे बुडविले ॥ मातें देवें रिकामें

केलें । ध्यान समाधी कारणें ॥ ९३ ॥ जें काय होतें माझें हित । तेंच सांगोनियां त्वरित ॥ देवें केलें कृतार्थ । धन्य मातें या जगीं ॥ ९४ ॥ निरंजनाचे चरण । भावें वंदी नारायण ॥ पूर्वार्ध झाला संपूर्ण । भाविकांचा हितकर्ता ॥ ९५ ॥ जे एकभावें वाचिती । त्यांचे मनोरथ पुरती ॥ जैसे माझे श्रीपती । पुरविते झाले निजांगें ॥ १८९६ ॥ इति श्रीमत्परम तपःपरायण श्रीमन्नारायण विरचिते करुणासागरे पूर्वार्ध समाप्तः ॥

॥ श्रीगुरुदत्तचणार्पणमस्तु ॥

3709

REFBK 0003709

REFBK-0003709

## रामचंद्र शंकर टाकी, बी. ए., रिटायर्ड डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, मुंबई, यांनीं लिहिलेले ग्रंथ.

---

(१) **पुरुषार्थदीपिका.**—यांत श्रुति, स्मृति ,पुराणें, साधुसंत यांचीं अवतरणें संगतवार आलेलीं असून त्यांच्या अध्ययनानें **परमार्थ प्राप्तिकरितां काय केलें पाहिजे** याचा साधार आणि सप्रमाण खुलासा होतो व समग्र विषय निर्विवाद रीतीनें मनांत उतरतो. पृ. सं. ७००, बांधणी कापडी, किं. रु. २, ट. ख. वेगळा.

(२) **लघुबोध.**—यांत 'पुरुषार्थदीपिकें'तील सर्व मुख्य मुख्य तत्त्वें आलीं असून ग्रंथ आटोपशीर व नित्यक्रमयोग्य झाला आहे. पृ. सं. ११२, बांधणी कागदी, किं. रु. १, ट. ख. वेगळा.

(३) **भगवद्भजन** अथवा **सद्भक्ति मंदिरांतील नित्य उपासनाक्रम** द्वितीयावृत्ति पृ. सं. ५६, बांधणी कागदी, किं. ८ आणे, ट. ख. वेगळा.

(४) **श्रीज्ञानेश्वरमहाराज** अथवा **सद्भक्तिविजय.**—या ग्रंथांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र व त्यांचें अवतारकार्य यांचें विस्तृत विवेचन पुढील नऊ समासांत केलें आहेः—(१) संतमाहात्म्य, (२) नामप्रताप, (३) ज्ञानेश्वरमहाराजांचा पूर्ववृत्तांत, (४) हटयोगादि विषयसुखसाधनांचा निषेध, (५) सद्भक्तिपुनरुज्जीवन, (६) भावार्थदीपिका, (७) अमृतानुभव, (८) गुरुभक्त्युपदेश व (९) वैकुंठारोहण. शिवाय पुढील पांच सुंदर